# ऋणानुबंधी

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. १८७८

REFBK-0006273

—प्र. श्री. कोल्हटकर

माझ्या वडिलांच्या स्मृतीस

—बापु

माझ्या वडिलांच्या स्मृतीस

—बापु

निबंध

# ऋणानुबंधी

REFBK-0006273

लेखक

प्र. श्री. कोल्हटकर

किंमत १। रुपया

प्रकाशक
**रा. दि. गद्रे,**
४१ बुधवार पेठ, पुणें २

पुस्तकासंबंधीं सर्व हक्क लेखकाकडे आहेत

१८-१०-१९४२

मुद्रक
**ग. म. वीरकर,**
राजमुद्रणालय, फलटण

माझ्या वडिलांच्या स्मृतीस

—बापु

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| | स्वभावचित्रें (प्रस्तावना) | १ |
| १ | अत्रे | ९ |
| २ | शिल्पकार करमरकर | १८ |
| ३ | संजीवनी मराठे | २६ |
| ४ | र. लु. जोशी | ३४ |
| ५ | सुधा | ४० |
| ६ | विमल आणि बाबा | ४७ |
| ७ | य. गो. जोशी | ५५ |
| ८ | दुर्गा खोटे | ६३ |
| ९ | डॉ. भालेराव | ७१ |
| १० | गोपीनाथ तळवलकर | ७८ |
| ११ | दोन बहिणी | ८४ |
| १२ | कृष्णराव मराठे | ८८ |
| १३ | अनंत हरी गद्रे | ९७ |
| १४ | अप्पा जोशी | १०४ |

८

# स्वभावचित्रें

१९३९ च्या अखेरीला मुंबई–उपनगर मराठी साहित्य–संमेलनाचे अत्रे अध्यक्ष झाले त्या वेळीं मुंबईंतील 'चित्रा' साप्ताहिकाचे तत्कालीन तरुण संपादक दत्तु बांदेकर यांच्या सांगण्यावरून मी या पुस्तकांतील पहिलें स्वभावचित्र लिहिलें. माझा हा उपक्रम पुढें चालू राहील, असें मला त्या वेळीं वाटलें नव्हतें. परंतु कांहीं दिवसांनीं शिल्पकार करमरकर यांचें स्वभावचित्र लिहिण्याची मला हुक्की आली आणि बांदेकरांच्या सौजन्यानें तें 'चित्रा' साप्ताहिकांत प्रसिद्ध झालें. हीं दोन स्वभावचित्रें माझ्या मित्रांना आवडल्यावरून मला साहजिकच आणखी लिहिण्याचा हुरूप आला. परंतु मी हुकमी लेखक नसल्यानें, हें लहानसें पुस्तकहि वाचकांना सादर करण्यास मला जवळ जवळ तीन वर्षे लागलीं. या पुस्तकाचें सर्व श्रेय दत्तु बांदेकरांनाच आहे—त्यांनीं प्रारंभीं मला अत्र्यांच्या अंगावर 'छू' केलें नसतें, तर आज मी इतक्या लोकांच्या वाटेस गेलोंच नसतों.

वास्तविक मराठी भाषेंत आजपर्यंत अनेक भल्याबुऱ्या लेखकांनीं शेंकड्यांनीं स्वभावचित्रें लिहिलीं असतां, त्यांत आणखी भर घालून वाचकांना मी ही जादा तकलीफ कां देतों आहें, असा प्रश्न उद्‌भवण्याचा संभव आहे. पण एकाद्या व्यक्तीबद्दल आपला आदर, आपलेपणा, सहानुभूति वगैरे दाखविण्याचा हा सुटसुटीत लेखनप्रकार बराच लोकमान्य झाला असल्यानें, तशा लेखनांत मी थोडीफार भर घातली तर फारसें बिघडेल, असें मला वाटत नाहीं. पूर्वींच्या काळीं एकाद्या व्यक्ती-बद्दल आदर दाखविण्यासाठीं, त्या व्यक्तीचें चरित्र लिहिण्याकडे लेखकांची प्रवृत्ति असे. एकाद्याच्या आयुष्याचा ग्रंथ आटोपल्यावर, सावकाशपणें त्या गृहस्थाचा चरित्रग्रंथ प्रसिद्ध होईपर्यंत थांबण्याची तयारी त्या वेळच्या

वाचकांची होती. व्यक्तीच्या स्वभावापेक्षां तिच्या शीलसंपन्नतेकडे लेखकांचें आणि वाचकांचें विशेष लक्ष जात असे. एकाद्याचें चारित्र्य निष्कलंक असल्याशिवाय त्या व्यक्तीचा चरित्रचंद्र वाङ्मयक्षितिजावर दिसणें मुष्किलीचें असे. चरित्रनायक लहानपणीं खरें बोलत होता कीं नाहीं, लंगोटी लावून सोंवळ्या सनातनी गणवेषांत माधुकरी मागून तो गुजराण करीत होता कीं नाहीं, म्युनिसिपालिटीच्या मिणमिणत्या प्रकाशांत तो अभ्यास करीत असे कीं नाहीं—या सर्व गोष्टींना पूर्वींच्या चरित्र-वाङ्मयांत फार महत्त्वाचें स्थान असे. देशावरून एक लोटा आणि कनवटीला चार पैसे लावून 'उन्नति, उत्साह आणि उत्कर्ष' यांचा महामंत्र पुटपुटत चरित्रनायक कष्टानें जगत असला म्हणजे चरित्रलेखकाला हुरूपानें लिहिण्यास फारसे कष्ट पडत नसत. परंतु आतां काळ पालटला आहे. जीवनकलह अतिशय तीव्र झाल्यानें जीवनाकडे पहाण्याची लोकांची दृष्टीहि बदलली आहे. लोकशाहीच्या प्रसाराबरोबर लोकवाङ्मय निर्माण करण्याकडे लेखकांचें जास्त लक्ष जाऊं लागल्यानें, मूठभर थोर लोकां-बरोबरच सर्वसाधारण लोकांकडेहि लेखकवर्ग चौकसपणानें पाहूं लागला आहे. सामान्य लोकांच्या स्वभावचित्रांचें लेखन हें एका दृष्टीनें लोक-वाङ्मयाचेंच एक अंग आहे असें ठरल्यानंतर, सामान्य व्यक्तीच्या अंगांत कांहीं तरी असामान्य असें दिसलें, तरी तेवढ्या भांडवलावर एकाद्याचें स्वभावचित्र लिहिण्यास लेखकांना पंचाईत पडेनाशी झाली. घरांतील कुऱ्हाडीनें जंगलसत्याग्रह करून गुन्हा नाकबूल करण्याच्या आजच्या जमान्यांत, 'बाबा, तुमच्या कुऱ्हाडीनं बागेतलं झाड मीं तोडलं,' असें प्रामाणिकपणानें सांगणारा जुन्या काळांतला पोरगा आज बावळट ठरून आपल्या सोबत्यांच्या थट्टेचा विषय होऊन बसेल ! आईवडिलांची आज्ञा पाळावी, असें R. S. S. च्या मामुली मुलाला भीतभीतच सांगण्याचें धाडस एकाद्यानें केलेंच, तर आपल्या हातांतलें दांडकें जमिनीवर जोरानें आदळून तें पराक्रमी बाळ उपदेश करणाऱ्याकडे

हेटाळणीनें हंसून संघांत चालतें होईल. तसेंच आजचा घाईचा आणि महागाईचा जीवनक्रम लक्षांत आणतां, एकादा थोर पुरुष स्वर्गवासी होऊन त्याचें चरित्र लिहिण्याची वाट पहात बसण्यापेक्षां, बसल्या बैठकीला ज्याला स्वर्ग दोन बोटें उरला आहे अशा एकाद्या ढंढंण्णा साहित्यिकाचें लहानसें स्वभावचित्र लिहून दहा-पांच रुपये खिशांत घालणें लेखकांना जास्त सोयीचें वाटूं लागलें असल्यास नवल नाहीं. गेल्या वीस-पंचवीस वर्षांत नियतकालिकांची संख्याहि खूपशी वाढली असल्यानें, तीं लोकप्रिय करण्यासाठीं संपादकांनाहि नवीन नवीन लेखनप्रकार वाचकांना सादर करणें अपरिहार्य झालें. 'रत्नाकर' मासिकांत दिवेकरांनीं हा नवा उपक्रम सुरू केला असला, तरी त्यांचें लक्ष थोर—व त्यांतहि राजकारणी—लोकांपलीकडे गेलें नव्हतें. परंतु आद्य 'प्रतिभा'कार, शंकरराव किर्लोस्कर वगैरे संपादकांनीं या विशिष्ट लेखनप्रकाराला विशेष उत्तेजन दिल्यापासून अशा वाङ्मयांत फार चांगली भर पडली आहे. एकादा लेखक एकाद्या संमेलनाचा अध्यक्ष झाला कीं, नियतकालिकांना त्याचा परिचय करून देण्यास सर्वांना संधी मिळूं लागली. कोणी थोर मनुष्य खतम झाला म्हणजे गृह्यसंस्काराच्या निमित्तानें त्या गृहस्थाचें संक्षिप्त चरित्र वाचकांना घरबसल्या मिळे. अशा रीतीनें अनेक चरित्रवजा स्वभावचित्रें प्रासंगिक म्हणून प्रसिद्ध झालीं असलीं, तरी या वाङ्मय-प्रकारांत त्या निमित्तानें कां होईना, पण मोलाची भर पडली, यांत शंका नाहीं. अशा लेखनांतसुद्धां पक्षपात झालेला दिसत नाहीं. राजकारणी पुरुष, समाजसेवक, कलावन्त, साहित्यसेवक, व्यापारी, कारखानदार वगैरे अनेक व्यक्तींचा गौरव लेखकांनीं करून त्यांचा परिचय महाराष्ट्राला करून दिलेला आहे. कालान्तरानें सामान्य स्त्रीपुरुषांकडे लेखकांचें लक्ष जाऊन, समाजाला आणि राष्ट्राला प्रगतिपथावर प्रवास करण्यास मदत करणारी व्यक्ति स्वभावलेखनासाठीं पुरेशी वाटूं लागली. बाबु गेनु हा मामुली मजूर लेखकांच्या आणि शाहिरांच्या स्फूर्तीचा विषय होऊं शकतो,

ही गोष्ट इंग्रजी विद्येच्या वाघिणीच्या दुधावर पोसलेल्या समाजास पन्नास वर्षांपूर्वी शक्य वाटली नसती. या लेखनप्रकाराला वयाच्या दृष्टीनें लहान-मोठा असा भेदभाव माहीत नाहीं. लेखनाचा विषय योग्य असला म्हणजे लेखकाची प्रतिभा जागृत होण्यास अडचण पडत नाहीं. म्हाताऱ्यांवर लिहिलेलें घाट्यांचें पुस्तक आणि कन्याशाळेंतील लहान मुलींवर लिहिलेलं कमलाबाई देशपांडे यांचें 'चिमण्या' हें चिमुकलें पुस्तक वाचकांनीं जरूर वाचावें, अशी माझी आग्रहाची शिफारस आहे. या पुस्तकांच्या वाचनानें वाचकांना आपल्या रोजच्या कष्टमय आयुष्याचें कांहीं वेळ तरी विस्मरण होईल अशी माझी खात्री आहे. कमलाबाईंच्या 'चिमण्यां'ची चिंवचिंव तर इतकी कर्णमधुर आहे, कीं 'चिऊबाई, चिऊबाई दार उघड'—असें त्यांच्या घरट्याकडे जाऊन त्यांचीं नांवें विचारण्याचेंहि भान वाचकांना रहात नाहीं! घाट्यांच्या पुस्तका-नंतर कमलाबाईंच्या 'चिमण्या' इतकें दुसरें सुंदर पुस्तक माझ्या तरी वाचनांत नाहीं.

स्वभावचित्रांच्या लेखनप्रकारामुळें चरित्रें आणि आत्मचरित्रें मागें पडतील, असें मला वाटत नाहीं. लघुकथांचा परिणाम ज्याप्रमाणें कादंबरी-लेखनावर झालेला नाहीं, त्याचप्रमाणें चरित्रें आणि आत्मचरित्रें यांचीहि पीछेहाट होण्याचें कारण नाहीं. परंतु या लेखनाचें प्रमाणच अल्प असल्यानें चरित्रलेखन आपला मार्ग आस्ते कदम आक्रमण करीत राहील, यांत शंका नाहीं. उत्कृष्ट आत्मचरित्रांनाहि त्यांचें योग्य तें स्थान केव्हांहि नाकारलें जाणार नाहीं. मराठींत आजपर्यंत जीं आत्मचरित्रें प्रसिद्ध झालीं आहेत, त्या सर्वांत नाशिकच्या 'साहित्यलक्ष्मी'नें लिहिलेलीं 'स्मृतिचित्रें' सर्वोत्कृष्ट आहेत हें कोणालाहि कबूल करावें लागेल. महात्मा गांधी आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या आत्मचरित्रांच्या योग्यतेचें 'स्मृतिचित्रें' हें पुस्तक आहे, असें मला वाटतें. उत्कृष्ट आत्मचरित्रासाठीं, चरित्र-नायक (किंवा नायिका) थोर व्यक्तीच असावी, या परंपरागत चालत

आलेल्या सनातनी कल्पनेला, वार्धक्यानें थरथरणाऱ्या हातानें 'साहित्य-लक्ष्मी'नें चांगलाच धक्का दिलेला आहे. प्रामाणिकपणा, खेळकर वृत्ति, सहजसुंदर भाषाशैली, सूक्ष्म विनोद यांवर चरित्र किंवा आत्मचरित्र यांचें यश अवलंबून असतें.

'मुलाखती' हा लेखनप्रकारसुद्धां थोड्याफार प्रमाणांत स्वभाव-चित्रांच्या जातीचा आहे, असें म्हणायला हरकत नाहीं. दुसऱ्याची विनाकारण उठाठेव करणें या मनुष्यस्वभावाच्या पोटींच हीं जुळीं भावंडें जन्माला आलीं आहेत असें वाटतें. मुलाखत-मार्तंडांनीं प्रसिद्ध केलेल्या कांहीं निर्बुद्ध आणि हास्यास्पद मुलाखतींनीं 'विनोदी' वाङ्मयांत अभावितपणें भर पडत असली, तरी अशा मुलाखतींचा बाजार आतां बंद करण्याची वेळ आली आहे, असा सूर वाचकांत वाहूं लागल्याचें दिसतें. आयुष्याचा चिवडा केलेल्या एखाद्या माणसाची खमंग मुलाखत आज टिचून छापणें शक्य असलें, तरी या चांगल्या लेखनप्रकाराचा चिवडा यापुढें तरी होऊं नये असें धंदेवाईक मुलाखत्यांना सांगण्याची वेळ आली आहे. मुलाखतींच्या या वेड्या पिकाला 'दग्धभू' पद्धतीनें भस्मसात् करण्यासाठीं य. गो. जोश्यांच्या 'अनौपचारिक मुलाखतीं'चा उपयोग झाला, तर जोशीबुवांना त्रस्त वाचकवर्ग दुवा देईल. मराठी काव्यांत 'झेंडूच्या फुलां'चें जें महत्त्व आहे, तेंच अभिनव पद्धतीनें लिहिलेल्या या पुस्तकाला आहे, असें म्हणायला हरकत नाहीं. परंतु विडंबन हें विनोदासारखेंच दुधारी शस्त्र असल्यानें वाटेल त्या गल्ली-गणेशाला तें हाताळतां येणार नाहीं, हें सामान्य बोरूबहाद्दरांनीं नीट लक्षांत ठेवावें. वाटेल त्या व्यक्तीची मुलाखत घरबसल्या घेण्याची सोय या नवीन पद्धतीनें झाली आहे. फार काय, पण मुलाखतीचा नायक सत्यसृष्टींत वावरत असलाच पाहिजे, असाहि या ऐसपैस आणि मजेदार तंत्राचा हट्ट नाहीं. हा नाविन्यपूर्ण आणि चटकदार लेखनप्रकार सुरू केल्याबद्दल मी जोशीबुवांचें अभिनंदन करतों.

लहानथोर लोकांविषयीं शक्य ती माहिती मिळविणें याबद्दल प्रत्येकाची आजकाल धडपड चाललेली असल्यानें स्वभावचित्रांना अखंड मागणी राहील असें म्हणायला हरकत नाहीं. या नवीन लेखनप्रकाराची बैठक बुद्धिमत्ता आणि भावना यांवर असली, तरी चटकदारपणा हा त्याचा आत्मा होय. थोरांच्या स्वभावाबरोबरच त्यांच्या कार्याची कल्पना स्वभाव-चित्रांत देणें सोयीचें असल्यानें पुष्कळ वेळां लेखकाला अचुक गणिती दृष्टि असणेंहि अपरिहार्य असतें. माझें आणि गणिताचे आंकडे लहानपणा-पासूनच जमत नसल्यानें, शाळेंत असतांना चढत्या–उतरत्या भांजणीचा साधा चढउतार करतांनासुद्धां माझी दमछाट व्हायची. अशा परिस्थितींत अभ्यासी लेखन माझ्या आटोक्याबाहेर असल्यानें, मी तसा प्रयत्न या पुस्तकांत कोठेंहि केलेला नाहीं. परंतु अशा लेखनाचा उत्कृष्ट नमुना यवतमाळचे वामन नारायण देशपांडे यांनीं १९२२ सालीं ‘ मनोरंजन ’मध्यें लिहिलेल्या ‘कविश्रेष्ठ कीट्स’ या चरित्रवजा स्वभावचित्रांत पहायला सांपडतो. त्यानंतर ‘ वागीश्वरी ’तहि त्यांनीं ‘ टॅसो ’, ‘ गिबन ’ हीं त्याच धर्तीचीं स्वभावचित्रें लिहिलीं होतीं. या तरुण लेखकानें हा नवीन लेखनप्रकार प्रथम वीस वर्षांपूर्वीं यशस्वी रीतीनें पचनीं पाडला, यावरून त्याच्या प्रतिभेची वाचकांना साक्ष पटेल. जिज्ञासू वाचकांनीं शक्य असल्यास ते लेख जरूर डोळ्यांखालून घालावेत.

‘ ऋणानुबंधी ’ या पुस्तकाची बैठक भावनेवर असल्यानें त्यांत विद्वत्ता-प्रचुर असें भारदस्त लेखन वाचकांना सांपडणार नाहीं. लघुनिबंधाप्रमाणें हा लेखनप्रकार इंग्रजी वाङ्मयांतून आपल्याकडे आला असल्यानें आणि माझें इंग्रजी वाचन फारच मर्यादित असल्यानें माझें हें लेखन, तंत्राच्या दृष्टीनें सदोष असण्याचा संभव आहे. माझ्या स्वभावचित्रांचा विषय झालेल्या सर्व लोकांचा मी माझ्या बाजूनें तरी एकनिष्ठ मित्र असल्यानें, माझें लेखन गुणैक दृष्टीनेंच झालें आहे. गोपीनाथ तळवलकर व अप्पा जोशी या स्वभावचित्रांखेरीज बाकीचीं सर्व यापूर्वींच प्रसिद्ध झालेलीं आहेत. त्यानंतर

कोणाच्याहि आयुष्यांत म्हणण्यासारखा फरक झाला नसल्यानें तीं सर्व स्वभावचित्रें मूळच्या स्वरूपांतच या पुस्तकांत समाविष्ट करण्यांत आलीं आहेत. पहिला 'फर्मा' छापण्यापूर्वी नाशिकच्या येत्या मराठी साहित्य-संमेलनाचे अत्रे अध्यक्ष झाल्याची सुवार्ता मला समजली असती तर त्यांचें स्वभावचित्र मात्र अद्ययावत् करण्यास संधी मिळाली असती. अत्र्यांना मिळालेल्या या बहुमानाबद्दल मी त्यांचें मनापासून अभिनंदन करतों. त्यांच्या अमदानींत संमेलनास योग्य तें मार्गदर्शन मिळून, त्यांच्या हातून त्यांच्या-सारखीच कांहीं तरी भरीव कामगिरी होईल याची मला खात्री आहे. विशेषतः वैयक्तिक असभ्य टीका आणि अनिष्ट लेखन यांच्या रत्नागिरींतील दाव्यांतला एक आरोपी नाशिकला न्यायाधीश म्हणून न्यायासनावर येणार असल्यानें, मराठी साहित्यसृष्टींत नंगा नाच घालणारीं वरील पिशाचें अत्र्यांनीं कायमचीं गाडून टाकलीं, तर त्यांच्या हातून फार मोठी कामगिरी होईल हें मी त्यांना नम्रपणें सुचविण्याची परवानगी घेतों. अनिष्ट लेखनानें समाजाच्या दानतीला प्रतिक्षणीं सुरुंग लागत आहेत हें अत्र्यांना माहीत आहेच. दानतीशिवाय समाज आणि राष्ट्र टिकूं शकत नाहींत हें कटुसत्य इतिहासाचा कोणताहि सामान्य विद्यार्थी सांगूं शकेल. आपलें शक्तिसर्वस्व वेंचून मराठी साहित्यसरिता यापुढें तरी शुद्ध आणि पवित्र राखण्याला अत्रे पुढें येतील अशी मला आशा आहे.

कालाच्या प्रवाहांत माझे ऋणानुबंधी कांहीं काल माझे सहप्रवासी असले, तरी कालान्तरानें आम्ही थोड्याफार प्रमाणांत दूरावलों असल्यानें आमचे ऋणानुबंध साहजिकच शिथिल झाले आहेत. ऋणानुबंध संपला तरी स्नेहसूत्रांत ओंवलेले आठवणीचे मणी केव्हांहि ओघळणार नाहींत अशी माझी खात्री आहे. माझ्यासारख्या एकाकी जीवन व्यतीत करणाऱ्या माणसाला त्या सर्व आठवणी, निर्धन माणसाच्या अत्यल्प धनसंचयाप्रमाणें आजन्म बहुमोल वाटाव्यात यांत नवल नाहीं. व्यक्ति दूरावल्या, तरी ऋणानुबंधाच्या नाजुक शृंखलेच्या मंजुळ खळखळाटानें स्नेहशून्य जीवनहि

थोडेंफार सुसह्य होतें असा माझ्याप्रमाणेंच अनेकांचा अनुभव असेल. माझ्या संकल्पाप्रमाणें अनेक ऋणानुबंधी या पुस्तकांत समाविष्ट करतां आले नाहींत याचें मला वाईट वाटतें. परंतु माझा हा अल्पसा प्रयत्न वाचकांना पसंत पडला, तर मी आणखी स्वभावचित्रें पुढेंमागें सादर करीन अशी तूर्त 'धमकी' देण्यास हरकत नाहीं. नवमतवादाच्या आजच्या पुरोगामी जमान्यांत, आपल्याबद्दल इतरांचा आदर टिकूं नये अशी नवीन लाट समाजांत निर्माण झाल्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत असलीं तरी कांहीं विशिष्ट गोष्टी टाळून कोणाचेंहि स्वभावचित्र लिहिणें अशक्य नाहीं. फार तर, अशा पुस्तकाला 'दुरून डोंगर साजरे' असें नांव द्यावें लागेल, इतकेंच.

राधाकृष्ण निवास,<br>
माडीवाले कॉलनी, पुणें २<br>
विजयादशमी, शक १८६४

प्र. श्री. कोल्हटकर

# ऋणानुबंधी

## १ : : अत्रे

वीस वर्षांपूर्वी मी मुंबईला वकिलीचा अभ्यास करण्यासाठीं आलों. वकिली पास झाल्यानंतर व्यापारांत पडायचें हें ध्येय मी माझ्यापुढें ठेवलें होतें. तें माझें लाडकें ध्येय अजूनहि माझ्या आटोक्यांत आलें नाहीं या एकाच गोष्टीवरून तें किती 'उच्च' असलें पाहिजे याची कल्पना ज्याप्रमाणें वाचकांना होईल, त्याचप्रमाणें मी व्यापारांत किती यशस्वी रीतीनें 'पडलों' आहें याची कल्पनाहि त्यांना होईल. अत्रे आणि मी एकाच बिल्डिंगमध्यें रहात होतों. त्या काळांत आम्ही एकमेकांना पाहिलें असलें तरी परस्परांना फारसे ओळखून मात्र नव्हतों. त्यानंतर अत्र्यांची व माझी भेट किर्लोस्कर थिएटरमध्यें झाली. तरी पण गप्पा मारण्याइतकी आमची भीड चेपली नसल्यानें, अत्र्यांच्या विलायतेला जाण्याच्या बेतापलीकडे आमचें बेताबेतानें चाललेलें बोलणें गेलें नाहीं. त्यानंतर मी पुण्यास दुसऱ्या एल्‌एल्. बी. चा अभ्यास करीत असतांना एका मित्राबरोबर अत्र्यांकडे जाण्याचा योग आला आणि मी व अत्रे (माझ्या बाजूनें तरी) दोस्त बनलों. माझी दोस्ती जमण्याला अत्यावश्यक असलेली

विनोदबुद्धि अत्र्यांमध्यें मला दिसली. पुण्यांतील माझी 'कायदेशीर दुर्दशा' संपल्यानंतर मी मुंबईला आलों. मी खटाववाडींत रहात असतां अत्र्यांना एका कामासाठीं मुंबईला वारंवार यावें लागे आणि कांहीं वेळेला तरी ते माझ्याकडे उतरत असत. त्या वेळीं ते आजच्याइतके कोणत्याहि अर्थानें मोठे झाले नव्हते. ज्ञानप्रकाश असूनहि, हंशा आणि टाळ्या या शब्दांना मराठी वाङ्मयांत फारसा भाव येऊं लागला नव्हता. मुंबईकरांना अत्र्यांच्या भावी मोठेपणाची अजूनपर्यंत फारशी दखलगिरी नव्हती. नमस्कारासाठीं किंवा स्वाक्षरीसाठीं अत्र्यांच्या हाताला फारशी तकलीफ पडूं लागली नव्हती. एकादा टॅक्सीवाला आणि मी यांनाच फक्त या थोर माणसाच्या हालचाली त्या वेळीं कळत—इतरेजनांना त्याची दादहि नव्हती. अत्र्यांच्या स्वभावांतील एक अत्यंत सन्माननीय बाजू मला त्या वेळीं समजली. अत्रे त्या वेळीं गरीब होते. त्यांच्यावर नेहमीं पैसे खर्च करण्याचा प्रसंग येई. अशा वेळीं उपाशी रहाण्याचा प्रसंग त्यांच्यावर आला तरी त्यांनीं माझ्याकडून कधींहि पैसे उसने घेतले नाहींत. उसनवारीची संवय असलेल्या माझ्यासारख्या गरीब माणसाला, उसनें अवसान आणूनहि मानी अत्र्यांचा कित्ता अजूनपर्यंतहि गिरवितां आला नाहीं. अत्र्यांच्या औदार्याचा अनुभवहि मला नंतर आला. रसिक मित्रांचा गराडा पडला असतां स्वतःचें आणि पैशाच्या पाकिटाचें तोंड नेहमीं उघडें असायचें. अत्र्यांइतका उदार आणि दिलदार साहित्यिक मला अजून भेटायचा आहे. परंतु या स्वारीचें औदार्य आतां तर इतकें विकोपाला गेलें आहे कीं, त्याची जमा सद्‌गुणापेक्षां दुर्गुणांतच करावी लागेल. हा भला गृहस्थ उद्यां कुबेराचा प्रायव्हेट सेक्रेटरी झाला तर त्याच्यावरहि डिबेंचर्स काढण्याची पाळी आल्यास मला नवल वाटायचें नाहीं.

पुण्यांत प्लेग असतांना अत्र्यांचा मुक्काम बरेच दिवस मुंबईला होता. अनंतरावांचा 'निर्भीड' धूमधडाक्यानें गर्जू लागला होता.

अत्र्यांवरील संकटें नाहींशीं झालेलीं होतीं आणि सळसळणाऱ्या प्रतिभेसह पुणेरी अत्रे मुंबईला आले होते. *मामा वरेरकरांच्या* दुर्दैवानें, बेजबाबदार उचापती करण्याची दुर्बुद्धि याच वेळीं त्यांना आठवली. मामांनीं पुण्या–मुंबईचा वाद काढला, आणि शंभर टक्के पुणेरी अत्र्यांनीं मामांचें आव्हान स्वीकारून त्यांची इतकी मुष्कील करून सोडली, कीं या ना त्या कारणानें मामांना अत्र्यांशीं कालान्तरानें मिटतें घेणें भाग पडलें. अत्रे–मामा वादांत अत्र्यांनीं मुंबई जिंकली. अत्रे मोठे झाले. मुंबईंत झालेल्या प्रत्येक सभेनें अत्र्यांना चहाते आणि कीर्ति मिळत गेली. त्यांचा परिवार वाढला आणि अत्र्यांचें रूपान्तर व्यक्तीमधून सार्वजनिक संस्थेंत झालें. अत्र्यांचें वक्तृत्व सतेज, विनोदी आणि बहारीचें काव्यमय असल्यानें कोणतीहि सभा 'बोलतां बोलतां' जिंकणें त्यांना कधींहि अशक्य झालें नाहीं. अत्र्यांना विश्राम-बागेंतील पेन्शनराप्रमाणें निरुपद्रवी श्रोते फारसे पसंत नसतात—कसलेल्या शिपाई गड्याला खट्याळ आणि फुरफुरणाऱ्या घोड्यावर स्वारी करणें केव्हांहि जास्त आवडतें. बुद्धिमान् आणि विनोदी श्रोते भेटले म्हणजे अत्र्यांना विलक्षण स्फुरण चढतें, भाग्यवंत श्रोत्यांना उत्कृष्ट वक्तृत्वाची सीमा दिसून असीम आनंदाचा अनुभव त्यांना मिळतो. सभा जिंकण्याचें अत्र्यांचें तंत्रहि त्यांचें असें स्वतंत्र आहे. अत्रे–मामा वाद ताजा असतांना अत्रे एका सभेंत भाषण करण्यासाटीं उठले आणि 'सभ्य गृहस्थहो', हे शब्द त्यांच्या तोंडांतून बाहेर पडतात न पडतात तोंच तिसऱ्या मजल्याच्या गॅलरींतून 'हं, बोला!' असे उद्गार कुणी तरी काढले. तें ऐकतांच हजरजबाबी अत्रे गॅलरीकडे पहात न चिडतां सस्मित मुखानें म्हणाले, 'माफ करा—पण आपल्याला उद्देशून हे शब्द नव्हते!' अत्र्यांचे हे शब्द ऐकतांच टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला आणि अत्र्यांनीं सभा जिंकली. त्याच सुमारास दुसऱ्या एका सभेंत अत्रे म्हणाले, 'बंधु–भगिनींनो, वरेरकर हे माझे गुरु आहेत...' हे शब्द अत्र्यांनीं मामांना शरणचिठ्ठी दिली असें

लोकांना वाटून त्यांनीं खूप टाळ्या वाजविल्या. अत्र्यांना वेड लागलें आहे कीं काय अशी शंकाहि श्रोत्यांना आली असावी. पण थोड्या वेळानें शान्तता प्रस्थापित झाल्यावर अत्र्यांनीं पुन्हां बोलण्यास सुरवात केली; ते म्हणाले, 'वरेरकर हे माझे गुरु आहेत...असें ते समजतात!' आपल्या विधानाला अत्र्यांनीं अशी विलक्षण अनपेक्षित कलाटणी दिलेली पाहून श्रोत्यांनीं पूर्वीपेक्षांहि दुप्पट जोरानें टाळ्या वाजवून आपला आनंद व्यक्त केला. महाराष्ट्रांत अनेक चांगले वक्ते असले तरी विनोदाचे बाबतींत अत्र्यांची सर कुणालाहि येणार नाहीं. गेल्या अत्रे-माटे वादांत शिवाजी-आखाड्यांतील प्रचंड सभेपुढें 'कूस' या शब्दाला अत्र्यांनीं इतकें विकृत स्वरूप दिलें कीं, तसला अश्लील शब्द माट्यांनीं वापरायला नको होता असेंच सर्व सभेला प्रामाणिकपणानें वाटलें. दात्यांचा प्रचंड शब्दकोश आणण्यासहि अत्रे विसरले नव्हते. 'कूस' या शब्दाच्या पानांत खूण ठेवण्याची खबरदारीहि दूरदर्शी अत्र्यांनीं घेतली होती. एकंदर सर्व बतावणी इतकी बेमालूम झाली, कीं अत्र्यांसारख्या सदभिरुची असलेल्या माणसाला 'कूस' या शब्दाचा अर्थ मोठ्यानें वाचण्यास जणुं काय संकोच वाटत होता. व्यक्ती शहाणी असली तरी जमाव हा महामूर्ख असतो हें तत्त्व बुद्धिमान् अत्रे नेहमींच ओळखून असतात. इतक्या देखाव्यानंतर 'कूस' या शब्दाला खरोखरीच वाईट अर्थ नाहीं असें एखाद्याला आढळून आलें तर मला आश्चर्य वाटणार नाहीं. तें कांहींहि असलें तरी अत्र्यांनीं सभा जिंकली होती. अत्र्यांची ही युक्ती मात्र सर्वांनाच साधेल असें नाहीं. एखाद्या मूर्ख माणसानें अत्र्यांचें अनुकरण करून त्यांचें पेटंट तंत्र अंमलांत आणण्याचें ठरविलें तर तें त्याला कधींहि जमणार नाहीं—जिसका बंदर ओही नचावे!

अत्र्यांच्या विनोदामुळें त्यांच्याबद्दल कांहीं वेळेला विनाकारण गैरसमज उत्पन्न होतात. उत्कट भावनेनें अत्रे किती उत्तम बोलूं शकतात याची साक्ष नाशिकला 'साहित्य-लक्ष्मी'च्या सन्मानप्रसंगीं

उपस्थित असलेले लोक देतील. माझे वडील वारल्यावर ओंकारेश्वरावर अत्र्यांनीं जें भाषण केलें तें सदभिरुचीला सोडून होतें असें कांहीं लोक समजतात. मला वडिलांच्या मृत्यूमुळें कितीहि दुःख झालेलें असलें तरी अत्र्यांचें भाषण कळण्याइतकी शुद्ध मला त्या भाषणाचे वेळीं खासच होती. मला तर वाटलें कीं, अत्र्यांच्या भाषणांत टारगट विनोद नसून त्यांत भावना ओसंडत होत्या. अत्र्यांच्या तोंडांतून अधिकउणा शब्द चुकून पडला असता तर सर्वांत मलाच अधिक वाईट वाटलें असतें. परंतु श्रीपाद कृष्णांच्या जळत्या चितेवर आपल्या विनोदाची विडी पेटविण्याइतके हीन वृत्तीचे अत्रे खासच नाहींत. अत्र्यांच्या नसानसांतून जीवंतपणा भरला असल्यानें मृत माणसाची टवाळी करण्याचा भ्याडपणा त्यांच्याकडून केव्हांहि होणें शक्य नाहीं.

अत्रे कवि आहेत. त्यांच्यांतील दुर्मिळ झालेला 'केशवकुमार' अजूनहि रसिकांचा प्यारा आहे. कांहीं विशिष्ट हेतूनें त्यांना 'झेंडूचीं फुलें' उधळून कांहीं लोकांची पूजा बांधणें प्राप्त झालें तरी तसें करण्यांत अत्र्यांचा दुष्टपणा नव्हता. उलट उत्कृष्ट विडंबन-काव्यांचा आदर्श भावी होतकरू कवींसाठीं त्यांनीं निर्माण केला. अत्रे लघुकथा-लेखक, नाटककार आणि बोलपटकथांचे लेखक व निर्माते असून यापुढें त्यांची वस्ती आजन्म सिनेमासृष्टींतच राहील कीं काय अशी भीति वाटते. सौंदर्य आणि संगीत यांनीं मादक झालेल्या वातावरणांत कलेचा आनंद बेहोषपणानें लुटण्याची अत्र्यांनीं तयारी केलेली दिसते. अशा परिस्थितींत 'केशवकुमारां'चें, अत्र्यांमधील लघुकथालेखकांचें आणि नाटककाराचें काय होणार याची फिकीर त्यांना नाहींशी दिसते. बोलपटांत क्वचित् चमकणाऱ्या 'केशवसुता'वरच यापुढें रसिकांना काव्याची तहान भागवावी लागेल असें मला वाटतें. बोलपटकथां-वरच अत्र्यांच्या सुंदर गोष्टी वाचण्याची हौस वाचकांना भागवावी लागेल. आणि या सर्व धकाधकीच्या व धावपळीच्या जीवनांतूनच

अत्र्यांना यापुढें नाटकें 'होतील'. धांवपळीमुळें आपल्या कोणत्याहि कलाकृतीवर सफाईचा अखेरचा हात फिरविण्यास या कलावंतास वेळ मिळणें शक्य होणार नाहीं; आणि केवळ वेळेच्या अभावीं सहज टाळण्यासारखे दोष वेळेवारीं नाहींसे करणें त्यांना जमणार नाहीं. पळण्याची कला वर्ज्य केली तर इतर कोणत्याहि कलेला धांवपळ मानवत नाहीं याची कल्पना अत्र्यांना असेलच. पण घरच्या पवित्र दिवाणखान्याचा आज तो टाऊन हॉल झालेला आहे आणि अनेक नवे नवे निर्बुद्ध व नालायक लोक जोंपर्यंत अत्र्यांच्या भोंवतीं त्यांच्या भिडस्त स्वभावामुळें अहोरात्र राजरोस घोटाळत आहेत तोंपर्यंत कोणत्याहि कलेची एकाग्र चित्तानें आराधना करण्यास अत्र्यांना एकान्त मिळणें शक्य नाहीं. वाचकांना 'केशवकुमार' हवा आहे. त्यांना लघुकथालेखक हवा आहे. साष्टांग नमस्कार घालून घराबाहेर पडणारा आणि उद्यांच्या संसाराची उठाठेव करणारा खंबीर मनाचा नाटककार लोकांना हवा आहे. प्रेक्षकांची ही अपेक्षा तृप्त झाली नाहीं तर त्यांच्या भ्रमाचा भोपळा फुटण्यास वेळ लागणार नाहीं. मी उभा आहे असें मोघमपणानें सांगणारा लेखक चांगली बैठक मारून निर्दोष नाटकें केव्हां लिहिणार याची प्रेक्षकांना उत्कंठा लागून राहिली आहे. अत्र्यांना यापुढें नाटकें नुसतीं 'झालीं' तर त्यानें लोकांचें समाधान व्हायचें नाहीं; हें सर्व साधायला अत्र्यांनीं (त्यांच्याच शब्दांत सांगायचें म्हणजे) स्वतःच्या आयुष्याची केलेली म्युनिसिपॅलिटी बंद करणें अवश्य आहे. मला म्युनिसिपल कारभाराचा जो कांहीं थोडा अनुभव आलेला आहे त्यावरून कोणत्याहि मानी माणसाला तें वातावरण मानवणें शक्य नाहीं असें माझें ठाम मत झालें आहे. अत्रे मानी आहेत हें मला माहीत आहे. त्यांचा अनुभव निराळा असेल असें मला वाटत नाहीं.

अत्रे म्हणजे सोसाट्याचा वारा. अत्रे म्हणजे पर्वताच्या कड्यावरून धडाडीनें धांवणारा प्रचंड गंगौघ. अत्रे म्हणजे जीवंतपणा. अत्रे

म्हणजे युद्ध—जयापजयाची फिकीर न करतां मरेन किंवा मारीन अशा हिरीरीनें केलेलें युद्ध. अत्रे म्हणजे बुधवारांतून कर्कश आवाज करणारी भली मोठी बेफाम मोटार. अत्रे म्हणजे आपल्या दोन चिमुकल्या मुलींशीं खेळणारा प्रेमळ प्राणी. अत्रे म्हणजे जाग्रण आणि अत्रे म्हणजे सकाळीं लवकर उठून सर्व पत्रें चाळून दुनियेशीं समरस झालेली थोर व्यक्ति. अत्रे म्हणजे रोज हजार सह्या करणारें यंत्र. अत्रे म्हणजे गप्पा, चहा, सिगरेट. अत्रे म्हणजे काका लिमये. अत्रे म्हणजे ज्ञानप्रकाश—-अत्रे म्हणजे हंशा आणि टाळ्या. अत्रे म्हणजे काय हें विचारण्याऐवजीं अत्रे म्हणजे काय नाहीं असेंच विचारावें. अत्रे म्हणजे सर्व आहेत–आणि सर्व नाहींतहि.

अत्र्यांचें आयुष्य म्हणजे धाडसानें चालविलेली प्रयोगशाळा होय. अत्र्यांच्या स्वभावांत ढोंग, लपवाछपवी वगैरे कांहीं नाहीं. आपल्या प्रत्येक भल्याबुऱ्या पराक्रमाचा परिणाम सहन करण्याची त्यांची सदैव तयारी असते. परंतु मराठी साहित्यांतील या तेजस्वी हिऱ्याला विविध अनुभवाचे पैलू बरेच पडल्यानें त्यांचें तेज आतां फारच बहारीनें खुलून दिसूं लागलें आहे. यापुढें नवे नवे प्रयोग करण्याची अत्र्यांना आवश्यकता आहे असें मला वाटत नाहीं. आतांपर्यंत आलेला अनुभव आणि ईश्वरानें दिलेली बुद्धिमत्ता व विनोद यांच्या भांडवलावर अत्र्यांना मराठी साहित्याचा केवढा तरी व्यापार करतां येईल याची त्यांना कल्पना नसेल. अत्रे गप्पा मारण्यांत रोज इतका वेळ खर्च करतात कीं, तोंडाला फाउंटन पेन लावून कागदावर लिहिण्याचें एकादें यंत्र निघालें तर अत्र्यांच्या 'तोंडून' कल्पनातीत वाङ्मयनिर्मिती होईल. पण हा शोध जोंपर्यंत निघाला नाहीं तोंपर्यंत अत्र्यांना वेळेची—आणि आयुष्याची—-काटकसर करायला हवी. पट्टीच्या साहित्यिकांनीं राजकारणांत पडूं नये असा कायदा उद्यां करून घेतां आला तर मला फार आनंद होईल.

अत्र्यांचा स्वभाव मला पूर्णपणें माहीत असल्यानें, त्यांचा आणि

तात्या सावरकरांचा राजकीय संसार सुरू झाल्याचें पाहून मला आश्चर्य वाटलें. तात्यांची पराक्रम करण्याची मर्यादा पाहून अमर्याद उत्साह असलेल्या अत्र्यांना हंसू आलें असल्यास नवल नाहीं. कॉंग्रेसची स्थिति अगदीं उलट असल्यानें अत्र्यांना खादीचा अभ्रा चढविण्याचा मोह झाला यांत नवल नाहीं. अत्र्यांना कुणी संधिसाधू म्हणतात; पण मला तसें वाटत नाहीं. निर्बुद्ध माणूस संधीची वाट पहातो. अत्र्यांना तसें करण्याची कधींहि आवश्यकता नव्हती. सावरकरांची मुक्तता झाल्यावर त्यांच्या पूर्वायुष्यांतील पराक्रमाच्या वाता ऐकून अनेक लोक त्यांच्या भजनीं लागले. परंतु थोड्या अनुभवानंतर त्या स्वातंत्र्यवीराच्या कार्यक्रमांत अत्र्यांना बहुधा जीवंतपणा आणि धडाडी यांचा अभाव दिसला असावा. तसेंच आपण कुणी तरी बडे आहोंत अशा ऐटीनें तात्यांची वागण्याची पद्धत असल्यानें, मनुष्यसंग्रह करण्यासाटीं अवश्य लागणारा स्वभावाचा गोडवा त्यांच्यांत नाहीं. अत्रे पक्के डेमोक्रॅटिक—त्यांना तात्यांचें नाटकी आणि अनैसर्गिक वातावरण रुचणें कधींच शक्य नव्हतें. तसेंच तात्यांच्या भोंवतीं असलेल्या निर्बुद्ध लोकांच्या गर्दींत आपण मिसळून जाऊं असेंहि अत्र्यांना वाटलें असेल. तात्यांमध्यें विनोदाचा अभाव असण्याचाहि संभव आहे. विनोदबुद्धि नसलेल्या माणसाशीं अत्रे कधींहि समरस होऊं शकत नाहींत. खिलाडू अत्रे आणि गंभीर तात्या—कल्पनेंतसुद्धां हें अशक्य वाटतें.

लोकप्रियतेचा अत्र्यांना अजूनहि कंटाळा आलेला नाहीं. अत्रे कुठेंहि गेले तरी लोक त्यांना ओळखतात. साहित्यलक्ष्मीच्या सत्कार-समारंभाचे वेळीं मी आणि अत्रे रात्रीं बोरीबंदरवर कलकत्ता मेलमध्यें बसलों असतां त्यांच्याकडे आदरानें पहाणारे लोक मला दिसले. 'अत्रे, तुम्हाला केव्हां तरी फरारी होण्याची वेळ आली तर तें शक्य होणार नाहीं. प्रत्येकजण तुम्हांला ओळखतो.' माझे हे शब्द ऐकून अत्रे हंसले. पण अत्र्यांची लोकप्रियता त्यांना यामुळें त्रासदायक

होईल कीं काय अशी मला भीति वाटते. त्यांना रात्रीं एक–दोन वाजेपर्यंतहि विश्रान्ति मिळत नाहीं. अत्रे झाले तरी मनुष्य आहेत. त्यांचा जोम व उत्साह निसर्गाच्या मर्यादेपलीकडे ताणला गेला तर त्याची भारी किंमत अत्र्यांना द्यावी लागेल. Eat, drink and be merry याबरोबरच sleep early अशी पुस्ती मला जोडण्याचा मोह होतो. या पुस्तीनें आयुष्याची आणि पैशाचीहि उधळपट्टी थांबेल.

अत्रे एके काळीं माझ्या जगांत होते. ते माझ्याकडे असतांना आम्ही अनेक रात्री गप्पागोष्टी करून घालविल्या होत्या. अत्र्यांच्या उमद्या स्वभावाची मला पूर्णपणें ओळख पटलेली आहे. अत्रे हंसू शकतात तसें त्यांना रडतांहि येतें. विनोदी मनुष्यच जास्त भावना-वश असतो असें मला वाटतें. 'संजीवनी'च्या अव्वल अमदानींत अत्र्यांनीं मला फार मदत केली आहे. मला आज जें कांहीं थोडेंसें लिहितां येतें तेंसुद्धां अत्र्यांच्या हलगर्जीपणामुळेंच. कांहीं लोकांना अत्रे गर्विष्ठ वाटतात. लोकप्रियता त्यांच्या डोक्यांत गेली आहे असें कित्येकांना वाटतें; पण मला तसें वाटत नाहीं. परंतु लॉर्ड बर्कन-हेडबद्दल लेडी ॲस्क्विथ यांनीं जें म्हटलें आहे तें कदाचित् अत्र्यांच्या बाबतींत म्हणतां येईल. 'His brains have gone to his head.' अत्रे आज मात्र माझ्या जगांत नाहींत. ते मोठे झाले आहेत, फार मोठे झाले आहेत. ते कीर्तीच्या शिखरावर आज असल्यानें इतक्या उंचीवरून मी त्यांच्या डोळ्यांत भरणें शक्य नाहीं हें मला माहीत आहे. मागच्या आठवणी पुन्हां पुन्हां आठवून मी अत्र्यांच्या मोठेपणाचें कौतुक करतों; त्यांना यश मिळावें म्हणून मला मनापासून वाटतें; त्यांच्या थोरपणाला कोणाचीहि दृष्ट लागूं नये अशी इच्छा होते. मागच्या सर्व आठवणी होऊन डोळ्यांत अश्रु येतात—ते पुष्कळ वेळां सुखाचे असतात आणि कांहीं वेळेला मात्र......

चित्रा, १९३९.

## १ : शिल्पकार करमरकर

त्या दिवशीं दिवसभर पाऊस पडत होता. आकाशांत मेघराशींचा अजूनहि खच पडला होता. संध्याकाळीं पाऊस जरासा कमी झाल्यावर, ताडदेव रोडवरील अंधशाळेसमोर असलेल्या करमरकरांच्या स्टुडिओंत मी प्रसन्न चित्तानें पोंचलों. स्टुडिओच्या आवारांत पोंचतांच माझ्या दृष्टीला जें काव्यमय दृश्य दिसलें तें पाहून मी जागच्या जागीं दहापांच सेकंद उभाच राहिलों.

मला पावसाळा फार आवडतो. तशांतून ती रम्य वेळ. एका थोर कलावन्ताची आतां भेट होणार या कल्पनेनें मला कल्पनातीत आनंद झाला होता. समोर मोठी टेकडी, तिच्यावरील हिरवेंहिरवें गवत, एका बाजूला स्टुडिओ आणि दुसऱ्या बाजूला करमरकरांचें राहतें घर, दोन इमारतींमध्यें असलेली चिमुकली बाग, तें नयनमनोहर लॉन आणि बागेंत दिसणाऱ्या करमरकरांच्या कांहीं कलाकृति; जातिवंत कलावंताला कलोपासनेसाठीं योग्य असें तें स्थळ पाहून मी मंत्रमुग्ध झालों यांत नवल नाहीं. परंतु लॉनवर बसलेल्या एका धिप्पाड कुत्र्याच्या भुंकण्यानें माझ्या सुखसमाधीचा भंग झाला आणि आधुनिक युद्धशास्त्रांतील नियमाप्रमाणें, वेळप्रसंग पडल्यास पद्धतशीर पीछेहाट करण्याच्या पवित्र्यांत मी उभा राहिलों. Misfortunes never come singly या न्यायानें एकाऐवजीं दोन कुत्रे मला दिसले. मुजोरी करणारा कुत्रा माझ्यावर चाल करून येण्याच्या तयारींत दिसला, तर दुसऱ्या अबोल प्राण्याला हें चढाईचें धोरण नापसंत वाटून कीं काय, तो बिचारा एखाद्या स्थितप्रज्ञाप्रमाणें माझी शोभा पहात शान्तपणें बसून होता. Dogs that bark, do not bite हें वेदवाक्य मला ठाऊक असलें तरी मला त्या प्राण्याची

भीति वाटणेंहि अगदीं साहजिक होतें. 'भुंकणारे कुत्रे चावत नाहींत' ही आम्हां मानवांत रूढ असलेली म्हण या स्वारीच्या कानावर गेली नसल्यास मात्र माझ्या नुसत्या पुस्तकी ज्ञानानें माझा बचाव खासच होण्यासारखा नव्हता; तशांतून तो दुसरा अबोल कुत्रा तेथें होताच. तो साळसूद प्राणी वरील म्हणीच्या कक्षेंत येत नसल्यानें तोंडाची वाफ विनाकारण भुंकण्यांत खर्च न करतां त्यानें माझा समाचार घेतला असता तर त्या अत्याचाराबद्दल त्याला दोष देण्याची सोय नव्हती; मी अशा आपत्तींत सांपडलों असतां बाहेरची गडबड ऐकून एक मनुष्य बंगल्यांतून बाहेर आला आणि त्या मुक्या आणि बोलक्या संकटांतून त्यानें माझी सुटका केली. ज्या पेंचप्रसंगाला मीं (किंवा कुत्र्यानें) तोंड देण्याची तयारी दाखविली होती, त्या प्रसंगीं 'नाना घरीं नाहींत' असें मला मिळालेलें उत्तर ऐकून त्या कुत्र्याची खासच निराशा झाली असेल. पण ज्या अबोल कुत्र्याची मला खरी भीति वाटत होती तो करमरकरकृत खोटा सिमेंटचा कुत्रा होता.

कांहीं दिवसांनीं मी पुन्हां नानांकडे गेलों. त्यांचा कुत्राहि माझ्याशीं आतां तह करून गोडीगुलाबीनें वागूं लागला होता. माझ्यासारख्या अगदीं सामान्य माणसाला नानांसारख्या असामान्य कलावंतानें पहिल्या भेटींतच जें सौजन्य दाखविलें तें मात्र मी केव्हांहि विसरणार नाहीं. अंगावर लांब पांढरा झगा, हातांत मोजमाप घेण्याचें एकादें यंत्र, आणि मन कुठें तरी दूर दूर अशा अनंत आकाशांत रमलेलें अशा स्थितींत नाना कधीं कधीं दिसतात. दगडांतून मनुष्य निर्माण करणारा हा कष्टाळु कलावंत, दगडाइतकाच निश्चल उभा असलेला मी कांहीं वेळेला पाहिला आहे. बालकाची वृत्ति आणि बालकाचा आनंद नानांमध्यें उत्कटतेनें पहायला मिळतो. इतस्ततः पसरलेल्या संगमरवरी दगडांप्रमाणें असलेलें नानांचें निष्कलंक चारित्र्य आणि त्याच पथ्थराप्रमाणें अभेद्य अशी त्यांच्या मनाची हिंमत कुणाच्याहि नजरेंत भरल्यावांचून रहात नाहीं. नाना अत्यंत निगर्वी असून

रावापासून रंकापर्यंत त्यांचें वागणें सर्वांशीं सारखेंच खेळीमेळीचें असतें. मी त्यांच्याशीं तासन् तास बोललों आहें, पण एकाद्या साहित्यिका-प्रमाणें त्यांच्या तोंडांतून गफलतीनेंसुद्धां स्वतःच्या गौरवाचा एकहि शब्द बाहेर पडलेला मला आठवत नाहीं. मुक्या प्राण्याबद्दल नानांचें प्रेम और आहे. त्यांच्या लाडक्या शेरी कुत्रीला पिलें झाल्यावर नाना तिला डिंकाचे लाडू खायला देतात असें जर कुणी सांगितलें तर मला तें खोटें वाटणार नाहीं. आपला एक आवडता कुत्रा अपघातानें कसा मेला ही हकीगत सांगतांना नानांचे डोळे ओलसर होतात. कांहीं करमत नसलें म्हणजे नाना त्यांच्या या मुक्या दोस्ताशीं हंसत खेळत ‘ गप्पा ’ मारीत वेळ घालवीत असावेत असें मला वाटतें. स्टुडिओंतील कांहीं पुतळेसुद्धां नानांना सुख-दुःखाच्या जुन्या आठवणी आज सांगत असतील. माधुकरीचा पुतळा नानांना विलायतेच्या सफरीचें भिक्षापात्र स्मरणांत आणून देत असेल. ‘ शंखध्वनी ’ पुतळा आपण कलकत्त्याला शंख करीत असतांना जी कठीण स्थिति अनुभविली ती डोळ्यांसमोर आणीत असेल. परि-स्थितीवर विजय मिळविल्यावर जन्मास आलेला ‘ विजया ’चा पुतळा नानांच्या मुखावर समाधानाचें हास्य आणीत असेल. कलकत्त्याचें तें जीवन—अजूनहि ते हाल आठवले म्हणजे नानांच्या अंगावर शहारे येत असतील. कांहीं मोजक्या दक्षिणी आणि बंगाली मित्रांशिवाय नानांसारख्या कलंदर कलावंताला इतर मित्र नव्हते. उत्कृष्ट कला-कृति निर्माण करण्यासाठीं आणलेल्या दगडांनीं माध्यान्हींची कठोर भूक भागण्यासारखी नव्हती. तोंडभर केलेल्या कलेच्या स्तुतीनें पोटभर भाकरी मिळणें शक्य नव्हतें. कर्जाचा बोजा हजारांनीं वाढत गेला. नानांच्या प्रेमळ पत्नीनें इतस्ततः पसरलेल्या दगडां-इतक्याच कठोर सत्यसृष्टींत पतीला आणण्याचा प्रयत्न केला. चहूं बाजूंनीं दर्या खवळलेला, पण निर्धन नानांच्या पत्नीनें प्रपंचाचें चिमुकलें खिळखिळें जहाज दृश्य–अदृश्य संकटांतून सावधगिरीनें

चालविलें होतें; आणि कलोपासक पतीच्या आशा–आकांक्षांची वाताहात होणार नाहीं अशी खबरदारी घेतली होती. दाही दिशांना भयानक अंधार–आकाशांतील कृष्णमेघांमुळें मनाला उत्तेजन देणाऱ्या आशेच्या चांदण्या, आणि उत्कर्षाचा मार्ग अचूक दाखविणारा ध्येयाचा ध्रुवतारासुद्धां दृष्टिआड झालेला होता. परंतु केव्हां तरी सुखाची चांदरात ईश्वर आपल्याला दाखवील ही अस्पष्ट आशा दोघांनाहि होती; आणि म्हणूनच त्यांचा धीर खचला नाहीं. आज नानांना जें अपूर्व यश लाभलें आहे त्याचें बरेंचसें श्रेय पूर्वायुष्यांत पत्नीनें दिलेल्या हिंमतीलाच आहे असें मी म्हटलें तर माझ्यावर अतिशयोक्तीचा आरोप खासच येणार नाहीं. 'यशोदेवता' या नांवाची मूर्ति घडविण्याची लहर कधींकाळीं नानांना आलीच तर मॉडेलसाठीं त्यांना आपल्या पवित्र गृहमंदिराचा उंबरठासुद्धां ओलांडावा लागणार नाहीं.

आयुष्याच्या अशा अटीतटीच्या धकाधकींत नानांच्या आयुष्याला निराळें वळण देणारा यशस्वी क्षण आला. अखिल भारतीय श्री शिवाजी स्मारकाचा प्रश्न उपस्थित होऊन कोल्हापूरच्या गुणग्राही महाराजांनीं शिवाजीच्या अश्वारूढ अजस्त्र अखंड पुतळ्याचें काम या तरुण शिल्पकाराला दिलें. अण्णासाहेब लठ्ठसुद्धां नानांच्या पाठीशीं सहानुभूतीनें उभे होते. एका क्षणापूर्वी कलकत्त्यांत खितपत पडलेल्या दरिद्री करमरकरांचा पत्ता पोस्टमनलाहि ठाऊक नव्हता; पण एका क्षणानें नानांच्या आयुष्यांत क्रान्ति झाली आणि त्यांचें नांव सर्वत्र झालें. नाना थोर—फार थोर कलावन्त म्हणून कीर्तीच्या शिखरावर चढले. हा कालचा पोरगा काय दगड करणार, म्हणून शिष्ट लोक बोलूं लागले. परंतु नानांसारख्या दुर्दम्य आशावादी आणि महत्त्वाकांक्षी कलावन्ताला स्फुरण चढलें आणि क्षणाचाहि विलंब न करतां त्यांनीं त्या यशस्वी क्षणाचा सत्कार केला. इंग्लंडच्या इतिहासांतील तरुण पिटप्रमाणें नाना वागले, आणि त्यांनीं लढाई

जिंकली. नानांच्या जागीं दुबळ्या मनाचा दुसरा एकादा कलावन्त असता तर त्यानें कच खाल्ली असती. परंतु मरेन किंवा मारीन अशा बाण्यानें नाना आखाड्यांत उतरले आणि त्यांना अपूर्व यश मिळालें.

करमरकरांनीं केलेला शिवाजीचा प्रचंड पुतळा म्हणजे शिल्पकलेंतील एक आश्चर्य आहे. इतका मोठा अखंड ओतीव पुतळा जगांत कुठेंहि नाहीं असें म्हणतात. या कार्यासाठीं पी. ॲन्ड ओ. कंपनीनें आपलें वर्कशॉप तीन महिनेपर्यंत नानांच्या ताब्यांत दिलें. शिवाजीचा पुतळा तयार झाल्यावर कंपनीचे लहानथोर अधिकारी थक्क झाले. हा इतका मोठा पुतळा पुण्यास न्यावा कसा हा प्रश्न रेल्वे एजंटला पडला. शिवाजी महाराजांनीं जिवंतपणीं घोड्यावरून खंडाळ्याचा घाट पायाखालीं घातला असला तरी या स्थितींत महाराजांना आपलें घोडें दामटून पुणें गांठणें मुष्किलीचें झालें. परंतु रेल्वेएजंटहि खमंग होता—रेल्वेच्या कर्तबगारीचा आणि इज्जतीचा तो प्रश्न होता. त्यानें निराळा असा सोयीचा डबा तयार केला आणि आपली सर्व पुण्याई खर्च करून अवघ्या आठ तासांत नानांचा शिवाजी घोड्यासकट पुण्यनगरीला नेऊन पोंचविला. पुतळा इष्ट स्थळीं पोंचतांच शिवाजीराजाचें आदरानें स्वागत करायला सर लेस्ली विल्सन आगाऊ वर्दी न देतां त्या ठिकाणीं अनपेक्षितपणानें उपस्थित झाले. सर लेस्ली पुतळा पाहून थक्क झाले. पुतळ्याच्या रोमारोमांत जणूं काय जीवंतपणा ओसंडत होता. महाराजांचा घोडा श्वासोच्छ्वास करीत धन्याच्या हुकुमाची वाट पहातो आहे कीं काय असें सर लेस्ली यांना वाटलें असल्यास नवल नाहीं. घोडा आणि महाराजांचा पुतळा असा कांहीं दिसतो कीं, दुसऱ्या क्षणाला हें स्मारक पहातां पहातां दृष्टीआड होतें कीं काय असें पहाणाऱ्याला वाटतें. गव्हर्नरसाहेबांनीं या अचाट कार्याबद्दल नानांचें अभिनंदन केलें. नानांचा हा प्रचंड विजय पाहून टीकाकार गप्प

झाले. नानांवर झालेल्या टीकांमध्यें खोबरेल तेलांत परतलेली टीका पचविल्याबद्दल नानांना समाधान वाटलें. परंतु शिवाजीचा हा भव्य पुतळा समोर असूनहि, दिल्ली येथील पंचम जॉर्ज बादशहाच्या पुतळ्याचें काम विलायतेला जावें याचें मात्र कुणालाहि आश्चर्य वाटेल. व्हाइसरॉयसाहेब वसाहतीच्या दर्जाबद्दल जरी वेळीं अवेळीं गप्पा मारीत असले तरी त्यांच्या मनांत हिंदी शिल्पकलेबद्दल आदराची वसाहत असलेली दिसत नाहीं. लक्षावधि रुपयांचा प्रश्न उभा राहतो त्या वेळीं मात्र गरीब बिचाऱ्या हिंदी कलावन्ताकडे कुणाचेंच लक्ष जात नाहीं. इंग्लिश कारागिरांनाहि हिंदी कलावन्ताचें हक्काचें काम लाटतां यावें याबद्दल बड्या लाट साहेबांना कोण प्रश्न विचारणार? एकापेक्षां एक असे सरस हिंदी कारागीर जिवंत असतां दिवंगत पंचम बादशहाचें स्मारक करण्याचा मान विलायतेला जावा ही मानहानीची गोष्ट हिंदी कलावन्ताच्या स्मरणांत कायमची राहील.

नानांचा देशाभिमान जाज्वल्य आहे. शिल्पकलेपायीं हिंदुस्थानांतून प्रतिवर्षी परदेशीं जाणारे लाखों रुपये वांचवून आमच्याच लक्ष्मीचे पाय निष्कांचन कलावंताच्या दाराकडे कसे वळवितां येतील याचा विचार नानांना सदोदित सतावून सोडतो. कांहीं हिंदी लक्ष्मीपुत्र हिणकस कलेचे परदेशी नमुने पैसे टिचून इकडे आणतात याची नानांना गंमत वाटते. तसेंच मुंबईच्या आर्ट स्कूलवर हिंदी डिरेक्टर अजूनहि नेमला जाऊं नये याचें नानांना वाईट वाटतें. हा व्यक्तीचा प्रश्न नसून तत्त्वाचा असल्यानें आमच्या तेजस्वी कलावंतांचा होत असलेला हा अपमान यापुढें तरी बंद व्हावा असें नानांप्रमाणें सर्वांना वाटेल; आर्ट स्कूलवर होत असलेल्या खर्चांत तीन चार शाळा काढून कलेचें शिक्षण गरिबांच्या आटोक्यांत आणण्याची एक योजना मुंबई कॉंग्रेस सरकारसमोर आली होती असें म्हणतात. परंतु बाळासाहेब खेरांना त्या योजनेसाठीं विचार करायला वेळ नव्हता कीं काय कोण जाणे—पण तो प्रश्न अधान्तरीं लोंबकळत

पडल्यासारखा दिसतो; यापुढें कॉंग्रेस सरकार अधिकारांत आलें तर या महत्त्वाच्या प्रश्नाकडे बाळासाहेबांचें लक्ष जाईल अशी मला आशा आहे.

कलावंतांच्या परिस्थितीचें प्रतिबिंब त्याच्या कलाकृतींत दृष्टीस पडतें असा नानांचा अनुभव आहे. Modern Art बद्दल त्यांना अतिशय आपलेपणा असून कलेची परिणति हळुहळु त्या दिशेनें होणें अपरिहार्य आहे अशी नानांना आशा वाटते. व्यावसायिक कामें सोडलीं तर कलेसाठीं कला हें ध्येयसुद्धां चुकीचें आहे असें कलोपासकांना म्हणतां येणार नाहीं. समाजाचें व देशाचें पाऊल पुढें पडायला कलावंतांनीं हातभार लावला तरी एक वेळ अशीहि येण्याचा संभव आहे कीं, कलावंतांना 'कलेसाठीं कला' या ध्येयाचा आधार घ्यावा लागेल. हिंदी संस्कृतीमध्यें चित्रकलेचा, शिल्पकलेचा प्रवाह प्रामुख्यानें असला पाहिजे म्हणून कलावंतांनीं प्रवाहपतित न होतां कलेचा स्वतंत्र संदेश जनतेला समजून देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यासाठीं, जगाशीं फटकून वागण्याची वृत्ति सोडून प्रत्येक कलावंतानें भोंवतालच्या जगांत चाललेल्या चळवळींची निदान तोंडओळख तरी ठेवायला हवी. मामुली कलोपासकाचा वाङ्मयपरिचय साधारपणें इतका अल्प असतो कीं, चारचौघांत अशा लोकांना बुजल्यासारखें वाटतें. कलोपासकांतील सामाजिक संबंध प्रेमाचे व्हावेत म्हणून मागें नाना या ना त्या निमित्तानें मधून मधून अल्पोपहाराचा योग जुळवून आणीत. परंतु अशा समारंभाचें आमंत्रण मला बरेच दिवसांत आलें नाहीं यावरून हा 'गोड' उपक्रम नानांनीं बंद केला असावा असें वाटतें. नानांचें स्वतःचें वाचन फार नसलें तरी थोडेंहि नाहीं. त्यांच्याकडे रसिक मित्रांची ये जा असल्यानें समाजांतील घडामोडींची दाद त्यांना साधारणपणें असते. सयाजीराव गायकवाड यांचा नानांवर फार लोभ असे. मुंबईंत असतांना महाराज नानांकडे मधून मधून जात असत. अगदीं अखेरच्या आठवड्यांत एका गरीब व शूर शिकारी मुलाचा पुतळा करमरकरांच्या हातून व्हावा आणि तो आपण डोळे

भरून पहावा असें महाराजांना वाटलें व त्या पुतळ्याचें काम त्यांनीं नानांना दिलें. आयुष्याची घटका भरत चालली असतांना, तो पुतळा आपणांस दिसेल असें महाराजांना घटकाभर वाटलें—परंतु पुतळ्याचा तो योग 'घडून' येण्यापूर्वीच महाराजांचें परलोकीं प्रयाण झालें आणि एका गरीब मुलाचें कौतुक करण्याची त्यांची इच्छा अतृप्त राहिली.

नानांनीं आजपर्यंत अनेक लहानमोठीं कामें केलीं. त्यांच्या कलेवर कांहीं अमेरिकन मित्रांचा इतका विश्वास आहे कीं, मिल्टन कॉलेजचे प्रिन्सिपॉल मि. विल्यम क्लिफ्टन डलॅन्ड यांचा पुतळा त्यांनीं मुद्दाम नानांकडून करवून घेतला. हा उत्कृष्ट पुतळा एका साध्या फोटोवरून करण्यांत आला ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. अमेरिकेंतील विसकॉन्सी स्टेटमधील मेडलियन मिल्टन कॉलेजच्या वाचनालयांत आज तो पुतळा हिंदुस्थानची आणि उत्कृष्ट हिंदी शिल्पकलेची ओळख प्रत्येकाला मुकाट्यानें करून देत असेल. परंतु एकंदरीनें व्यावसायिक कामांचा नानांना कंटाळा आला असावा असें वाटतें. प्रपंचाची नीट व्यवस्था लागल्यावर, श्रीमंत गिन्हाइकांचीं 'डोकीं करण्याचीं' कामें सोडून सासवणांतील आपल्या आवडत्या बंगल्यांत निसर्गाच्या सान्निध्यांत, पक्षांच्या मंजुळ गायनांत, धकाधकीच्या जगापासून दूर दूर अशा नितान्तरम्य स्थलीं, वायुलहरींच्या साथीवर हा लहरी कलावन्त आयुष्याच्या शान्त संध्यासमयीं कलेची सेवा स्वतःच्या तत्त्वाप्रमाणें करणार आहे—नानांचें आजचें हें जागृतावस्थेंतलें सुखस्वप्न आहे.

चित्रा, १९३९.

# ३ : संजीवनी मराठे

"हें पहा कोल्हटकर, तुम्हांला संजीच्या कविता हव्या असतील तर तिच्या वडिलांनाच तुम्हांला विचारावं लागेल." संजीवनीच्या एका मैत्रिणीनें मला सांगितलें.

" पण असं पहा—मला तुमच्या संजीला मागणी घालायची नाहीं, तिच्या कविताच फक्त मला हव्या आहेत." मी उत्तर केलें.

संजीवनीच्या विवाहपूर्व आयुष्याचें सर्व सार वरील वाक्यांत आहे. वडील मंडळींच्या दृष्टींतून जगाकडे पहाण्याची शिकवण तिला लहानपणापासून मिळाली होती. वडील माणसांना आवडतील असे कपडे करायचे, त्यांच्या 'अध्यक्षतेखालीं' इतरांची गांठभेट घ्यायची, त्यांच्या नजरेखालून पत्रव्यवहार करायचा आणि शक्य तों आपल्या प्रेमळ पित्याच्या हळुवार मनाला त्रास होणार नाहीं असें वागायचें असा संजीवनीचा विवाहापर्यंतचा कार्यक्रम होता. मी 'संजीवनी' पत्र काढलें त्या वेळीं संजीवनीची व माझी ओळख नसली तरी तिला बरें वाटावें म्हणून मी तिचें नांव माझ्या पत्राला दिलें असें कांहीं 'आहे ब्बुवा' वृत्तीच्या लोकांना वाटून त्यांनीं माझी त्याबद्दल थोडीशी थट्टाहि केली. संजीवनी प्रसिद्ध होईपर्यंत संजीवनीला मी पाहिलेंसुद्धां नव्हतें. तिच्या कविता त्या वेळीं प्रसिद्ध होत असत आणि तिचें काव्यगायन रसिक महाराष्ट्राला आवडत असे, इतकीच मला तिची माहिती होती. परंतु एका कवीचें एकदां काव्यगायन (?) ऐकल्यापासून मला त्याचा एक प्रकारचा धसका बसला असून, संजीवनीचें कवितागायन श्रवणीय आणि प्रेक्षणीय असूनहि मी तिच्या वाटेस चुकूनहि गेलों नाहीं. परंतु तिच्या कविता माझ्या पत्रांत प्रसिद्ध व्हाव्यात असें मला वाटणें अगदीं सहाजिक

होतें. परंतु तिच्या भेटीच्या मार्गांत असलेल्या अडचणी पाहून स्वस्थ बसण्यापलीकडे मला कांहींच करतां येणें शक्य नव्हतें. अखेरीस मी मनाचा धडा केला आणि या तरुण कवयित्रीची भेट घेण्याचें ठरवून भीतभीतच मी एक दिवस तिच्या वडिलांकडे गेलों. गणपतरावांनीं माझें प्रेमानें व सन्मानानें स्वागत केलें आणि 'ए संजे' म्हणून मोठ्यानें हांक मारली. एकदोन मिनिटांतच समोरचा पडदा बाजूला सारून एक हंसतमुख, तरतरीत, मोहक आणि भावनावश बाला माझ्यासमोर उभी राहिली—लांकडी चौकटींत बसविलेल्या नयनमनोहर चित्रावरील रेशमी पडदा बाजूला सारल्यावर तें पाहून आपल्याला जसा अननुभूत आनंद होतो तसा आनंद मला त्या वेळीं झाला. महाराष्ट्राची ही आवडती कवयित्री त्या वेळीं तारुण्याच्या मंगल सीमाप्रान्तांत पदार्पण करीत होती—तिच्या नसानसांतून तारुण्यसुलभ चैतन्य सळसळत होतें. तरुणपणाचें रक्त शरीरांत खेळत असल्यानें तिच्या आरक्त मुखावरील गोड स्मित कुणालाहि मोह पाडील असें होतें. तिचे भावदर्शी डोळे कांहीं तरी शोधीत असावेत असा मला त्या वेळीं भास झाला. बुद्धिमत्ता आणि भावना यांचा गोड संगम तिच्या प्रशान्त मुखमंडलावर स्पष्टपणें दिसून येत होता. अशा संजीवनीला पाहिल्यावर मात्र, या अमोल कन्यारत्नाला विमा न उतरल्यागत इतक्या कडक शिस्तीनें गणपतराव कां जपतात याची मला चांगली कल्पना आली. आमची औपचारिक मुलाखत दोनतीन मिनिटांत संपून संजीवनी पडद्याआड गेल्यावर, क्षणमात्र चमकून ढगाआड अदृश्य होणाऱ्या विद्युल्लतेची मला आठवण झाली. त्या दिवसापासून संजीवनीच्या कविता माझ्याकडे येऊं लागल्या. तिच्या व माझ्या गांठीभेटी मात्र फारशा होत नसत. तिच्या बाबांच्या मनाविरुद्ध तिची भेट घेऊन तिला त्रास होईल असें करण्यांत कांहीं अर्थहि नव्हता. मला संजीवनी नको होती—

तिच्या कविता मला हव्या होत्या, आणि त्या मला गणपतरावांकडून मागणीप्रमाणें मिळतहि असत.

संजीवनी लहानपणापासून अतिशय साधीभोळी अशी आहे. रंगीबेरंगी कपडे करून फुलपांखराप्रमाणें घरांत भिरभिरणारी इवलीशी 'संजी' सर्वांचा जीव कीं प्राण असे. इतर भावंडांनीं तिला बनविलें तरी तें तिच्या लक्षांत येत नसे. फार काय—पण केशरी रंग लाल आहे कीं पिवळा आहे हेंसुद्धां ती आपल्या भावंडांच्या मताधिक्यावरून ठरवीत असे! लोकशाहीवर इतका अढळ विश्वास ठेवणारी ही चिमुकली पोर अद्वितीय तर खरीच. संजीवनीच्या रम्य बालपणांतील अनेक गमती तिची थट्टेखोर अक्का सांगते तेव्हां मला फार मजा वाटते. ( कांहीं लोकांच्या मतें ) माझी ओळख असूनहि, जग हें सज्जनांनीं भरलें आहे अशी संजीवनीची परवांपर्यंत प्रामाणिक श्रद्धा होती. लहानपणीं ' भेंड्या ' खेळण्यांत संजी फार पटाईत असे. एकदां ' थ ' आद्याक्षर असलेली कविता म्हणण्याची वेळ आली असतां

**थापा मारिति बाबा दारावरती म्हणून मी उठलें ।**
**धांवत धांवत जाउनि लगबगिनें त्यांस दार उघडियलें ॥**

ही कविता बसल्या बैठकीला तयार करून या बाईसाहेबांनीं त्या पेचप्रसंगांतून आपली सुटका मोठ्या युक्तीनें करून घेतली. कवितेची ही हुकमी कसरत पाहून संजीवनीचीं इतर भावंडें चकित झालीं व ही मुलगी केव्हां कविता करील याचा नेम नाहीं अशी सर्वांनीं धास्ती घेतली. आपल्या लाडक्या लेकीच्या या गुणाचें कौतुक करून गणपतरावांनीं तिला उत्तेजन दिलें नसतें तर कवितादेवीच्या पवित्र मंदिरांत संजीवनीला हक्कानें प्रवेशच करतां आला नसता. काव्य आणि काव्यगायन यांमुळें संजीवनीच्या दृष्टिपथांत यशाचीं नवीं नवीं क्षितिजें येत गेलीं त्याचें श्रेय तिच्या हौशी वडिलांनाच दिलें पाहिजे. तिला योग्य तें उत्तेजन देऊन नांवलौकिकाचा सोपान चढविण्यांत

गणपतरावांनीं जी मदत केली तिजबद्दल संजीवनी आजहि आपल्या बाबांना मोठ्या अभिमानानें धन्यवाद देत असते.

वडील मंडळीच्या दृष्टींतून मुलें सदासर्वदा जगाकडे पाहूं शकत नाहींत याची जाणीव संजीवनीनें आपल्या वल्लभाची निवड करून आपल्या शिस्तप्रिय पित्याला करून दिली. तारुण्याच्या मादक वातावरणांत संजीनें प्रवेश केल्यावर तिला सहाजिकच स्वतंत्र दृष्टि प्राप्त झाली आणि तिच्या मर्यादित जगांत आपल्यावर अमर्याद प्रेम करणारा पति तिनें निश्चित केला. पतीसारखें जवळचें नातें निर्माण करणारा तिचा वल्लभ दूरचा नातेवाईक असल्यानें त्यांच्या गांठी-भेटीवर वडीलधाऱ्या माणसांची करडी नजर असण्याचें कारण नव्हतें. समाजांत स्वतंत्र अशी फार ओळख नाहीं, आयुष्याचा संवगडी शोधण्याचें वय, आणि एका धडपड्या, महत्त्वाकांक्षी व उमद्या तरुणाचा सहवास यांचा व्हायचा तोच परिणाम झाला आणि वडिलांच्या इच्छेविरुद्ध या रमणीवल्लभांनीं विवाहबद्ध होण्याचें ठरविलें. राम मराठे कांहीं दृष्टींनीं गणपतरावांच्या तोलाचा नव्हता, तरी संजीवनीच्या जीवनांत राम आणण्यासारखें त्याच्यांत कांहीं तरी होतें. संजीचा राम जगाच्या धकाधकींतून आपला मार्ग धीमेपणानें आक्रमीत होता. गरीब पतीबरोबर जन्मभर कष्ट उपसावे लागून तिच्या महत्त्वाकांक्षेचे मनोरम मनोरे जमीनदोस्त होतील असा धाकहि संजीच्या कांहीं हितचिंतकांनीं तिला दाखविला. परंतु विवाहोत्तर येणाऱ्या संकटांनीं राम म्हणायची वेळ आली तरी आपल्या रामला सोडण्यास संजीवनी तयार झाली नाहीं. हृत्प्रान्तावर प्रीतीची गुलाबी पताका डौलानें डोलत असतां, शरणागतीचें पांढरें निशाण घेऊन ध्येयनिष्ठ संजीवनी परिस्थितीशीं तह करण्यास तयार झाली नाहीं, आणि वडिलांचें घर सोडून ती मानी मुलगी आर्थिक स्वातंत्र्यासाठीं बाहेर पडली. ज्यांनीं आपल्यावर जीवापलीकडे प्रेम केलें, ज्यांनीं आजपर्यंत आपल्या खस्ता खाल्ल्या—त्या आईबाबांचें घर सोडतांना

संजीवनीला किती वाईट वाटलें असेल याची मला पूर्ण कल्पना आहे. पण तो झगडा बापलेकीचा नसून एका विशिष्ट तत्त्वासाठीं नव्या-जुन्या पिढीची ती रस्सीखेच होती. बापलेक आपापल्या तत्त्वाला प्रामाणिकपणानें चिकटून होतीं. दोघांच्याहि अंतःकरणाला निरतिशय प्रेमामुळें पीळ पडत असला तरी उभयतांच्या मानी मनाचा पीळ कायम होता. तत्त्वपालनाच्या दिव्य कसोटीला दोघेंहि उतरलीं आणि बापलेकींचे आयुःप्रवाह कांहीं काल तरी नाइलाजानें दूरावले. त्या आणीबाणीच्या प्रसंगीं संजीवनीच्या बाबांनीं दाखविलेलें प्रेम, मनाचा समतोलपणा आणि त्यागवृत्ति यांजबद्दल संजी आजहि फार आदरानें बोलते. गणपतरावांसारख्या करारी माणसानें संजीचा विरह जरी कणखरपणानें सहन केला असला तरी तिच्या आईची स्थिति मात्र फारच केविलवाणी झाली असेल. जेवतांना समोरचा संजीचा ओळखीचा पाट रिकामा पाहून भात कालवितांना तिच्या पोटांत कालवाकालव झाली असेल. शेजारच्या आंबराईतून कानावर येणारें कोकिलकूजन संजीच्या काव्यगायनाची तिला आठवण करून देत असेल. चैत्रांत हळदीकुंकवाला जातांना आपली लाडकी लेक कोपऱ्यांतील सीटवर नाहीं हें पाहून तिच्या प्रेमळ मातेनें कुणालाहि दिसणार नाहीं अशा बेतानें अनेक वेळेला डोळ्यांत उभे रहाणारे अश्रु पदरानें टिपून घेतले असतील. बाजारांतून जातांना तऱ्हेतऱ्हेचीं पातळें पाहून तिला आपल्या हट्वादी मुलीची आठवण झाली असेल.

एक–दीड वर्षानंतर संजीवनीचा विवाह मध्यप्रान्तांतील सागर या गांवीं झाला आणि त्या तरुण जोडप्यानें आपल्या जीवनाची नौका संसारसागरांत लोटली. रामनें कांहीं काळ पंजाबमध्यें नोकरी केल्यावर हें प्रणयी पंजाब प्रकरण मुंबईला येऊन सुखानें नान्दूं लागलें. रामचा उद्योग चालू असून दुर्दम्य आशावाद त्याच्या पाठीशीं उभा आहे. संजीवनीचें काव्यगायन रेडिओवर मधून मधून ऐकायला येत असतें, व तिची काव्यनिर्मितीहि अखंड चालू आहे. मुंबईला आल्यापासून

संजीवनीला तिच्या प्रेमळ अक्काचा सहवास घडत असल्यानें तिचा वेळ फारच मजेंत जात असतो. आजकालच्या फटकून वागण्याच्या जमान्यांत दोन बहिणी एकमेकींशीं निर्मल भगिनीप्रेमानें वागूं शकतात ही गोष्ट नवलाईची तर खरीच. या दोन बहिणी पाहिल्या म्हणजे भावना व बुद्धिमत्ता सुंदर स्त्रीरूपानें आपल्यासमोर उभ्या आहेत असें मला वाटतें. संजी, अक्का आणि राम यांचा एकाद्या विषयावर वादविवाद सुरू झाला म्हणजे, व्यवहारांत फारशी तावून सुलाखून तयार न झालेली संजीवनी अगदीं केविलवाणी होते.

शक्य तितकें शिक्षण झालें, मनासारखा पति मिळाला, जरा जादा इमानानें संसार केल्यामुळें तिच्या घरट्यांत दोन इवल्याशा पाखरांची गोड चिवचिव सुरू झाली—परंतु संजीच्या मनाचें पूर्ण समाधान झाल्याचें दिसत नाहीं. कर्वे कॉलेजच्या मुलींना हेटाळणीनें नाक मुरडणारे अनेक लोक आज असतील. परंतु याच कॉलेजांतून प्रत्यहीं बाहेर पडणारीं मानी व तेजस्वी रमणीरत्नें मी पाहिलीं आहेत—संजीवनी त्यांपैकींच एक आहे. ती जात्याच भावनाप्रधान, आणि त्यांतून वामनराव जोश्यांसारख्या ऋषितुल्य प्राध्यापकाच्या पवित्र सहवासांत घेतलेल्या शिक्षणाचे संस्कार—यामुळें केवळ संसार हें एकमेव क्षेत्र तिच्या आकांक्षांना अपुरें पडत असल्यास नवल नाहीं. श्रीमंत पित्याच्या कल्पवृक्षाखालून संजीवनी आतां परि-स्थितीच्या रुक्ष व तापदायक वाळवंटांतून प्रवास करीत आहे. समाजां-तील भल्याबुऱ्या जीवनाचा तिचा आज अभ्यास सुरू आहे आणि गरिबांना दुनियेंत किती कष्टानें जगावें लागतें याची तिला नीटशी कल्पना आलेली आहे. आपल्याला गरिबांसाठीं कांहींच का करतां येणार नाहीं याची तीव्र तळमळ संजीवनीला आज लागलेली आहे. सुदैवानें रामहि तिच्याच मताचा असल्यानें, संजीच्या मनाला पटेल असा कोणताहि सामाजिक प्रयोग तिनें करण्यास त्याची तिला पूर्ण परवानगी आहे. व्यवहारांतील अनुभवांचे कडवट घोट घशाखालीं उतरत

असतां संजीवनीचें जीवन आज बेचैन झालें आहे. आपण शिकलों, आपला संसारहि म्हणण्यासारखा धकाधकीचा नाहीं, अंगांत धमक व मनाला उत्साह आहे—तेव्हां आपलें आयुष्य सत्कारणीं कसें लावतां येईल हा प्रश्न संजीवनीपुढें आज प्रामुख्यानें खडा आहे. कविता करतांना, रसिक रामबरोबर रानावनांतून आनंदानें भटकतांना, आपल्या दोन मुलांशीं खेळतांना, आणि सुखाच्या इतर वेळींसुद्धां तिच्या मनाला सामाजिक कार्याविषयीं तळमळ लागलेली दिसते. प्रत्येक गोष्टीचा ठाव घ्यावा, प्रत्येक सामाजिक अन्यायाच्या मुळाशीं जाऊन त्यावर उपाययोजना करावी, गरिबांच्या कष्टाच्या जीवनावर सहानुभूतीची फुंकर मारून तें त्यांना सुसह्य होईल असा प्रयत्न करावा, आणि या नाहीं त्या मार्गानें आपण गरिबांच्या उपयोगीं पडावें ही संजीवनीची या घटकेची महत्त्वाकांक्षा आहे. तिचा संसार पूर्ण सुखाचा आहे. ती आपल्या रामशीं इतकी एकजीव झालेली आहे कीं एकमेकांचीं मनें एकमेक पूर्णपणें ओळखतात. रामला माहीत नाहीं असा एकहि कप्पा संजीच्या मनांत आज नाहीं. आपल्या हातून झालेली प्रत्येक बरीवाईट गोष्ट ती आपल्या पतीला विश्वासानें सांगत आली असल्यानें, या तरुण दंपतीची दिलजमाई आजन्म कायम राहील यांत शंका नाहीं. परस्परांवरील विश्वास हा वैवाहिक जीवनाचा पाया असल्यानें, त्यावर आधारलेला राम–संजीचा सुखी संसार पाहून कुणालाहि सात्त्विक आनंद वाटेल. संजीवनी आपल्या मुलांशीं बोबडें बोलून खेळत असतां, त्यांच्यांत लहान कोण असा मला कांहीं वेळेला प्रश्न पडतो. मुलांना 'तोतो मंमं' घालून वत्सलरसांत न्हालेलीं अंगाईगीतें आपल्या गोड गळ्यानें गाऊन त्या अबखळ जीवांना थोपटून निजविणारी संजीवनी मला मातृदेवतेचें पवित्र प्रतीक वाटते. राम कामावर जातांना सस्मित मुखानें त्याला 'आवजो' म्हणून प्रेमानें निरोप देणारी आणि तो कामावरून दमूनभागून परत आल्यावर त्याचें उत्साहानें स्वागत करून नुसत्या नजरेनें त्याचा शीण

क्षणांत नाहींसा करणारी हंसरी संजीवनी पाहिली म्हणजे कुणालाहि समाधान वाटेल. गृहकृत्यांतसुद्धां संजीवनीची आज बरीच प्रगति झाली असावी असा माझा तर्क आहे. दोनतीन वर्षांपूर्वी तिच्याकडे जेवायचा प्रसंग माझ्यावर गुदरला असतां, जणुं काय स्त्री-मासिक समोर ठेवून तिनें केलेला स्वयंपाक चाखून पाहिल्यावर, नावडतीचें मीठ अळणी असें म्हणण्याची संजीच्या शत्रूंचीसुद्धां छाती झाली नसती. परंतु नंतर झालेल्या माझ्या रोटीव्यवहारांत संजीच्या संसारांतील मिठाचें राजकारण बरेंचसें आटोक्यांत आल्यानें तिनें केलेल्या पदार्थांना आनंदानें तोंड देण्याची माझी आज तयारी झाली आहे. या बाबतींत तिची कुणी चेष्टा केली तरी ती चिडत नाहीं, रागावत नाहीं—हंसून सर्व गोड करते. पण या सर्व सात्त्विक आनंदाच्या पडद्याआड संजीवनीचा भावनासागर वरखालीं होत असतो ही गोष्ट मी कधींहि विसरत नाहीं. आपल्याशीं बोलतांना, हंसतांना ही तरुण कवयित्री कांहीं वेळेला अकारण गंभीर होते, तिचा चेहरा गोरामोरा होतो—आणि ही आशावादी, भावनावश व महत्त्वाकांक्षी सदाफुली चहा करण्याच्या निमित्तानें गाण्याची गोडशी लकेर मारून स्वयंपाकघरांत एकदम अदृश्य होते.

नवयुग, १९४१.

## ४ : र. लु. जोशी

"काय रावसाहेब, हपिसचं कुलुप कुठं आहे?"

"तुमच्यासमोर आहे ना तें."

"अस्सं होय......! मला वाटलं......"

"कीं तें माझ्या तोंडाला ठोकायचं कुलुप आहे म्हणून. असंच ना!" माझें वाक्य पूर्ण करून रावसाहेब खूप जोरानें हंसले आणि माझ्या पाठीवर थाप मारून त्यांनीं मला एक सिगरेट दिली. हें सर्व करीत असतां 'मग परिषदेचे सभासद केव्हां होणार तुम्ही?' हा त्यांचा ठराविक प्रश्न मला विचारण्यास मात्र रावसाहेब विसरले नाहींत. र. लु. म्हणजे महाराष्ट्र-साहित्य-परिषद हें समीकरण ज्यांना माहीत आहे त्यांना रावसाहेबांच्या या नेहमींच्या प्रश्नाचें आश्चर्य वाटणार नाहीं. सत्यसृष्टीप्रमाणें स्वप्नसृष्टींतहि रावसाहेबांना परिषद दिसत असेल अशी माझी खात्री आहे. डॉ. भालेरावांसारख्या चैतन्यमूर्तींशीं रावसाहेबांची बातचीत होत असेल; विठ्ठलराव घाट्यांशीं माधवराव पटवर्धन स्मारकाविषयीं वाटाघाटी होत असतील; गं. दे. खानोलकर हंसतांना दिसत असतील; नाना रानड्यांच्या गद्यवैभवानें आणि विनोदनिर्मितीनें रावसाहेबसुद्धां चकित होत असतील; अप्पांचा 'झंकार' घेऊन महाराष्ट्राचा आतां उद्धार झाला या उन्मादांत कृष्णराव मराठे अभिनंदनाची सभा घेण्याबद्दल राव-साहेबांना गळ घालीत असतील; आणि एकादा कॉमरेड—भाई लेखक रावसाहेबांची सिगरेट न ओढतां आपलें पाकीट बाहेर काढण्याचें औदार्य उजळ माथ्यानें दाखवीत असेल;—स्वप्नसृष्टीशिवाय वरील चमत्कार इतरत्र होणें शक्य नाहीं असें मला वाटतें.

डेक्कन जिमखान्यावरील आपल्या राहत्या घरांतून रावसाहेब

सकाळ–संध्याकाळ टिळक • रोडवरील साहित्यमंदिरांत नियमानें येतात. साठ वर्षांपेक्षांहि जास्त वयाचें ओझें रावसाहेबांच्या शिरावर आज असल्यानें, त्यांची कृश शरीरयष्टि किंचित् वांकलेली दिसते. अंगांत एक साधा सूट, हातांत सिगरेट आणि काखोटीला साहित्य-परिषदेचें लहानसें हपिस घेऊन कशाचा तरी विचार करीत ही सावकाश चाललेली स्वारी पाहिली म्हणजे सौजन्याचें, कर्तव्याचें आणि प्रेमळपणाचें 'चालतें बोलतें' प्रतीक समोर चाललें आहे असें पाहणाऱ्याला वाटतें. माझी आणि रावसाहेबांची ओळख झाल्यापासून माझ्या फटकळ स्वभावामुळें मी त्यांच्याशीं अधूनमधून अतिप्रसंग करीत असतों, तरी ते रागावल्याचा एकहि प्रसंग मला आठवत नाहीं. त्यांचा व साहित्याचा ऋणानुबंध वाचक या नात्यापलिकडे कधींकाळीं येईल याची कल्पना त्यांनाहि कांहीं वर्षांपर्यंत आली नसेल. रावसाहेबांची सारी हयात पोस्टासारख्या रुक्ष नोकरींत गेली असली तरी ही स्वारी चांगलीच रसिक आहे. सिमला, लाहोर, पेशावर वगैरे ठिकाणीं असतांना मराठी बोलणारे कुणी भेटतात कीं काय या पत्त्यावर रावसाहेब नेहमीं असत. र. लु. प्रॉटेस्टंट ख्रिस्ती असल्यानें, नोकरीच्या अव्वल अमदानींत मुंबईतील जनरल पोस्टांतील कॅथॉलिक कारकुनांचा सासुरवास त्यांना सहन करावा लागे; आणि हिंदु कारकून तर रावसाहेबांना 'बाटे' म्हणून त्यांचा उघड उघड अपमान करीत. परंतु अशा विरोधी वातावरणांतहि रावसाहेबांच्या चित्ताची शान्ति ढळली नाहीं. आपल्या सहकाऱ्यांवर न रागावतां, आपलें काम संभाळूनहि रलु इतरांना मदत करीत. या त्यांच्या दिलदार आणि खिलाडू वृत्तीमुळें हा गृहस्थ आपल्या ऑफिसांत इतका लोकप्रिय झाला कीं, त्यांची मुंबईहून बदली झाल्यावर या बावनकशी 'बाट्या'ला सर्वांनीं एक सोन्याची अंगठी नजर केली. गेलीं पस्तीस वर्षें रावसाहेबांनीं ही अंगठी आपल्या बोटावर मोठ्या प्रेमानें आणि अभिमानानें खेळविली आहे.

रावसाहेबांच्या आयुष्यांत धकाधकीचा मामला फारसा नसल्यानें, त्यांचा जीवनप्रवाह आजपर्यंत अगदीं संथपणानें चालला आहे. कर्तबगार पत्नीच्या प्रेमळ सहकार्यानें रावसाहेबांचा संसार फार सुखाचा झाल्याकारणानें प्रत्येकानें वेळेवारी संसारांत पडून सुखी व्हावें असें त्यांना मनापासून वाटतें. माझें एकाकी जीवन पाहून रावसाहेबांना वाईट वाटतें. मी अजूनहि विवाहबद्ध व्हावें असा डॉ. केतकरां-प्रमाणें रखु मला नेहमीं आग्रह करतात. या बाबतींत रावसाहेब मला इतके जीव तोडून सांगतात कीं, त्या क्षणीं त्यांच्या हाताशीं एकादी दुर्दैवी तरुणी असेल तर ती माझ्या माथीं मारून तिच्या-बरोबर माझाहि कपाळमोक्ष करायला हा म्हातारा मागेंपुढें पाहणार नाहीं. माझें लग्न व्हावें ही रावसाहेबांची इच्छा या जन्मीं तरी पूर्ण होईल असें मला वाटत नाहीं. आयुष्याच्या उतरणीला लागलेल्या माझ्यासारख्या अपेशी निष्कांचन माणसाशीं निशापाणी केल्याशिवाय उघड्या डोळयांनीं विवाहबद्ध होण्यासाठीं तयार असलेली मूर्ख मुलगी ईश्वरानें अजून जन्मालाच घातली नाहीं हें रावसाहेबांसारख्या भाबड्या जीवाला समजत नाहीं हा दोष माझा खास नव्हे.

रावसाहेबांना निसर्गोपचाराची चांगली माहिती असून आपल्या ज्ञानाचा फायदा त्यांनीं यापूर्वीं अनेकांना दिलेला आहे. या मार्गानें पैसा किंवा कीर्ति मिळविण्याची त्यांची केव्हांहि इच्छा नव्हती. पेणसलींत निघाल्यावर त्यांनीं निसर्गोपचाराचें एक लहानसें इस्पितळ सुरत येथें काढलें होतें. परंतु 'रोती' सुरत घेऊन आलेले रोगी रावसाहेबांच्या उपचारांनीं हंसतमुखानें इस्पितळांतून बाहेर जात असले तरी खर्चाचें प्रमाण आटोक्याबाहेर गेल्यानें त्यांना सुरतेहून गाशा गुंडाळून पुण्याला पळ काढावा लागला. आरोग्याच्या बाबतींत निसर्गाची माझ्यावर चांगलीच कृपा असल्यानें रखूंच्या निसर्गोप-चाराचा फायदा घेण्याचा प्रसंग माझ्यावर अजूनहि आलेला नाहीं. तरी पण रावसाहेबांचें साहित्यिकांत बसणेंउठणें असल्यानें कांहीं कवि,

आपल्या भसाड्या आवाजांत बेसूर काव्यगायन करणारे प्रथितयश प्राणी, ख्यातनाम 'ठरविलेला एकादा धटिंगण टीकाकार, स्वतःचा वेडावांकडा फोटो छापण्याचें वेड असलेले कांहीं अलबते गलबते वगैरे 'केसेस'वर रावसाहेबांनीं आपले निसर्गोपचार चालविले तर त्या सर्वांचीं अनैसर्गिक दुखणीं बरीं होऊन त्यांच्या तडाक्यांतून उभ्या महाराष्ट्राची सुटका तरी होईल.

पुण्यांत आल्यावर रावसाहेबांनीं परिषदेचें कार्य अंगावर घेतलें आणि या क्षणापर्यंत त्यांच्या हातून तें काम एकनिष्ठपणानें होत आहे. त्यांना बोलण्याचा विलक्षण नाद असला तरी परिषदेबद्दलची त्यांची कामगिरी एका अर्थानें 'अबोल' आहे. प्रसिद्धीची हांव नाहीं, मानासाठीं तडफड नाहीं, आणि कोणी कांहीं टीका केली तरी तिची फारशी फिकीर नाहीं असें रावसाहेबांचें धोरण असल्यामुळेंच त्यांच्या हातून आज भरीव कामगिरी झालेली दिसून येते. परिषदेचें काम हातीं घेतल्यापासून रावसाहेबांनीं सभासदांचा आंकडा सव्वादोनशें-पासून जवळ जवळ हजारापर्यंत नेला या एकाच गोष्टीवरून हातीं घेतलेल्या कार्याबद्दल त्यांची तळमळ दिसून येते. सभासद वाढ-विण्याच्या मोहिमेवर रावसाहेब निघाले म्हणजे ते अगदीं 'बोलतां बोलतां' आपली शिकार साधून घेतात. प्रत्येक साहित्य-संमेलनाला रावसाहेब चारदोन दिवस आधीं जाऊन सूप वाजल्यावर सर्व कांहीं अलबेल आहे अशी स्वतःची खात्री पटल्यानंतर ते आपला मुक्काम हलवितात. त्यांची सदा हंसरी आणि बोलकी परिचित मूर्ति सर्वांनाच सारखी प्रिय असते. संमेलन आणि परिषद्-वाद कायमचा निकालांत लावण्यांत ज्या लोकांचे परिश्रम कारणीभूत झाले त्यांत आमच्या रत्नूंना अग्रपूजेचा मान द्यावयास हवा.

पोस्टाचा आणि साहित्याचा संबंध आलेल्या मामा वरेरकरांप्रमाणें रावसाहेबसुद्धां खूप खूप बोलतात. दोघांचींहि तोंडें पोस्टाच्या पेटी-सारखीं सदासर्वदा उघडीं असतात. परंतु मामांच्या बोलण्यांतील कटकट

ऐकून त्यांच्यांत पोस्टाप्रमाणें तारखातेंहि सामील आहे असें आपल्याला वाटतें, तसें रावसाहेबांशीं बोलतांना वाटत नाहीं. आपल्या वाक्प्रवाहांत श्रोत्याऐवजीं स्वतःच वाहवत जाण्याची कला दोघांनींहि चांगलीच तोंडपाठ केलेली दिसते. रावसाहेबांचें बोलणें नवाकाळ, पूर्णिमा, झंकार वगैरे पत्रांप्रमाणें कंटाळवाणें वाटलें तरी त्यांचें मन अगदीं पोस्टकार्डाप्रमाणें आहे; आंत—बाहेर असें त्यांत कांहींच नसतें, आणि म्हणूनच पत्ता चुकलेल्या पत्राप्रमाणें ते अवचित येऊन समोर उभे राहिले तरी ते कधींहि नकोसे वाटत नाहींत. आपल्या सौजन्यामुळें एरव्हीं मनीऑर्डरप्रमाणें वाटणारे रावसाहेब, परिषदेच्या कामगिरीवर निघाले म्हणजे व्ही. पी. सारखे भासतात. साहित्य-क्षेत्रांत अनेक वर्षें वावरत राहिल्यानें रावसाहेबांच्या स्वभावांत सर्कशींतील रिंगमास्तरचा खंबीरपणा आणि वेड्यांच्या इस्पितळांतील रखवालदाराचा शान्तपणा आला आहे. साहित्य-परिषदेच्या कामांतील यशाचें रहस्य त्यांच्या याच दोन गुणांत सांठविलें आहे असें मला वाटतें.

आयुष्याचा खेळ धीमेपणानें आणि प्रामाणिकपणानें खेळल्यामुळें आपण केव्हां 'आउट' होतों याची रावसाहेब आज शान्त चित्तानें वाट पहात आहेत. ते आज वृद्ध असले तरी मनानें तरुण आहेत. त्यांचीं सर्व कामें न बिघडलेल्या घड्याळाप्रमाणें वक्तशीर चाललेलीं पाहून जुन्या पिढींतल्या लोकांच्या शिस्तीबद्दल मला आदर वाटूं लागतो. त्यांच्या अंगांत आळस नाहीं आणि वयोमानानें येणारा चिडकेपणाहि त्यांच्यांत नाहीं. साहित्य-मंदिरांत अबोल के. नारायण आणि बोलघेवडे रळु पाहिले म्हणजे K. Narayan is a Movie and our dear old Ralu is a Talkie असें म्हणण्याचा मला अनावर मोह होतो. साहित्य-मंदिराच्या आवारांत आपली समाधि बांधून आपल्याला अक्षरशः 'पुरून' उरलेल्या साहित्यिकांचा सहवास आपल्या अचेतन देहाला मिळावा

अशी रावसाहेबांची इच्छा असल्यास मला नवल वाटणार नाहीं. इतकें गाढ प्रेम रधूंना साहित्य-मंदिराबद्दल वाटत असेल. रावसाहेबांना परिषदेचे सभासद वाढविण्याचा इतका नाद लागला आहे कीं, कालान्तरानें मृत्यूहि त्यांचेसमोर येऊन उभा राहिला तरी परिषदेचा सभासद झाल्याशिवाय त्यांच्या हातून प्रत्यक्ष मृत्यूचीहि जीवानिशीं सुटका होणें अशक्य आहे.

नवयुग, १९४०.

# ६ : : सुधा

“गोपाळ–कृष्ण माहीत आहे का आपल्याला?”

“गोपाळ–कृष्ण!—पण आडनांव काय त्यांचं?”

“हें एका बंगल्याचं नांव आहे—माणसाचं नाहीं. कमल दीक्षित राहतात त्या बंगल्यांत.”

“पण हें आधीं सांगायला काय झालं होतं—आम्हांला ठाऊक नाहीं तुमचा तो गोपाळ–कृष्ण.” एका अस्सल पुणेरी भल्या गृहस्थाच्या तोंडून संपादकीय थाटाचें वरील उत्तर मला मिळालें.

संध्याकाळचे सात वाजून गेले होते. अंधार पडल्यानें माडीवाले प्लॉट्सवरील बंगल्यांचीं नांवें मला वाचतां येत नव्हतीं. दिवसाच्या दगदगीनें मी अगदीं दमून गेलों होतों. चौकशी करीत असतां वरील प्रकारचीं उत्तरें ऐकून मी साहजिकच चिडून गेलों होतों. हवेंत पुण्याची गोड थंडी असूनहि मी मात्र गरम झालों होतों. आतां कुणाला बंगल्याचा पत्ता विचारावा अशा फिकीरींत मी असतां समोरून एक तरुणी माझ्या दिशेला येत असलेली मला दिसली. तिला पत्ता विचारावा कीं नाहीं असा मला प्रश्न पडला. ती आधुनिक सुशिक्षित तरुणी दिसत असल्यानें माझ्या हेतूबद्दल राजरोस शंका घेऊन माझ्याशीं धडपणें बोलायला ती अर्थातच बांधलेली नव्हती. तरी पण कमल दीक्षितांचा पत्ता काढण्याचा निकराचा प्रयत्न करण्याचें मीं ठरविलें आणि ती तरुणी जवळ आल्यावर मी माझा ठराविक प्रश्न तिला भीत भीतच विचारला. पांढरें पातळ, बिन बाह्यांचा ब्लाऊझ, पाठीवर रुळणारी सुंदर वेणी, गोरापान रंग, आकाशांतील तेजस्वी ताऱ्यांशीं स्पर्धा करणारे दोन टपोरे डोळे—असा एकंदर तिचा नूर होता. पुणें म्युनिसिपालिटीच्या दिव्याच्या प्रकाशांतहि मला त्या

तरुणीच्या चेहऱ्यावरील क्षणभर तरळून गेलेलें गोड स्मित दिसलें. माणसाला मंत्रमुग्ध करण्याचें दैवी सामर्थ्य तिच्या त्या हंसण्यांत होतें. तिचें व्यक्तित्व तिच्या अणुरेणूंत स्पष्टपणें दिसत होतें. तिचा चेहरा करारी दिसला. तिच्या डोळ्यांतील निश्चय निश्चितपणें नजरेंत भरण्यासारखा होता. तिची वृत्ति अगदीं निर्भय दिसत होती. मी आजपर्यंत अनेक सुंदर मुली पाहिल्या आहेत. परंतु या तरुणी-मध्यें दिसून येणारा जिवन्तपणा, नसांनसांतून खेळणारें चैतन्य, दुर्दम्य आशावादामुळें निर्माण होणारें चेहऱ्यावरील सात्विक समाधान आणि आयुष्य हें जगण्यासाठीं आहे या जिवंत तत्त्वाप्रमाणें जीवन-पथावर पडणारें पाऊल या गोष्टी एकाच व्यक्तीमध्यें साधारणपणें फारशा पहायला मिळाल्या नाहींत. सुदैवानें तिलाहि कमल दीक्षितकडेच जायचें असल्यानें आम्ही दोघें बरोबरच तेथें गेलों. सुधा हें तिचें नांव मला तेथेंच पहिल्यानें समजलें. त्या वेळीं मी नोकरीसाठीं पुण्यांत होतों. मी आयुष्यांत अपेशी ठरल्यानें पुणेरी वातावरणांत सावध-गिरीनें वावरत होतों. नागपूरचे माझे कांहीं जानी दोस्त वर्ज्य केल्यास मला आनंदी सामाजिक जीवनहि म्हणण्यासारखें नव्हतें. अशा निरुत्साही परिस्थितींत सुधानें आणि तिच्या दिलदार पतीनें पुण्यांतील माझें जीवन बरेंच सुसह्य केलें. तसा आमचा परिचय अगदीं वेताचा—आणि तोहि एकाद्या कादंबरींतील प्रसंगाप्रमाणें, अगदीं योगायोगावर आधारलेला. आमची पहिली भेट 'योगायोग' या बंगल्यासमोर झाली.

सुधा, तिचा पति हिरु आणि त्यांची इवलीशी गोड बेबी पाहिली म्हणजे लहानशा घरट्यांत चोंचींत चोंच घालून सुखानें जगणाऱ्या पांखरांची आठवण होऊन माझ्या मनाला सात्त्विक आनंद होतो. तसेंच पाहिलें तर सौंदर्याच्या 'तोंडी' परीक्षेंत सुधा वरच्या वर्गांत पास होणारी मुलगी नाहीं. तिच्या लग्नाला सतराशें विघ्नें आलीं अस-

ह्यानें तिच्या नाकावर चाफेकळी नाहीं" हें निराळें सांगायला नको. तिच्या गालावर आज तरी गुलाबगेंद फुललेले नाहींत. ती गजगति नाहीं किंवा सिंहकटीहि नाहीं. परंतु ही उणीव तिच्या तेजस्वी डोळ्यांनीं आणि तिच्या नाजुक ओठांत सांठविलेल्या मिस्किल हास्यानें भरून निघाली आहे. पोषाखांत रंगसंगति साधून अत्यंत नीटनेटकेपणानें रहाण्याची तिला हौस असल्यानें, अंगावर गुंजभर सोनें नसतांहि सोन्यासारखी सुधा मोहक दिसते. निष्कपट सुधाचें वागणें बोलणें मोकळेपणाचें असतें. परंतु सुधा तशी चांगली पक्की आहे. तिच्या मोकळेपणाचा फायदा घेण्याचा प्रयत्न एकाद्या मतलबी माणसानें केला तर ती त्याच्याशीं न भांडतां त्याच्यापासून कायमची दूर होईल. स्त्रीची सर्वांगीण प्रगति आणि उन्नति होण्यासाठीं रोजच्या व्यवहारांत स्त्री-पुरुष हा भेद नष्ट झाला पाहिजे असा प्रामाणिक कटाक्ष सुधाच्या मोकळ्या आणि निर्भय वागण्याच्या मुळाशीं आहे. आपल्या मोहकपणाच्या आहारीं जाऊन बेताल बनणाऱ्या तरुणांचा सुधा तिरस्कार करीत नाहीं. समाजाच्या सध्यांच्या संक्रमणावस्थेंत असें होणें अपरिहार्य आहे असें जाणून सुधा अशा जादा उत्साही आणि भावनावश तरुणांची कींव करून त्यांच्याकडे सहानुभूतीच्या भावानें पहाते. आपल्या पतीकडे येणाऱ्या लोकांमध्यें देखल्या देवाला—आणि विशेषतः देवीला—दंडवत करणारे कोण आहेत हें न कळण्या-इतकी सुधा खुळी नाहीं. परंतु आपला हेतु जोंपर्यंत वावगा नाहीं तोंपर्यंत आपल्याबद्दल कुणीहि कांहींहि बोललें तरी सुधा तें मनावर घेत नाहीं. आपला हिरु जोंपर्यंत आपल्या पाठीशीं विश्वासानें उभा आहे तोंपर्यंत लोकापवादाची झळ आपल्याला लागणें शक्य नाहीं, असे अभिमानाचे उद्गार सुधाच्या तोंडांतून नेहमीं निघत असतात. जीवनाकडे प्रामाणिक पुरोगामी नजरेनें पहाण्याची सुधाच्या हिरूला संवय झाल्यानें, ध्येयप्राप्तीच्या मार्गांत गाफील सुधाच्या हातून एकादी चूक झाली तर तो तिला उदार अंतःकरणानें क्षमा करतो. या पति-

पत्नीची परस्परांची पूर्ण ओळख असल्यावर त्यांच्या वैवाहिक जीवनाची बैठक पूर्ण विश्वासावर असल्यास त्यांत नवल नाहीं. यामुळें टीकाकारांच्या बेजबाबदार विषारी दृष्टीनें सुधा–हिरूच्या सुखाला दृष्ट लागणेंच शक्य नाहीं. समाजकंटकामुळें जीवनपथ निष्कंटक असणेंच शक्य नाहीं याची दुःखद जाणीव सुधा–हिरूला पूर्णपणें आहे. सुधाची ही वृत्ति तयार करण्यासाठीं तिच्या भावनावश आणि ध्येयनिष्ठ पतीला फार मोठी किंमत द्यावी लागली आहे. विवाहाचे वेळीं सुधा जगाकडे साशंक आणि भित्र्या नजरेनें पहात असे. तिचें रूपहि तिच्या एकाकी वृत्तीला अंशतः कारण झालें असावें. आपल्या फटकळ आणि सत्यप्रिय स्वभावानें व्यवहारी जगांत आपलें कोणाशीं नीट पटणार नाहीं या कल्पनेनें सुधा बरीचशी एकान्तप्रिय झाली होती. जगापासून दूर दूर जाऊन प्रसन्न आणि पवित्र अशा निर्जन ठिकाणीं आपली जीवनज्योत आयुष्याच्या अंतापर्यंत मंदपणें तेवत रहावी ही सुधाची विवाहाचे वेळची महत्त्वाकांक्षा होती.

सुधाचा जन्म एका सन्मान्य मराठा कुटुंबांत झाला. तिचे वडील उदारमतवादी असल्यानें आपल्या लाडक्या लेकीनें खूप शिकावें आणि नांवालौकिकाला यावें असें त्यांना नेहेमीं वाटे. वडील असतांना सुधाचे दिवस फार सुखांत गेले. परंतु तिच्या चौदाव्या वर्षीं वडिलांचें प्रेमाचें छत्र तिला पारखें झालें आणि जगाच्या तापाची सुधाच्या कोंवळ्या मनाला थोडीफार कल्पना येऊं लागली. वडिलांच्या अवसानानंतर तिचें अवसान ओसरलें व भरल्या घरांत तिला एकटें एकटें वाटायला लागलें. तिचें इवलेंसें मन निराशेनें व्यग्र झालें आणि फुलपांखराप्रमाणें स्वच्छंदानें वागणारी सुधा अकालीं गंभीर बनली. शाळेंतील आवारांत दूर असलेल्या एका कोपऱ्यांतील पारिजातकाच्या झाडाखालीं बसून सुधा तासन्‌तास विचारांत घालवी, नाहीं तर असहायपणें अश्रुसिंचन करी. भोंवतालीं पडलेल्या पारि-

जातकांच्या फुलांपेक्षांहि सुधाचें मन नाजूक झालें. कांहीं गोष्टी कळण्याइतकी सुधा जाणती होती तर कांहीं गोष्टी न कळण्याइतकी ती अजाण होती. बाल्य आणि तारुण्य यांच्या सीमाप्रान्तांतून सुधाचा जीवनप्रवाह वहात होता. जगाचे भलेबुरे अनुभव तिला येऊं लागले होते. तिला कांहीं सुचेना. उदासवाण्या वृत्तीनेंच सुधानें तारुण्यांत प्रवेश केला. आत्मघाताचे विचारहि तिच्या मनांत तेव्हांपासून येऊं लागले, आणि तिची ही वृत्ति अजूनहि मधून मधून उचल खातेच. योग्य वेळीं सुधा प्रवेशपरीक्षा पसार होऊन कॉलेजमध्यें जाऊं लागली. एकलेपणाला आणि सहानुभूतिशून्य जीवनाला कंटाळलेली सुधा आपलेपणासाठीं जगाकडे भिरभिरत्या नजरेनें न्याहाळूं लागली. तिच्याच वर्गांत असलेल्या हिरालाल नांवाच्या भावनाप्रधान, महत्त्वाकांक्षी आणि ध्येयनिष्ठ जैन तरुणानें सुधाला विवाहाची मागणी घालून तिची प्रेमपिपासा तृप्त केली. परंतु हा मिश्र विवाह समाजाला सहजासहजीं पचण्यासारखा नव्हता. तशांतून हिरालाल काळा असल्यानें या प्रेमाच्या मामल्यांत कांहीं तरी काळेंबेरें असावें अशी शंकासुद्धां कांहीं विघ्नसंतोषी लोकांना आली. रस्त्यांतून जातांना सुधाकडे लोक बोटें दाखवून आपल्या हीन मनोवृत्तीचें प्रदर्शन करूं लागले. कालान्तरानें समाजाचा विरोध इतका तीव्र झाला कीं, आपल्या हिरूचें जीवित धोक्यांत आहे अशी सकारण भीति सुधाला वाटूं लागली. आपल्यावर स्वर्गीय प्रेम करणाऱ्या वल्लभावर हितशत्रूंच्या त्रासामुळें खरोखरीच स्वर्गांत जाण्याची पाळी येते कीं काय या धास्तींत सुधाला बराच काळ कंठावा लागला. या प्रेमी जीवांची गांठभेट आणि त्यांचा पत्रव्यवहारही होऊं नये म्हणून सुधाच्या पालकानें पराकाष्ठेचा प्रयत्न केला. त्या बिचाऱ्याला प्रणयसृष्टींतील 'ट्रेड सीक्रेट' माहीत असतें तर दोन प्रेमविव्हल जीव पत्रें पाठवूं शकतात—आणि भेटूंहि शकतात—हें त्रिकालाबाधित सत्य त्याला त्या वेळीं पटून सुधावर सक्त पहारा ठेवण्याची तकलीफ त्यानें

खासच घेतली नसती. या सर्व संकटांतूनहि सुधा-हिरूनें मार्ग काढला, आणि 'सिनेमाला जाते' म्हणून नेसल्या साडीनिशीं सुधा घराबाहेर पडली व मुंबईला आपल्या लाडक्या हिरूशीं आर्यसमाजपद्धतीनें विवाहबद्ध झाली. प्रेमाशिवाय आपल्याला द्यायला आपल्या गरीब पतीजवळ कांहींच नाहीं याची सुधाला जाणीव होती. नुसत्या प्रेमानें जगांत निभाव लागत नाहीं आणि विवाहानंतर आपल्याला कल्पनातीत कष्ट उपसावे लागतील या गोष्टीकडे अल्लड सुधानें दुर्लक्ष केलें नव्हतें. आपला पति काळा म्हणून आपल्या प्रेमाची जगांत चेष्टा होईल हें सुधा जाणून होती. पण या सर्व गोष्टींना सुधा बिचकून गेली नाहीं. ती तरुण पिढीची प्रतिनिधी होती. आपल्या ध्येयाप्रमाणें वागण्यांत संकटांचे डोंगर समोर आले तरी घाबरून जाणाऱ्यांपैकीं ती नव्हती. आपली निवड प्रामाणिकपणानें आणि विकारापेक्षां विचारानेंच झाल्याची तिची खात्री असल्यानें सुधाचें मन चळलें नाहीं, धैर्य मावळलें नाहीं. आपला विवाह म्हणजे आयुष्यांतील एक चूक होय असें अखेरीला ठरलें तर तिचें प्रायश्चित म्हणून स्वखुशीनें निवडलेल्या पतीच्या संसारांत जन्मठेपेची सक्तमजुरी करण्याची मनाची तयारी करूनच सुधानें संसारसागरांत उडी टाकली. जगापासून दूर दूर अशा एका खेड्यांत अक्षरशः झुणकाभाकर खाऊन एका चंद्रमौळी झोंपडींत सुधा-हिरूनें आपला सुखी मधुचंद्र साजरा केला. या क्षणापर्यंत सुधा-हिरूची जीवनाची धडपड सुरू आहे. हे धकाधकीचे दिवस केव्हां तरी संपतील, या आशावादाला उराशीं बाळगून सुधा सर्व संकटांना हंसत-मुखानें तोंड देते आहे. प्रकृति धड नाहीं, दिवसभर एका ऑफिसांत नोकरी, घरीं आल्यावर पत्नी आणि माता या नात्यांनीं करावीं लागणारीं कर्तव्यें, पैशाची रात्रंदिवस काळजी, हिरूचे प्रेमळ वडील आणि जिवाला जीव देणाऱ्या पतीच्या कांहीं मोजक्या गरीब मित्रांशिवाय म्हणण्यासारखा दुसरा आसरा नाहीं—अशा स्थितींतहि सुधा कधीं कष्टी दिसत नाहीं. तिच्या मुखचंद्रावरील हास्य म्हणजे ओढून आणलेलें

चंद्रबळ नाहीं हें पाहिलें म्हणजे सुधाबद्दल अतिशय कौतुक वाटायला लागतें. घरांत पैसासुद्धां शिल्लक नाहीं असे करुण प्रसंगहि सुधा-हिरूच्या संसारांत अप्रासंगिक असतात असें नाहीं. पण सुधाचें धैर्य विलक्षण आहे. तिची उमेद ताज्या फुलाप्रमाणें टवटवीत आहे. सुधासारख्या अगदीं सामान्य मुलीच्या अंगांतील हे असामान्य गुण पाहिले म्हणजे ध्येयवादी तरुण पिढींतील रमणीरत्नें किती तेजस्वी आहेत याची कल्पना जुन्या पिढीला येईल. सुधा जुन्या पिढीला आव्हान आणि पुरोगामी तरुणींना आदर्श आहे. परिस्थितीशीं झगडण्यासाठीं सुधाला आपलें भावनावश मन कठोर करावें लागतें आहे. खेळकर निर्झराप्रमाणें खळखळणाऱ्या तिच्या निर्मळ भावना हृदयाच्या कठोर संगमरवरी पत्थरांतून आज पाझरतांना दिसतात. जगाच्या दृष्टीनें सुधा वेडी असेल, खुळी असेल; ती साधीसुधी मुलगी आहे. तिच्यांत दोषहि आहेत. वायुलहरीप्रमाणें ती लहरी आहे आणि परिस्थितीमुळें निर्माण झालेले इतरहि कांहीं दोष तिच्यांत आहेत. ती देवता तर खासच नाहीं. प्रसंगानें व्यवहारांत वागतांना आपली सूक्ष्म विनोदबुद्धि बाजूला सारून तिला नाइलाजानें हृदयशून्य व्हावें लागतें. समाजाच्या कठोर आणि सहानुभूतिशून्य वर्तनानें सुधासारखी नाजुक कलिका अकालीं निर्माल्य होते कीं काय अशी मला भीति वाटते. तिची धडपड पाहून मला कांहीं वेळेला इतकें वाईट वाटतें, कीं सर्वस्वाचें बलिदान करणारी सुधा त्या दिवशीं माझ्या वाटेला गेली नसती तर बरें झालें असतें असें मला राहून राहून वाटतें. माझ्या खिडकींतून काळे ढग आणि विद्युल्लतेची नयनमनोहर चमक पाहिली म्हणजे मला हिरू-सुधाची आठवण होते. ढगांतून पृथ्वीकडे डोकावून पहाणारी एकादी तेजस्वी चांदणी मला दिसते आणि प्रणयाकाशांत शान्तपणानें तळपणारी तेजस्वी सुधा माझ्या दृष्टीसमोर येते.....आणि पृथ्वी-वरील चांदणी निखळून जाऊं नये म्हणून मी ईश्वराची प्रार्थना करतों.

नवयुग, १९४१.

# ६ : विमल आणि बाबा

१९१७ च्या सुमारास पुण्यांतील फर्ग्यूसन कॉलेजांत जी तरुण मंडळी वऱ्हाडांतून आली त्यांत पु. य. ऊर्फ बाबा देशपांडे आणि माझी चुलत बहीण विमल कोल्हटकर ही जोडी होती. वऱ्हाडांतील वेछूट विद्यार्थ्यांनीं कॉलेजमध्यें एक प्रकारचें कणखर वातावरण निर्माण केलें होतें. मेहनत करावी, खूप खेळावें, शिरा खावा आणि पचवावा, अभ्यास करावा, डिबेटिंग सोसायटीमध्यें मुजोरी करावी, काव्य-शास्त्र-विनोदांत वेळ घालवावा आणि जरीकांठी तलम धोतरें नेसून ऐटीनें इकडे तिकडे मिरवावें असा साधारण मामुली वऱ्हाडी विद्यार्थ्यांचा कार्यक्रम असल्यानें हा वऱ्हाडी 'प्राणी' सर्वांच्या कुतूहलाचा विषय व्हावा यांत नवल नाहीं. आपापल्या कार्यक्षेत्रांत नांवारूपाला आलेले बाबा–विमलचे कांहीं मित्र त्या वेळीं होते. परवांपर्यंत सांगली कॉलेजचे प्रिन्सिपाल असलेले प्रो. कर्वे, मध्य-प्रान्तांत विद्याखात्यांत एका बड्या हुद्द्यावर असलेले डॉ. मोडक, फौजदारी वकील म्हणून अग्रपूजेचा मान मिळू घातलेले मुंबईचे हरिभाई देसाई, मेट्रो थिएटरप्रमाणें अनेक सुंदर आणि भव्य इमारतींचे यशस्वी कॉन्ट्रॅक्टर मोतीचंद शहा, वऱ्हाडांतील रसिक कवि आ. रा. देशपांडे वगैरे मंडळी बाबा–विमलचे जानी दोस्त होते. त्या सर्वांची मैत्री आजहि कायम असून पूर्वींइतक्याच प्रेमानें आणि बालकाच्या निष्कपट वृत्तीनें ही सर्व मंडळी आजहि भेटतात. हरिभाई व त्यांची नंदन, बाबा–विमल, कुसुमावती आणि अनिल यांच्या दृष्ट लागण्यासारख्या निर्व्याज आनंदाच्या भेटी पाहून मला त्यांचें कौतुक वाटतें. डोक्यावरील वयाचें ओझें कांहीं काल बाजूला ठेवून ही सर्व मंडळी कॉलेजच्या रम्य वातावरणांत अजूनहि वावरत आहेत कीं काय असा मला अनेकदां भास होतो.

बाबाचें जीवन म्हणजे धकाधकीचा ' मामला. कोणतीहि गोष्ट सरळपणें झाली तर मग तो बाबा कसला! बाबाचें घराणें जुनें, खानदानीचें व श्रीमंत होतें आणि बाबावर सर्वांचें प्रेम. लहरी बाबाचे सर्व हट्ट पुरविण्याची दक्षता प्रत्येक जण आपापल्या परीनें घेत असल्यानें देशपांड्यांच्या घरांत 'बाबावाक्यं प्रमाणं' हा दंडक ठरून गेला होता. या घटनेमुळें बाबा लहानपणापासून साहजिकच नाठी आणि एककल्ली बनला. मनाला एखादी गोष्ट पटली, कीं ती तडीला नेल्याशिवाय बाबाला चैनच पडायचें नाहीं! मनाच्या अशा पार्श्वभूमीवर बाबाच्या खळखळणाऱ्या कॉलेजच्या अवखळ जीवनांत विमलनें प्रवेश केला. तारुण्यसुलभ उच्च आशा—आकांक्षांच्या कड्या-कपारींतून स्वच्छंदानें धांव घेणाऱ्या बाबाच्या बेफाम जीवनप्रवाहाच्या अस्थिर पृष्ठभागावर पडलेल्या विमलेन्दूच्या असंख्य सौम्य प्रतिबिंबा-कडे बाबानें अतृप्त दृष्टि लावली. हळूहळू त्याचा जीवनप्रवाह निश्चित मार्गानें जाऊं लागला आणि विमलच्या प्रीतीचें सुंदर आणि स्फूर्ति-दायक प्रतीक बाबाला आपल्या जीवनांत दिसून आलें. बाबासारख्या रंगेल आणि रगेल तरुणाच्या प्रशान्त जीवनांत विमलच्या प्रणयचंद्राचें पूर्णबिंब डौलानें डोलत असल्याचें काव्यमय दृश्य आजहि मला दिसतें. त्यांच्या मनाची पूर्वींची ती गोड ओढ आजहि तितक्याच ताजेपणानें दोघांतहि आहे. विवाहानंतर इतक्या वर्षांनींसुद्धां बाबा आणि विमल अल्लड रमणीवल्लभ आहेत.

विमलच्या लग्नाला सतराशें विघ्नें येण्याइतकी ती नकटी नसली तरी तिचें लग्न अगदींच निर्विघ्न पार पडलें असें नाहीं. वाय. जी. देशपांड्यांना (म्हणजे बाबाच्या वडिलांना) हा देशस्थ—कोकणस्थ विवाह मान्य होण्यासारखा नव्हता. तशांतून विमलच्या वडिलांनीं पुनर्विवाह केलेला! या साऱ्या गोष्टी वाय्. जीं.ना खासच पचण्या-सारख्या नव्हत्या. पण माझ्या वडिलांनीं विनोदानें म्हटल्याप्रमाणें 'मिया बिबी राजी, तो क्या करेंगे वाय. जी.' अशी स्थिति झाली

आणि जुन्या वळणाच्या बाबीच्या आई–वडिलांनीं अखेरीस आपल्या मुलाच्या विवाहाला आनंदाने संमति दिली. विमलसारख्या गुणी सुनेमुळें वरील औदार्याबद्दल वाय. जीं. ना पश्चात्ताप करण्याचा प्रसंग कधींच आला नाहीं.

बाबा–विमलच्या स्वभावांत फार अंतर आहे. बाबा तडफड्या स्वभावाचा, तर विमल साधारणपणें शान्त. विवाहानंतरहि गगनाला गवसणी घालण्याची बाबाची धडपड, तर आपला पति आणि मुलें यांच्यांतच सारें विश्व सांठविल्याचें विमलला पवित्र समाधान आणि हीच तिच्या महत्त्वाकांक्षेची परिसीमा. कली नांवाच्या विमलच्या एका पराक्रमी मुलीच्या इतक्या गमती आहेत, कीं हें 'कलिपुराण' सांगतांना विमल रंगून जाते. विमल शंभर टक्के आदर्श माता आहे. अशी आई लाभणें म्हणजे मोठ्या भाग्याचें लक्षण होय. सार्वजनिक जीवनांतसुद्धां चिमुकल्या मुलांकडे विमलचें कधींच दुर्लक्ष होत नाहीं. मुलांना नोकरांच्या हवालीं करून चोवीस तास समाजसेवा करणाऱ्या जातीपैकीं विमल नाहीं. चाळीस कोटि अर्धपोटी हिंदी लोकांच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडवितांना आपलीं सोन्यासारखीं मुलें भूक–भूक करीत नाहींत याची दक्षता विमल घेते. गरिबीमुळें अर्धनग्न हिंदी लोकांच्या कपड्यालत्त्याची पंचाईत करण्यापूर्वी स्वतःचीं मुलें उघडीं-नागडीं भटकणार नाहींत याची काळजी विमल घेते. फॅशन म्हणून इस्पितळांत जाऊन समाजसेवा करणाऱ्या कांहीं स्त्रियांना घरीं तापानें फणफणणाऱ्या मुलांची दादहि नसते हें मला प्रत्यक्ष माहीत आहे.

पण विमल त्यांतली नाहीं. सार्वजनिक कार्यें पतीच्या व मुलांच्या कर्तव्याच्या आड येत असलीं तर पत्नी व माता या नात्यांनीं निर्माण होणारीं कर्तव्यें विमल पहिल्यानें करील. आपल्या चिमुकल्या लेकरांचा जीवनपथ निष्कंटक करण्यासाठीं विमल वाटेल तें दिव्य करण्यास सिद्ध होईल. नीरीला गोष्टी सांगण्यांत, कलीचे शाईनें बरबटलेले हात साफ करण्यांत आणि कुमारच्या कापलेल्या बोटाला चिंधी

बांधण्यांत विमलला धन्यता वाटते. मुलांच्या दिव्य व पवित्र सहवासांत आयुष्याचा प्रत्येक क्षण विमल मोठ्या उत्साहानें आणि आनंदानें जगते. स्वर्गांत न जातांहि खऱ्या स्वर्गसुखाची कल्पना विमलच्या पवित्र संसारावरून कुणालाहि येईल. आपल्या घराच्या माजघरांत मुलांना घेऊन ही आदर्श माता खेळूं लागली म्हणजे पिलांना बरोबर घेऊन बसणाऱ्या पक्षिणीची मला आठवण होते. 'सुशिक्षित स्त्री आदर्श माता होऊं शकत नाहीं' या सनातनी आक्षेपाला विमलचें चालतेंबोलतें उत्तर निरुत्तर करण्यास पूर्णपणें समर्थ आहे.

अशा रीतीने विमल संसारांत दंग असली तरी तिनें आयुष्याचा ताजेपणा या क्षणालाहि कायम ठेवला आहे. अजूनहि लहर आली तर इअरिंग्ज घालून सोळा वर्षांच्या मुलीसारखी विमल आनंदानें आणि खेळकरपणानें तासन् तास घालवील. मला किंवा बाबाला जिरविण्यासाठीं ती ठसक्यांत सिगारेट ओढून धुराच्या ठसक्यानें वेजार होईल. विमल जरी चांगल्यापैकीं लेखिका आणि कवियित्री असली तरी बाबाप्रमाणेंच साहित्याच्या क्षेत्रांत फारसें घोटाळणें तिला पसंत नसावें असें मला वाटतें. समाजकारण आणि राजकारण या दोन प्रान्तांत विमल नवखी नाहीं. भारतीय महिला मंडळांत तिनें अनेक वेळां जबाबदारीचीं कामें केलेलीं असून नागपूरच्या स्त्रियांच्या चळवळींत तिनें बहुमोल कामगिरी केली आहे. गेल्या कायदेभंगाच्या चळवळींत विमलनें केलेल्या कार्यामुळें ती तुरुंगांत कशी गेली नाहीं याचें मला नवल वाटतें. विमलचें वक्तृत्व बाबाप्रमाणेंच तेजस्वी नि प्रभावी आहे. स्त्री असूनहि ती सुसंबद्ध व मुद्देसूद बोलूं शकते! प्रेमळ पत्नी, रसिक वाचक, मार्मिक टीकाकार अशा अनेक नात्यांनीं बाबाच्या संसारांत विमलची त्याला प्रत्यहीं मदत होते आणि कोणत्याहि अर्थानें 'बाबाकृत' अपत्यांचें निम्में श्रेय तिच्या पदरांत पडतें.

बाबा–विमल बुद्धिजीवी असूनहि त्यांच्या जीवनाचें चित्र भावनेच्या चौकटींत बसलें आहे. जीवनाकडे निर्भय दृष्टीनें पहाण्याची त्यांची

दा. क्र. ६२८०५

नेहमीं तयारी असते. त्यांच्या आयुष्यांत अनेक संकटें आजपर्यंत आलीं असतील; पण अधीर मनानें त्यांचा धीर कधींच खचला नाहीं. आज अमीर तर उद्यां फकीर असे दिवस बाबानें पाहिले आहेत, पण त्यांच्या बालिश चेहऱ्यावरील मिस्किल हास्य कधींच मावळलें नाहीं. तोंडांत उंची सिगारेट, समोर चहाचा कप आणि हातांत एखादें 'लाल पुस्तक' अशा बेफिकीर वृत्तीनें बाबा आराम-खुर्चीवर थंडपणानें पडलेला पाहिला म्हणजे त्याच्या खिशांतहि थंड मामला असेल असें कोणालाहि वाटणार नाहीं. बाबाच्या खोलींतला एकंदर अव्यवस्थित कारभार पाहून त्याचा अवतार लक्षांत आणला म्हणजे ईश्वरानें 'अस्ताव्यस्त समस्त वस्तु मिळुनी देशस्थ निर्मीयला' याची खात्री पटूं लागते. आडदांडपणा हा बाबाच्या स्वभावांतील विशेष होय.

१९३५ सालीं पुण्यांतील शारदोपासक संमेलनांत पावित्र्य-विडंबनावर झालेली चर्चा, तिच्यांत बाबाचें झालेलें बेछूट भाषण, आणि त्या भाषणाच्या वेळीं 'हाउ इज दॅट, अम्पायर' या थाटांत गणपतराव मराठ्यांनीं अध्यक्षांना केलेलें अपील वगैरे गोष्टी अजूनहि फारशा जुन्या झालेल्या नाहींत. गेल्या वर्षीं श्री. तात्या सावरकर नागपूरला गेले असतां 'हॅलो सावरकर, काय खबरबात आहे?' असें त्यांच्या पाठीवर थाप मारून बाबानें विचारलें असें म्हणतात. आपल्याशीं इतका अतिप्रसंग करण्याचा हक्क शिवाजी आणि टिळक या दोघांनाच आहे अशी सावरकरांची प्रामाणिक समजूत असल्यानें बाबासारख्या कालच्या पोरानें इतकी लगट केलेली तात्यांना खासच आवडली नसेल. परंतु कोणत्याहि रीतीचें न्यूनगंड बाबांत नसल्यानें तात्यांच्या पाठीवर तबल्याइतक्याच सफाईनें थाप मारण्यांत तो कचरला नाहीं.

बाबाच्या या स्वभावानें त्याचें अनेक वेळां नुकसानहि झालें असेल. वास्तविक त्याच्यासारखा तेजस्वी, तडफदार, बुद्धिमान व

कर्तव्यदक्ष तरुण मध्यप्रान्ताच्या राजकारणांत पडद्याबाहेर जास्त चमकायला पाहिजे होता. परंतु मजूर व किसान यांच्याकडे असलेला बाबाच्या मनाचा ओढा कदाचित् त्याच्याआड आला असावा. बाबाच्या घरीं चारदोन कॉमरेडस् तरी अगदीं घरच्यासारखे उजळ माथ्यानें वावरतांना दिसतात. कॉमरेड् हे जातीनें भिडस्त असल्याचा फारसा बोभाटा नसल्यानें जेवणापासून तों सिगारेटपर्यंत पाहुणचार करण्याचें समाधान ते बाबा–विमलला मोठ्या औदार्यानें देतात. पण श्रमजीवी लोकांच्या पुढाऱ्यांनीं दिलेली ही तकलीफ बाबा–विमल आनंदानें सहन करतात. मजुरांच्या अशा कैवारी लोकांची मजुरी विमल कातावल्याशिवाय करीत असते. मजुरांच्या चळवळीला तितकाच हातभार लावण्याचें समाधान अशानें तिला मिळत असल्यास सांगवत नाहीं. हे सर्व मजूरपुढारी असल्यानें त्यांच्यांत शिस्तीची अपेक्षा करणें म्हणजे पाप होय. चार लोकांच्या तीन पंगती व्हायची वेळ रोज आली म्हणजे कोणालाहि चीड आल्याशिवाय राहाणार नाहीं. अशा वेळीं कोणी तरी बाबाची कानउघाडणी केली तर बाबा शान्तपणानें सिगारेट ओढूं लागतो व त्याची विनोदबुद्धि जागृत होऊन कांहीं वर्षांपूर्वी विमलच्या ओठांवर झालेल्या इसबाची तो गम्मत सांगूं लागतो. इसबाच्या दुखण्यांत तिला 'लिप सिम्पथी' दाखविणेंसुद्धां बाबासारख्या तरुण पतीला शक्य झालें नाहीं आणि ईश्वरानें दिलेल्या या कठोर शिक्षेविरुद्ध ओठाबाहेर एकहि शब्द काढण्याची सोय नव्हती! हें पाहूनच बाबाचा ईश्वरावरील विश्वास बहुधा नाहींसा झाला असावा. संसाराच्या अव्वल अमदानींत विमलच्या ओठांवरील इसबामुळें निर्माण झालेलें प्रीतीचें 'निरोष्ठ' रामायण रसिक बाबाच्या तोंडूनच ऐकण्याची गंमत वाटते.

बाबा साहित्यिक कसा झाला याचा मला अजूनहि उलगडा होत नाहीं. बाबाच्या लग्नानंतरहि त्याचा माझा ऋणानुबंध फारसा नसल्यानें तो 'असा' असेल असें मला वाटलें नव्हतें. डोक्याप्रमाणें

माझ्या पायालाहि चक्र असल्यानें आयुष्याचीं बरींच वर्षे मी या ना त्या निमित्तानें दूरदूरच्या प्रवासांत घालविलीं असल्यानें बाबासारख्या जवळच्या नातेवाइकाचीसुद्धां नेहमीं भेट होत नसे. आमच्या नात्यामुळें 'हा साला मला भेटला नाहीं' असा आरोप आम्ही दोघेहि एकमेकांवर सहज करूं शकतों. पण साहित्याचें वेड बाबाला बहुधा विमलमुळें लागलें असावें अशी मला शंका येते. 'बंधनाच्या पलीकडे' ही कादंबरी बाबाला 'झाली' त्या वेळीं मला चांगलाच धक्का बसला आणि 'पोरगा बिघडला' असें मला वाटलें. पण नंतर एकापेक्षां एक सरस अशा कादंबऱ्या लिहून बाबानें (आणि प्रस्तावनेच्या निमित्तानें के. नारायण काळ्यांनीं) जी लोकप्रियता मिळविली त्यावरून साहित्यक्षेत्रांतील हा घोडा 'फ्लूक' नाहीं अशी माझी खात्री झाली. त्याच्या 'परचुटन' लेखनावरूनसुद्धां बाबाच्या बुद्धीची चमक, भावनेची खोली, मनाची तळमळ आणि निश्चित ध्येयवाद यांची वाचकांना ओळख पटते. काळ्यांच्या प्रस्तावनेसकट मला 'सुकलेलें फूल' फार आवडतें. 'विशाल जीवना'बद्दल माझा आणि बाबाचा मतभेद असला तरी राजकीय कादंबऱ्यांच्या क्षेत्रांतहि बाबा मानाचें स्थान आज ना उद्यां पटकावील यांत शंका नाहीं. ज्या सन्माननीय स्थानावर केळकर, वरेरकर, अत्रे एकदां स्थानापन्न झाले होते त्याच बडोद्याच्या खुर्चीवर थोर कीर्ति असलेली बाबाची लहान मूर्ति हक्कानें बसली हें पाहून मला धन्य वाटलें. बडोद्याच्या भाषणांत पु. य. ची ओळख वाचकांना पूर्णपणें होते. तेव्हांपासून बाबा तरुणांचा पुरोगामी लेखक म्हणून लाडका झाला.

विमलची साहित्यनिर्मिती 'निर्माल्यमाले'नंतर फारशी झाली नाहीं तरी तिचें काव्य आजहि पूर्वींइतकेंच खात्रीनें टवटवीत आहे. परंतु काव्यरचनेपेक्षां काव्य जगण्यांतच तिला जास्त आनंद होत असावा असें मला वाटतें. तशांत नागपूर-वऱ्हाडांत कांहीं खरेखुरे साहित्यिक प्रसिद्धीच्या मागें धांवत नसल्यानें विमल अज्ञातवासांत

सुख मानते यांत मला तरी नवल वाटत नाहीं. तशांतून घरांत वावरणाऱ्या तीन सुंदर चिमुकल्या काव्यमय 'कणिका' असल्यावर कोणत्या मातेला कागद पेन्सिल घेऊन कविता खरडण्याची जरूर वाटेल! दोन चरणांच्या दुडदुड धांवणाऱ्या आणि बोबडे बोल बोलणाऱ्या जिवंत काव्यांना सोडून चार चरणांच्या कवितेकडे कोणत्या काव्यमय मातेचे पाय वळतील? मुलांच्या रोजच्या खोड्यांचें कौतुक करून तें वृत्त संध्याकाळीं 'तिकडे' सस्मित सांगण्यापेक्षां कवितेला योग्य असें वृत्त शोधण्यांत कोणती रसिक आई व्यर्थ वेळ दवडील? विनाकारण ओढूनताणून चंद्रबळ आणून चंद्रावर नीरस कविता करण्यापेक्षां 'चांदोबा चांदोबा भागलास का?' हें गीत मुलांबरोबर म्हणून वत्सलरसांत न्हाऊन निघणें जास्त काव्यमय नाहीं का? तरी पण विमलच्या साहित्यसेवेचा पूर्णविराम अजूनहि झाला नाहीं असें मला वाटतें. ती आणि बाबा यांचा आजचा जीवनप्रवाह साहित्य आणि राजकारण या दोन क्षेत्रांतून चालला असून त्या त्या प्रान्तांत त्यांच्याकडून उज्ज्वल सेवा होईल अशी मला खात्री वाटते. बाबा—विमलची ही जोडी मजेदार आहे. ते दोघेहि माझे आप्त असले तरी उत्तम मित्र म्हणूनच त्यांचा माझा ऋणानुबंध जास्त दृढ आहे.

मनोहर, १९४०.

# ७ : : य. गो. जोशी

त्या दिवशीं रविवार होता. पुण्याच्या ग्रीन्समध्यें मी सकाळचा 'नाश्ता' घेत बसलों होतों. समोरच्या टेबलावर रविवारचीं पत्रें पडलीं होतीं. त्यांतून 'ग्राम्य विनोद व असभ्य वैयक्तिक टीका यांपासून अलिप्त' (म्हंजे काय हो अप्पा?) असल्याचा कांगावा करणाऱ्या झंकारचा अंक मी चाळूं लागलों. शेला-पागोट्याचीं निर्बुद्ध मजकुराचीं पानें उलटून पुढें गेल्यावर, एका विशिष्ट आणि अशिष्ट लेखाकडे माझें लक्ष गेलें. 'साहित्यिकांची सफर' या यगोंच्या पुस्तकावरील तो टीकालेख (?) होता. जोशीबुवांना पिशाच्च ही पदवी बहाल करून, ते मेले तर पुण्याबाहेरील एकहि कुत्रें रडणार नाहीं असें अमंगल विधान वाचून मला फार वाईट वाटलें. तो अभद्र मजकूर जोशीबुवांच्या आईनें आणि पत्नीनें वाचला तर त्यांना काय वाटेल याचा विचार त्या दीडशहाण्या लेखकानें किंवा झंकारच्या 'हायकमांड'नें अर्थातच केला नसावा. जोशीबुवांचा वरील पद्धतीचा अभिनव आणि पुरोगामी मृत्युलेख फडक्यांनीं लिहिला असेल असें मला वाटत नाहीं. झंकारबाळाच्या जन्मापासून त्याच्या पराक्रमी पित्यानें निर्बुद्ध आणि 'इनोदी' लेखन करण्यांत कल्पनातीत यश मिळविलें असलें तरी वरील दुष्ट वाक्य त्यांच्या लेखणींतून कागदावर उतरेल असें म्हणण्याचें धाडस मला अजूनहि होत नाहीं. फडक्यांचें अंतःकरण अभिजात कलावन्ताचें असल्यानें तें भावनावश व मृदु असलें पाहिजे असा माझा आंतला आवाज मला अजूनहि सांगतो. वाटेल तसा लेख लिहून आप्पासाहेब स्वतःच्या हातानें आपल्या कीर्तीवर गलिच्छ फडक्याचा बोळा फिरवितील असें मानायला मी तयार नाहीं. पण वयोमानानें फडक्यांसारख्या ज्ञान 'वृद्ध' डायरेक्टराच्या मंद दृष्टींतून वरील 'टीकालेख' गफलतीनें निसटून छापला

गेला असावा असेंच म्हणावें लागतें; कारण जोशीबुवांचें बरेंवाईट झालें तर पुण्यांतील कुत्र्यांप्रमाणें झंकारचें संपादकमंडळहि ढसाढसा रडेल अशी माझी खात्री आहे.

साहित्यसृष्टींत मजेनें संचार करणाऱ्या या 'पिशाचा'ची व माझी पहिली भेट अनेक वर्षांपूर्वी पुण्यांतील फडतऱ्यांच्या वाड्यांत यशवन्त मासिकाच्या कचेरींत झाली. ते आपल्या कथाकन्येला 'स्थळ' शोधायला म्हणून तेथें आले होते. आजच्यासारखाच गबाळा पोषाक, पुणेरी वातावरणाला शोभणारी वाढलेली दाढी, एखाद्या लेखकाला विनाकारण बोचणाऱ्या त्यांच्या पिंजारलेल्या मिशा, एकंदरीनें उग्र चेहरा. आज दिसणारें त्यावरील मनमोकळें हंसणें आणि घरासारखें ऐसपैस वागणें पाहून मला मजा वाटली—मात्र अडलेल्या वधूपित्याप्रमाणें त्यांच्या तोंडावर लाचारी मात्र मला त्या वेळींहि दिसली नाहीं. त्या क्षणापर्यंत प्रत्येक मासिकानें जोशीबुवांची गोष्ट साभार परत पाठविली होती. त्या निमित्तानें त्यांची व पोस्टमनची खूपच गट्टी जमली होती. पण त्या वेळीं तरी त्या बिचाऱ्याला आपल्यासाठीं जादा तकलीफ पडूं नये म्हणून गोष्ट नापसंत ठरल्यास ती पोस्टानें परत न करतां फाडून टाकण्याची विनंति संपादकांना करून जोशीबुवांनीं सायकलवर टांग मारली आणि ते बोलतां बोलतां दृष्टीआडच्या सृष्टींत नाहींसे झाले. यशवन्त मासिकाचीं संपादकीय सूत्रें त्या वेळीं पुण्यांतील आजचे यशस्वी वकील स. आ. जोगळेकर यांच्या हातीं होतीं. ते रसिक व गुणग्राही संपादक असल्यानें त्यांनीं जोशीबुवांची योग्यतां ओळखली आणि ते केव्हां तरी बडे लेखक होतील असें भविष्य वर्तविलें. प्रत्येक मासिकांतून धक्का खाऊन परत आलेली गोष्ट यशवन्तमध्यें येणार ही वार्ता ऐकून जोशीबुवांना धक्का बसला असेल, आणि संपादकाचें डोकें फिरलें तर नाहीं अशी शंकाहि त्यांना आली असेल. परंतु त्यांची 'एक रुपया दोन आणे' ही प्रसिद्ध झालेली पहिली गोष्ट माझ्या वडिलांना सोळा आणे पटून त्यांनीं या

नवोदित लेखकाची विचारपूस केली. त्यानंतर जोशीबुवांच्या गोष्टी सर्वत्र प्रसिद्ध होऊं लागल्या हें सांगायला नकोच. ज्या संपादकानें आपल्याला साहित्यसृष्टींत प्रवेश मिळवून दिला त्या सदुभाऊंबद्दल जोशीबुवांना आजहि अतिशय आदर वाटतो. परंतु लघुकथालेखक म्हणून जोशीबुवांना खरी कीर्ति त्यांच्या 'शेवग्याच्या शेंगा' या बक्षिसाच्या गोष्टीनें मिळवून दिली. आपल्या 'शेंगा' शेंकडों रुपये किंमतीच्या आहेत असें खुद्द त्यांनाहि वाटलें नसेल. या अनपेक्षित प्रोत्साहनानें यगोंना लिहिण्याचा नवा हुरूप आला आणि लघुकथा, कादंबरी व नाटक या क्षेत्रांत त्यांचा संचार सुरू झाला. कांहीं वर्षांपूर्वी त्यांची एक गोष्ट प्रभात कंपनीनें पडद्यावर आणली. परंतु त्या घटनेचें कांहीं कारण नसतां इतकें रामायण झालें कीं, प्रभात कंपनीनें अजूनहि जोशीबुवांना पछाडलें आहे कीं काय अशी शंका येते. जोशीबुवा जरा कमी आणि शान्तारामबापु जरा जास्त बोलके असते तर त्या पडद्यावरील कथेचें पडद्यांतील राजकारण फारसें निकराला गेलें नसतें. पण दोघेहि कलावन्त आपापल्या परीनें थोर असल्यानें त्या बाबतींत इतरांनीं बोलण्याची सोयच नाहीं. पण त्या प्रकरणाला तमाम लेखकवर्गाचें वकीलपत्र घेऊन जोशीबुवांनीं वाजवीपेक्षां जास्त महत्त्व दिलें असें मला वाटतें. जोशीबुवांना एकदंरीनें पोंच कमीच असें मला वाटतें. स्वारी म्हणजे काय, वळलें तर सूत नाहीं तर......

जोशीबुवांचें बालपण सुखांत गेलें असलें तरी वयाच्या चौदाव्या वर्षी त्यांचा वकील झालेला वडील भाऊ अकालीं देवाघरीं गेल्यानें त्यांना शिक्षणाला रामराम ठोकावा लागला. त्यांना लहानपणीं प्लेग झाला होता. पण आजहि ते पुण्यांतील रस्त्यावर ज्या अर्थी हिंडतांना दिसतात त्या अर्थी ते त्या आजारांत 'कामास आले नाहींत' असें म्हणायला हरकत नाहीं. घरची गरीबी असूनहि जोशीबुवांनीं म्युनिसिपल दिव्याखालीं रात्रीं अभ्यास केला नाहीं

याचें कारण, त्या वेळचे म्युनिसिपल दिवे रात्रीं शोधून काढायला कंदील खरेदी करण्याइतके पैसे त्यांच्याजवळ नव्हते हेंच असावें! शिवाय 'दिव्याखालीं अंधार' या न्यायाला पुण्यांतील म्युनिसिपल दिवे अपवाद असतील असें मला वाटत नाहीं. चांगली गरिबी असूनहि, जुन्या जमान्यांतील कांहीं थोर लोकांप्रमाणें म्युनिसिपल दिव्याखालीं अभ्यास करण्याची थोडीशी तसदी जोशीबुवांनीं त्या वेळीं घेतली असती तर आज मला त्याबद्दल थोडें तरी गौरवपर लिहितां आलें असतें. पण तसलें कांहीं न करितां या स्वारीनें पोटासाठीं मिलिटरी अकाउन्ट्स, रेलवे, जेल, शिळाप्रेस इत्यादि ठिकाणीं नोकऱ्या केल्या. पोटाचा प्रश्न सोडविण्यासाठीं जोशीबुवांना वर्तमान-पत्राचे गठ्ठे पाठीवर घेऊन वणवण करावें लागलें तरी त्या वर्तमान-पत्रांत 'निर्भीड' पत्र नव्हतें ही त्यांतल्यात्यांत समाधानाची गोष्ट म्हटली पाहिजे. या धकाधकींत त्यांच्याजवळची माया संपून कर्ज वाढत चाललें असलें, तरी आईची माया जोंपर्यंत त्यांचें रक्षण करीत होती तोंपर्यंत त्यांचा धीर खचण्याचें कारण नव्हतें. दिवसभर कष्ट करून संध्याकाळीं घरीं परत आल्यावर आईच्या एका प्रेमकटाक्षा-नेंच त्यांचा सर्व शीण नाहींसा होई. तिचा प्रेमळ हात पाठीवर फिरला म्हणजे तिजवरील कठोर परिस्थितीचे वळ जोशीबुवांना सुसह्य वाटत. तिची चौघडी अंगावर पांघरून जोशीबुवा रात्रीं शान्तपणानें झोंपीं गेले म्हणजे त्यांना दुसरे दिवशीं दुर्दैवाशीं दोन हात करायला नवी उमेद येई. अशा रीतीनें मातेच्या निस्तेज नेत्रांच्या पवित्र नीरांजनांच्या मंद प्रकाशांत जोशीबुवा आपला मार्ग चांचपडत होते. कालान्तरानें त्यांचे दुर्दिन संपले; आपल्या लेखणीच्या मदतीनें जोशीबुवांनीं आपलें कर्ज फेडलें आणि सुखानें चार घांस खाऊं लागले. बाहेरचें कष्टमय जीवन आणि घरांत आईच्या सान्निध्यांत गेलेलें आयुष्य यांचा परिणाम अर्थातच जोशीबुवांच्या लेखनावर झाला. मध्यम वर्गाच्या जीवनाचें प्रामाणिक

प्रतिबिंब यगोंच्या वाङ्मयांत सांपडतें याचें कारणहि तेंच होय. परिस्थितीमुळें डोळ्यांसमोर अहोरात्र काजवे चमकत असतां त्यांचे डोळे आकाशांतील तारकांकडे गेले नाहींत हा त्यांचा दोष नव्हे. पोटांत भुकेनें कावळे कोकलत असतां, कोकिलांचें कर्णमधुर कूजन ऐकण्याचें त्राण त्यांच्यांत राहिलें नाहीं यांत आश्चर्य नाहीं. मध्यम वर्गाच्या निष्कांचन आयांच्या अंगाखांद्यावर खेळणारीं सोन्यासारखीं मुलें निर्माल्यासारखीं सुकलेलीं पाहून, त्यांची लेखणी सुंदर फुलामुलांच्या वाटेस गेली नाहीं हा तिचा अपराध नाहीं. तसेंच घरांत असणाऱ्या एकाद्या नोकरापलिकडे त्यांचा मजूरवर्गाशीं संबंध आला नसल्यानें पुरोगामी लेखक म्हणून श्रमजीवी वर्गाबद्दल कांहीं तरी लिहून तें वाचण्याचे श्रम त्यांनीं वाचकांना दिले नाहींत हे एका अर्थानें त्यांचे उपकारच आहेत. यगोंसारख्या प्रतिभासंपन्न लेखकाला प्रत्यक्ष अनुभवाच्या अभावीं वाटेल त्या वर्गाचीं चित्रें रंगवितां आलीं नसतीं असें नाहीं. पण तीं चित्रें जिवंत वाटलीं नसतीं—तसें करणें प्रामाणिकपणाचें झालें नसतें ही त्यांना जाणीव असल्यानें बेगडी पुरोगामी लेखक होण्याचा मोह त्यांनीं टाळला. याच गुणामुळें मध्यम वर्गाचीं प्रामाणिक समाजदृश्यें दाखविणारा जोशीबुवांशिवाय एकहि लेखक हरिभाऊ आपट्यांनंतर झाला नाहीं असें मला वाटतें. जोशीबुवांच्या लेखनांत 'शेवग्याच्या शेंगा' आणि 'कोथिंबिरीच्या काड्या' असल्या तरी त्यांनीं आपल्या वाङ्मयाची मंडई मांडली नाहीं ही गोष्ट त्यांचे मत्सरग्रस्त टीकाकार विसरतात. तसेंच जोशीबुवांच्या लेखनानें समाजांत विचारांची क्रान्ति होणार नाहीं आणि भावी पिढीस असल्या लेखनाचा कांहींच उपयोग होणार नाहीं असें कांहीं लोकांना वाटतें. आज समाजांत दिसणारी विचारांची क्रान्ति, अशा टीकाकारांच्या लेखनामुळें झालेली नसून ती समाजाच्या आन्तरराष्ट्रीय वाङ्मयाच्या सखोल अभ्यासानें आणि विशेषतः परिस्थितीनें झालेली आहे ही गोष्ट टीकाकार विसरतात. आमच्या वाङ्मयांत नवविचारांचे जिवंत झरे निर्माण करण्याची पात्रता आमच्या

कांहीं लेखकांत असली तरी त्यांची लेखणी आज समाजनिष्ठ राहिली नसून व्यक्तिनिष्ठ बनलेली आहे. सामाजिक किंवा राजकीय क्षेत्रांतील घाण उपसून निर्मल वातावरण निर्माण करण्याऐवजीं व्यक्तींच्या चारित्र्यांतील अमंगल धुणें सार्वजनिक नळांवर धुण्यांत ते धन्य मानून घेत आहेत. असली नादान आणि चवचाल लेखणी पुरोगामी वाङ्मयप्रसवा होईल असें मला तरी वाटत नाहीं. आज आमच्या साहित्यसृष्टींत नवविचारांचे निर्मल निर्झर पाश्चिमात्य वाङ्मयांतून आलेले आहेत हें सत्य नाकबूल करून भागणार नाहीं. अगदीं अक्षरशत्रु अडाणी लोकांतहि परिस्थितीमुळें विचारक्रान्ति झाल्याचीं उदाहरणें इतिहासांत थोडीं-थोडकीं नाहींत हें विचारक्रान्तीच्या बाता मारणाऱ्या शिष्ट लेखकांनीं लक्षांत आणलें तर विचारक्रान्तीसाठीं लेखकांइतकेंच परिस्थितीचेंहि महत्त्व आहे ही गोष्ट दिसून येईल. तेव्हां पुरोगामी वाङ्मयाचा उदोउदो करून इतर वाङ्मयाला हीन लेखण्याचें कारण नाहीं इतकेंच मला म्हणायचें आहे. जें ललित लेखन अभिजात वाङ्मयाच्या कसोटीला पूर्णपणें उतरूं शकतें, तें जरी मध्यम वर्गाबद्दल असलें तरी त्याज्य ठरण्याचें माझ्या मतें कारण नाहीं. आजच्या पुरोगामी म्हणविणाऱ्या लेखकांचें वाङ्मय पुढील पिढीपर्यंत पोंचलें, तर यगोंचें वाङ्मय खासच मागें रहाणार नाहीं. 'साहित्यिकांची सफर' हें पुस्तक कांहीं लोकांना आवडणार नाहीं आणि 'अनौपचारिक मुलाखती' उद्योग, उत्साह आणि आत्मोन्नतीच्या सांच्यांत बसणार नाहींत ही गोष्ट खरी असली, तरी सध्यां बोकाळलेली मुलाखतबाजी कमी झाली तरी जोशीबुवांच्या विडंबनाचें सार्थक झालें असें वाचक समजतील. गोम्यासोम्याच्या मुलाखती घेण्यांत थोडासा 'अर्थ' असला तरी ही प्रथा फार ताणण्यांत अर्थ नाहीं हें धंदेवाईक मुलाखतमार्तंडांना पटेल अशी मला आशा आहे. जोशीबुवांचीं 'पुनर्भेटी'चीं पुस्तकें व वरील दोन पुस्तकें थकल्याशिवाय प्रत्येक पिढीचा प्रवास सहज करूं शकतील असें जोशीबुवांच्या टीकाकारांना मी नम्रपणें सांगण्याची परवानगी घेतों.

आपल्या लाडक्या लोकांचे अपमृत्यु पहाण्याचे अनेक दुःखद प्रसंग जोशीबुवांवर आजवर आले असल्यानें, सुखदुःखाबद्दल कठोर बेपर्वाईची वृत्ति त्यांच्यांत आज आलेली दिसते. त्यांना जसा उत्कट आनंद होत नाहीं तसें त्यांना उत्कट दुःखहि होत नाहीं. त्यांची वाढलेली दाढी सोयरामुळें आहे, कीं सुतकामुळें आहे हें त्यांना कुणी झोंपेंत विचारलें तर नक्की सांगतां येईल असें मला वाटत नाहीं. ते ज्या हिरीरीनें लग्नसमारंभांत भाग घेतील तितक्याच उत्साहानें खतम झालेल्या एकाद्या माणसाला ओंकारेश्वरावर पोंचवून मोकळे होतील. एकाद्या सिनेमाचें तिकीट विकत घेणें किंवा म्युनिसिपॅलिटींतून मर्तिकाचा पास आणणें या दोन्हीहि गोष्टी त्यांच्या दृष्टीनें सारख्याच किंमतीच्या आहेत असें इतरांना वाटतें. या त्यांच्या वृत्तीमुळें त्यांच्या हृदयांत भावनेचीं फार मोटीं अशीं वादळें फारशीं होत नसावींत असा माझा तर्क आहे. जोशीबुवांच्या या स्वभावामुळें मला त्यांच्याशीं गप्पा मारायला आवडतें. एकदां थोडीशी किल्ली दिली, कीं हें बोलणारें यंत्र सुरू होऊन आपल्याला ऐकण्यापलिकडे फारसें कामच उरत नाहीं. त्यांच्या तडाख्यांत एकादा मनुष्य सांपडला म्हणजे, पुढील आठवड्यांत प्रसिद्ध होणारा जोशीबुवांचा एक तरी लेख त्यांतील मुद्रणदोषांसकट ऐकल्याशिवाय त्याची सुटका होणें शक्य नाहीं. मनुष्य तसा भाबडा असल्यानें स्वतःच्या गुप्त गोष्टी प्रत्येकाला सांगून त्या षट्कर्णी न करण्याची ताकीद प्रत्येकाला देत असतो. जोशीबुवांची प्रत्येक 'गुप्त' गोष्ट ते स्वतःच जगजाहीर करीत असतात, पण त्याचें भान मात्र या स्वारीला कधींहि नसतें. स्त्रियांशीं बोलण्याचें ते हमेश टाळीत असतात. मागें एका लेखिकेला आपल्या लेखनांतील चुका त्यांच्यापासून समजून घ्यावयाच्या होत्या, म्हणून त्या बिचारीनें त्यांना केव्हां सवड होईल म्हणून मोठ्या आशेनें विचारलें. पण या गृहस्थानें तिला खुशाल नकार देऊन सरळ वाटेला लाविली तेव्हां, जोशीबुवांना लेखनांतील

चुका विचारण्याची तिची लेखनांतील पहिली चूक होती हें तिच्या ध्यानांत आलें असेल. जोशीबुवा सनातनी असूनहि दुसऱ्यांवर आपलीं मतें लादण्याचा प्रयत्न ते करीत नाहींत. सोंवळ्या ओंवळ्यावर त्यांचा विश्वास नसला, तरी आईला वाईट वाटूं नये म्हणून ते हें नाटक रोज हंसतमुखानें पार पाडीत असतात. जोशीबुवा सनातनी असूनहि ते घरांत हिटलरशाही गाजवीत नसल्यानें त्यांच्या साध्या-सुध्या प्रपंचांत द्विदलशासनपद्धति बिनबोभाट चाललेली असते. ते बायकोला ( म्हणजे अर्थात् स्वतःच्या ) घेऊन फिरायला जात नसले, तरी तिनें देवदर्शनाला किंवा हळदीकुंकवाला कुठेंहि जाण्यास त्यांची आडकाठी नसते. त्यांच्या संसारांतील सुख अज्ञानमूलक असलें तरी तें शंभर टक्के सुख आहे आणि त्यांत त्यांना आनंद वाटतो. संसारांत मतामतांचा गलबला होऊन शान्तता नाहींशी होण्यापेक्षां, अज्ञानजन्य कां होईना, पण खरें सात्त्विक समाधान सर्वांना मिळतें ही गोष्ट यगो जास्त पसंत करतात. जोशीकृत दोन मुलें घरांत बागडतांना पाहिलीं म्हणजे प्रणयाच्या किंवा शृंगाराच्या बाबतींत ते आपली कुचंबणा करून घेत असतील असें मला तरी वाटत नाहीं. हा गडी सनातनी असला तरी भलत्याच बाबतींत तो आपली गैरसोय करून घेण्या-इतका खासच 'हा' नाहीं. थोडक्यांत सांगायचें म्हणजे, जोशीबुवा सुखी आणि आनंदी संसारी प्राणी आहे ही गोष्ट खरी. महाराष्ट्रांतील वाचकांनीं त्यांचें भरपूर कौतुक केलें असल्यानें जोशीबुवांची त्यांच्या-विरुद्ध कांहींहि तक्रार नाहीं. चहाचा 'सिंगल' संपवून जोशीबुवा आपली आवडती विडी समाधानानें ओढूं लागले म्हणजे ही स्वारी साळसूद दिसते खरी—पण तो साळसूदपणा विजेच्या जिवन्त तारे-प्रमाणें आहे;—विनाकारण कुणी त्यांच्याशीं लगट करून त्यांना छेडण्याचा प्रयत्न केला तर—विजेच्या तारेप्रमाणेंच त्याला जोराचा धक्का बसून अद्दल घडल्याशिवाय रहाणार नाहीं.

नवयुग, १९४०.

# ८ : : दुर्गा खोटे

"कि ती वाजले असतील कोल्हटकर?"

"दुर्गाबाई आल्या नाहींत ना अजून—मग आठ तर खात्रीनंच वाजले नसतील."

माझें आणि चित्रमंदिरांतील प्रख्यात मेकप आर्टिस्ट जोशीबुवा यांचें वरील बोलणें चालू असतां, स्टुडिओच्या फाटकांतील जाड लोखंडी पत्रा धाड्दिशीं मोठ्यानें वाजला आणि दुर्गाबाईंची थोर कुळीची रोल्स रॉईस मंदिराचे आवारांत शिरली. रस्त्यांत भेटलेल्या म्हाताऱ्या लतीफला 'क्यंव, अच्छे हो लतीफ भाई?' असें सस्मित मुखानें म्हणत बाई आमच्याजवळ आल्या आणि आम्हाला Good Morning करून आपल्या खोलींत निघून गेल्या. घड्याळांत आठाचे ठोके पडले.

दुर्गाबाईंचा वक्तशीरपणा पाहून जुन्या काळांतील मंडलीकांच्या गोष्टी दंतकथा वाटेनाशा होतात. सध्यांच्या काळांत शिकलेल्या बायका घड्याळाचा उपयोग अलंकार म्हणूनच बहुधा करीत असतात. अर्थात् आयुष्य किती फुकट गेलें हें त्यांना या अलंकारानें समजतें ही गोष्ट निराळी. पण या 'आलंकारिक' भाषेपलिकडे जाऊन, दुर्गाबाईंचें इवलेंसें घड्याळ त्यांचीं सर्व कामें अगदीं घड्याळाप्रमाणें वक्तशीर करण्यास क्षणाक्षणाला उपयोगी पडत असतें ही गोष्ट मात्र खरी. एकाद्या घड्याळें 'बन्वीनाऱ्या' देशी कंपनीनें आपल्या चांगल्या घड्याळाला 'दुर्गा' हें नांव दिलें तर तें अगदीं सार्थ होईल. फुकट घालवायलासुद्धां आतां फारसें आयुष्य शिल्लक उरलें नाहीं अशा माझ्यासारख्या माणसाला मात्र घड्याळाच्या हातवाऱ्यांनीं फारशी भीति वाटत नसली तरी वक्तशीर लोकांबद्दल मला फार आदर वाटतो ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं.

ज्या सिनेमासम्राज्ञीची साधारणपणें सहजासहजीं ओळख होणें शक्य नाहीं, जिचा लाडिक आणि गोड आवाज मामुली माणसाला सहसा ऐकायला मिळायचा नाहीं, जिच्याशीं तासन् तास गप्पा मारणें सामान्य माणसाला अशक्य कोटींतलें आहे, अशा असंख्य लोकांच्या आवडत्या नटीचा आणि माझा चित्रमंदिरांत चार पांच महिने ऋणानुबंध जमून आला. बाईंना काम असेल त्या दिवशीं दुर्गाबाई आणि मी लतिफनें केलेला सकाळचा चहा बरोबर घेत असूं. चहा घेतल्यावर मात्र क्षणाचाहि विलंब न करतां बाई रंगायला बसत. 'पायाच्या दासीं'त बाईंची म्हाताऱ्या आणि कजाग सासूची भूमिका असल्यानें, त्यांना रंगवितांना जोशीबुवा आपल्या कौशल्यानें बाईंच्या मोहकपणाचा जो विचका करीत तो पाहून मला त्यांचा खूप राग येई. ब्रशाच्या एकेका फटकाऱ्यानें जोशीबुवा बाईंच्या आयुष्यांतील जणुं काय पांच दहा वर्षें कमी करून त्यांना जबरदस्तीनें म्हातारपणाकडे खेंचून नेत आहेत असें वाटून मी मनांतल्या मनांत जोशीबुवांना शिव्या मोजीत असे. सुंदर स्त्री आमरण सुंदर व तरुण रहावी असें कोणत्याहि रसिकाला वाटेल. अखेरीस बाईंचा मथुकाकींचा अमानुष अवतार इतका सुंदर (म्हणजे, अर्थात् विचित्र) होत असे, कीं रंगायला बसण्यापूर्वींच्या दुर्गाबाईबद्दल मला जें एक प्रकारचें आकर्षण वाटावयाचें, तें त्यांच्या रंगल्यानंतरच्या अवस्थेंत पूर्णपणें नाहींसें होऊन मला त्यांच्याबद्दल मातेसमान नितान्त आदर वाटूं लागे व मी त्यांच्या खोलींतून कांहीं तरी निमित्त सांगून काढता पाय घेई.

डायरेक्टरानें ठरविलेल्या वेळीं हजर रहायचें, आपल्याला दिलेली भूमिका अत्यंत कसोशीनें करायची, काम करतांना चिडायचें किंवा त्रासायचें नाहीं आणि सदा हंसतमुख राहून सेटवरील वातावरण प्रसन्न ठेवायचें हा बाईंचा स्वभावविशेष आहे. एकादे वेळीं चोवीस तास मेकपमध्यें रहायची वेळ आली तरी बाई सदा आनंदी. कामाचे वेळीं आळस येऊं नये म्हणून बाई सहसा जेवीत नाहींत. ताक, चहा,

कॉफी, फळें वगैरे घेऊन त्या आपल्या पोटाचा प्रश्न सोडवितात. आपल्या कामांत बाई इतक्या चोख असतात, कीं त्यांच्या हातून एखादे वेळीं प्रामाणिकपणाचा अतिरेकहि होतो असें म्हणतात. मागें एका बोलपटांत बाई काम करीत असतां, छायाचित्रकारानें प्रकाश-योजना निश्चित केली आणि डायरेक्टरानेंहि त्यांना विशिष्ट पोज दिली. परंतु आयत्या वेळीं 'कॅमेरा गो' म्हणण्याचे वेळीं डायरेक्टरला स्फूर्तिसाठीं बाहेर जाण्याची हुक्की आली आणि दुर्गाबाईंना सेटवर ताटकळत ठेवून स्वारी बाहेर पसार झाली. प्रखर प्रकाशानें बाईंना चटके बसूं लागतांच 'लाइट्स ऑफ' करण्यांत आले. कांहीं वेळानें डायरेक्टर पुरेशी स्फूर्ति घशाखालीं ओतून सेटवर आल्यावर, दुर्गा-बाईंना त्यानें दिलेल्या पोजमध्यें पाहून त्याला वाईट वाटलें व त्यानें बाईंची क्षमा मागितली. सेटवर सगळ्यांसमोर नटीची माफी मागणारा डायरेक्टर अर्थातच शुद्धीवर नव्हता ही गोष्ट मुद्दाम सांगायला नको. डायरेक्टर या प्राण्याच्या हातून चुका होत नाहींत आणि म्हणून तो कुणाचीहि क्षमा मागायला बांधलेला नाहीं असा सिनेमा-सृष्टींत अलिखित नियम आहे असें म्हणतात. वरील गोष्ट मी मागें ऐकली असून तिचा खरेपणा मी अजून पडताळून पाहिला नाहीं. परंतु शिस्तीबद्दलचा दुर्गाबाईंचा कटाक्ष पाहून, मी ऐकलेली गोष्ट खोटी नसावी असें मला वाटतें.

दुर्गाबाई सिनेमा नटी म्हणून जगापुढें येतील असें पंधरा वर्षां-पूर्वी कुणालाहि वाटलें नसेल. शाळा कॉलेजांत जाणारी सॉलिसिटर लाडांची लाडकी लेक 'बानुबाय' आपल्या सौन्दर्यानें आणि उत्कृष्ट अभिनयानें अखिल भारताला वेड लावील असें त्या वेळीं म्हणणारा खात्रीनेंच वेड्यांत जमा झाला असता. बानुबाईच्या गालावरील नजरबंदी करणारी मोहक खळी, मोजक्या आप्तेष्टांच्या नजरेंत भरण्यासाठींच ईश्वरानें निर्माण केली आहे असेंच त्या वेळीं सर्वांना वाटलें असेल. विवाहसमयीं सप्तपदीचीं जपून पावलें टाकणारी

खोट्यांची सोन्यासारखी सून रुपेरी पडद्यावर पदार्पण करील हें कुणालाहि खरें वाटलें नसतें. विवाहापूर्वी आईवडिलांबरोबर आणि विवाहानंतर आपल्या पतीबरोबर अभिमानानें हिंडणाऱ्या बानुकडे जगानें दुर्लक्ष केलें असेल. पण आज आबालवृद्धांच्या परिचयाची तीच बानुबाई आपल्या गाडींतून जातांना तिच्या मोहकपणाकडे बेहोषपणें पाहणारे असंख्य स्त्रीपुरुष सांपडतील. दुर्गाबाईंच्या गाडीसमोर एकदां एक मनुष्य चुकून आला असतां—'मर लेका दुर्गा खोट्यांच्या गाडीखालीं' असें वाक्य शेजारचा मनुष्य मोठ्यानें ओरडल्यावर, आपण प्रसिद्धीच्या प्रकाशांत कशा वावरत आहों याची जाणीव बाईंना होऊन त्यांना लाजल्यासारखें झालें.

सासरीं सुबत्ता असूनहि दुर्गाबाईंना मधूनमधून तीस चाळीस लोकांचा स्वयंपाक करण्यास मदत करावी लागे. युरोप, आशिया, आफ्रिका, अमेरिका या खंडांप्रमाणें, प्रपंचाच्या भूगोलांत 'चुलखंड' हि असतें याची तापदायक जाणीव दुर्गाबाईंना सासरीं आल्यावर झाली. तशांतून सासरच्या वडील माणसांना सोंवळ्याचें वेड असल्यानें, दुर्गाबाईंना कांहीं वेळेला स्वयंपाक करतांना तीन चारदां अंग धुवावें लागे. लग्नानंतर पहिल्या पहिल्यानें दुर्गाबाईंना अंगावर इतके अलंकार घालावे लागले, कीं त्या खोट्यांच्या घरच्या उघड्या तिजोरीप्रमाणें दिसूं लागत. परंतु आपल्या सौजन्यानें दुर्गाबाईंनीं कुणालाहि नाराज केलें नाहीं——बाईंच्या अभिनयकलेला तेव्हांपासून सुरुवात झाली कीं काय कुणास ठाऊक. त्या वेळच्या गमती दुर्गाबाई जुन्या सारस्वत बायकांप्रमाणें हेल काढून सांगतांना फार मजेदार वाटतात. तेव्हांचा त्यांचा 'पोटुं' नाहीं हें वाचकांचें दुर्दैवच म्हणायचें.

दुर्गाबाईंचें वैवाहिक जीवन दुर्दैवानें अल्पजीवी ठरलें. त्यांचा पती——त्यांचा संवगडी संसाराच्या ऐन उमेदींतच त्यांना सोडून गेला. त्या वेळीं दुर्गाबाई कामासाठीं पुण्यांत असल्यानें पतिपत्नींची अखेरची

भेटहि होऊं शकली नाहीं. संसारसुखाच्या भरलेल्या ताटावरून बाईंना अशा रीतीनें मधूनच उठून जाण्याचा प्रसंग आला, तरी त्यांनीं धीर सोडला नाहीं. बकुल आणि हरिन या दोन मुलांना पंखाखालीं घेऊन त्यांनीं आपल्या जीवनाचा प्रवास धीरानें चालू ठेवला. त्यांचा वडील मुलगा बकुल आज दिल्ली येथें काल्टेक्स कंपनींत उमेदवार म्हणून काम करीत असून, चिमकुला हरिन मेजर नायडूप्रमाणें घरांतील हॉलमध्यें क्रिकेट खेळून खिडक्या दारांचीं तावदानें फोडीत आहे. दुर्गाबाई एरव्ही कितीहि प्रेमळ असल्या तरी शिस्तभंगाबद्दल त्या आपल्या मुलांना केव्हांहि क्षमा करीत नाहींत. तशीच वेळ आली तर मुलांना खरपूस चोप देण्यासहि त्या कमी करीत नाहींत. मायलेकांच्या लढाईच्या आणि नंतर होणाऱ्या तहांचा इतिहास हरिनसारखें बोबडें बोलून दुर्गाबाई सांगतात त्या वेळीं ऐकणाऱ्याची चांगलीच करमणूक होते.

दुसऱ्यांबद्दल विनाकारण उठाठेव करण्याचा दुर्गाबाईंचा स्वभाव नसल्यानें, त्यांच्यावर गैरसमज करून घेण्याचा किंवा रागावण्याचा प्रसंगच सहसा येत नाहीं. तसेंच त्यांना स्वतःला वितंडवाद घालण्याची संवय नसल्यानें आपलीं मतें दुसऱ्यांच्या माथीं मारण्यास किंवा इतरांचीं मतें आपल्या माथीं मारून घेण्यास त्या केव्हांहि तयार नसतात. मात्र बाई एखादे वेळीं तापल्या, तर त्या कुणाशींहि न बोलतां गाडींत मावेल इतकें पेट्रोल भरून दूर दूर अशा निवान्त जागीं हिंडायला जातात आणि पेट्रोल व राग संपल्यावर घरीं परत येतात. अव्याहत वाचनानें त्यांचा दृष्टिकोन विशाल झालेला आहे. स्टुडिओंत कामावर जातांनासुद्धां त्या एक दोन पुस्तकें वाचायला व एक दोन हरवायला म्हणून घेऊन जात असतात. सिनेमा हा जरी धंदा असला तरी त्यांतील लोक खरे ‘ कलावन्त ’ असल्यानें, सर्वच कामें साधारणपणें कलावन्ताच्या कलानेंच चालत असल्यानें मेकप नंतरहि बाईंना चार दोन तास वाचायला सहज वेळ मिळतो.

दुर्गाबाईचें मराठी वाचनहि खूप आहे' हें पाहून मात्र मला जरा आश्चर्य वाटलें.

दुर्गाबाईना खूप मित्र मैत्रिणी आहेत. प्रत्येक सामाजिक कार्य-क्रमांत त्या उत्साहानें भाग घेत असतात. त्यांच्या स्वभावांत नाचरेपणा नसला, तरी पाश्चात्य पद्धतीच्या नृत्याची त्यांना फार आवड आहे. अकलेपेक्षां जांस्त पैसा आणि वेळ असलेल्या व पाश्चात्य संस्कृतीच्या अर्ध्या हळकुंडानें पिवळ्या झालेल्या अनेक मैत्रिणी दुर्गाबाईना आहेत. नरोत्तम भाऊकडे हिरे चांगले आलेले आहेत, व्हाईटअवेमध्यें गेल्या बोटीलाच उत्तम बूट आलेले आहेत आणि फलाण्या दुकानांत सुंदर साड्या मिळतात अशी बहुमोल माहिती त्या मैत्रिणी टेलीफोनवरून दुर्गाबाईना हमेशा सुनवतात. परंतु त्यानें हुरळून जाऊन दुर्गाबाई आपला श्रमानें मिळविलेला पैसा विनाकारण खर्च करण्यास कधींहि तयार नसतात. 'ओ डार्लिंग डुर्गा, तूं आज काल किती पेल दिसतेस' असें एकाद्या मैत्रिणीनें म्हटलें तर 'डुर्गा' मिस्कीलपणानें हंसून तिचे आभार मानील. प्रत्येकाशीं सौजन्यानें वागण्याचा जरी बाईचा नियम असला, तरी अलिप्त राहण्याकडे त्यांचा विशेष कटाक्ष आहे. या त्यांच्या स्वभावानें त्यांना फारशी तकलीफ न होतां सुखच लागतें. हात राखून खर्च करण्याचा दुर्गाबाईचा स्वभाव असला, तरी कलाकुसरीच्या चीजा विकत घेण्यांत त्यांचा बराच पैसा आजपर्यंत सत्कारणीं लागला आहे. त्यांच्या दिवाण-खान्यांत काश्मीरपासून चीन देशापर्यंत बनविलेल्या वस्तु सांपडतात. तरी पण हिंदी चित्रकलेचे किंवा शिल्पकलेचे नमुने मात्र त्यांच्या घरीं म्हणण्यासारखे नाहींत. कलात्मक अंतःकरण असलेल्या दुर्गाबाईवर हिंदी कला आणि कलावन्त जगविण्याची जबाबदारी थोडी तरी पडते हें मी त्यांना पटविल्यावर दुर्गाबाईनीं दरवर्षी कांहीं तरी भरभक्कम रक्कम हिंदी कलेवर खर्च करण्याचें कबूल केलें. या बाबतींत मी-सुद्धां त्यांना मदत करण्याचें कबूल केलें असून साहित्य, चित्रकला

आणि शिल्पकला यांवर दुर्गाबाईंना खर्च करण्यास मी सवडीनें मदत करीनच. दुर्गाबाईंच्या बँकेवर तुळशीपत्र ठेवायला मला अगदीं संकोच वाटणार नाहीं. हिंदी कलावन्तांच्या सुंदर कलाकृती विकत घेऊन त्या भेट म्हणून कांहीं लायक संस्थांना देण्याचा आणि अशा रीतीनें समाजाची सौंदर्यदृष्टी सुधारण्याचा प्रयत्न करण्याचाहि बाईंचा विचार आहे. या बाबतींतहि योग्य ती मदत मी दुर्गाबाईंना अवश्य करीन.

दुर्गाबाई आज अनेक वर्षे सिनेमासृष्टींत वावरत असल्यानें लोक आपल्याबद्दल वाटेल तें बोलत असतील याची त्यांना पूर्ण जाणीव आहे. परंतु त्या त्याची फिकीर करून आपल्या मनाला त्रास करून घेत नाहींत. या बाबतींत कांहीं वेळेला बेजबाबदार टवाळ लोक वाटेल त्या थराला जातात. बाईंचा वडील मुलगा बकूल हा हाडा-पेरानें चांगला दणकट असल्यानें, तो अतां धिप्पाड तरुणाप्रमाणें दिसूं लागला आहे. परंतु मायलेक गाडींतून फिरायला जातांना, दुर्गाबाईंनीं नवीन मित्र कोण गांठला आहे अशी हलकट जिज्ञासा समाजांतील कांहीं शिष्ट लोक दाखवितात. आपल्या नीतीच्या रक्षणाची जबाबदारी आपण समाजावर कधींहि टाकली नाहीं आणि म्हणूनच आपल्या सदसद्विवेकबुद्धीला पटेल तें करण्यास आपण पूर्ण मुखत्यार आहों अशा आत्मविश्वासानें दुर्गाबाईंचे सर्व व्यवहार चालतात. त्यांना रोज भलींबुरीं पत्रें येतात आणि बरींबाईट माणसें भेटतात. प्रत्येक गोष्ट त्यांनीं मनाला लावून घेतली तर त्यांचा समाजांत कधींच निभाव लागला नसता. जिचें मन खंबीर नाहीं व जी लोकापवादाला घाबरते अशा मुलीनें सीनेमा लाईनमध्यें पडण्याचा मूर्खपणा करूं नये असें दुर्गाबाईंचें स्पष्ट मत आहे.

परंतु वरवर दिसणाऱ्या बाईंच्या आनंदी जीवनांत करुणरसाची सूक्ष्म रेषा कुठें तरी असावी असें मला सारखें वाटतें. गेल्या ३१ डिसेंबरला, I wish you a happy new year म्हणून दुर्गा-

बाईनीं माझ्याशीं हस्तान्दोलन केलें, त्या वेळीं कसली तरी आठवण होऊन त्यांचे डोळे ओलसर झाले असावेत अशी माझी कल्पना आहे. कांहीं दिवसांपूर्वीं मी बाईकडे गेलों असतां, पांढऱ्या शुभ्र पातळांत मी त्यांना पाहिल्यावर करुणरसाची मूर्ति माझ्यासमोर उभी आहे कीं काय, असा मला भास झाला. स्नानगृहांतून नुकत्याच आलेल्या दुर्गाबाईच्या गोऱ्यापान मानेवर असलेली माळ, दातांच्या कुंदकळ्या, गालावरील गुलाबगेंद पाहून स्फटिकपात्रांत ठेवलेल्या एखाद्या पुष्पगुच्छाची मला आठवण झाली. समोर दिसणाऱ्या अथांग सागराला पाहून, कुणालाहि थांग लागणार नाहीं अशा बाईंच्या हृदयसागराची भरतीओहोटी परिचितांच्या लक्षांत येते. आम्हां दोघांचे जीवनप्रवाह भिन्न दिशांनीं वहात असल्यानें, माझी व बाईंची यापुढें भेट होईल असें मला वाटत नाहीं. पण दुर्गाबाईंच्या मुखचंद्राप्रमाणें आकाशांत चांद उगवला आहे, तारकांची दौलत सगळीकडे उधळलेली आहे, घरट्याकडे परतलेले पक्षी मंजुळ किल-बिल करीत आहेत, छोट्या हरिनचा कांहीं तरी लाडिक चाळा चालू आहे आणि अंगणांत चांफ्याच्या झाडाखालीं आरामखुर्चीवर बकुलचें पत्र घेऊन समोरच पसरलेल्या अस्वस्थ सागराचें कर्णमधुर संगीत स्वस्थ चित्तानें ऐकणाऱ्या या सिनेमासम्राज्ञीचें, या आदर्श मातेचें चित्र माझ्या डोळ्यासमोर केव्हांहि उभें राहील !

नवयुग, १९४१.

# १ : डॉक्टर भालेराव

संध्याकाळचे सात वाजून गेले होते. मी ब्र्याच महिन्यांनीं भालेरावांच्या दवाखान्यांत त्या दिवशीं जात होतों. रस्त्यानें चालतांना साधारणपणें मी नेहमींच कांहीं तरी तंद्रींत असल्यानें, ओळखीच्या लोकांकडे दुर्लक्ष करणें किंवा अनोळखी माणसांना मुंबईच्या विशिष्ट पद्धतीनें हंसून क्षेमकुशल विचारणें, असे अनेक चमत्कार माझ्या हातून घडत असतात. त्या संध्याकाळींसुद्धां असेंच झालें. एका जागेंत मी नेहमींच्या संवयीप्रमाणें शिरलों. तें हेअर कटिंग सलून होतें. कांहीं कारागीर आपल्या हातांत सांपडलेल्या निरपराध जीवांना आपली हातचलाखी दाखवीत होते तर कांहीं लोक आपली पाळी केव्हां येते म्हणून हवालदील होऊन बसले होते. मी क्षणभर गोंधळलों. पूर्वी मी या जागेंत आलों असतां येथें डॉ. भालेरावांचा दवाखाना खात्रीनें होता हें मला चांगलें आठवत होतें. पण मताप्रमाणें मनुष्य जागाहि बदलूं शकतो ही साधी गोष्ट मात्र माझ्या ध्यानांत आली नाहीं. मी उलट पावलीं परत फिरलों आणि पलीकडल्या इमारतींत असलेल्या भालेरावांच्या नवीन दवाखान्यांत गेलों.

"अरे यार डॉक्टर—खूप जिरली माझी. पण तुम्ही आपल्या रूम्स केव्हां बदलल्यात?"

"गेल्या वर्षींच मी या जागेंत आलों. तुम्ही इथें आलां नव्हतां वाटतं यापूर्वी कधीं?"

"म्हणजे तें असं झालं पहा डॉक्टर—कांहीं तरी नादांत मी तुमच्या जुन्या जागेंत गेलों अन् तो सर्व थाट पाहून मला वाटलं......"

"काय वाटलं तुम्हांला कोल्हटकर?"

"खरंच सांगूं डॉक्टर, पण रागाऊं नका हं—तें सलून पाहून तुम्ही आपला प्रोफेशन बदललांत कीं काय असं मला वाटलं......"

माझें उत्तर ऐकून बापूसाहेब भालेराव खूप मोठ्यानें हंसले. त्यांच्याऐवजीं दुसरा कुणी असता, तर वरील उत्तर ऐकून त्यानें माझी चांगलीच उलटी सुलटी केली असती. पण बापूसाहेबांचें सारें आयुष्य हंसण्याच्या फिरकीवर फिरत असल्यानें, सद्धेतूनें केलेल्या चेष्टेबद्दल ते कुणावरहि सहसा रागावत नाहींत. भालेराव म्हणजे हंसणें, मनापासून तीन मजले हंसणें असें मी समजतों. त्यांची व माझी ओळख झाल्यापासून ते कुणावर फारसे रागावल्याचें मला आठवत नाहीं.

माझी व भालेरावांची ओळख कशी व केव्हां झाली याची मला आज नीटशी आठवण नाहीं. परंतु मागें ते 'अरविंद' या नांवाचें एक मासिक चालवीत असत आणि त्यांत माझ्या वडिलांचे लेख प्रसिद्ध होत असत. अरविंद चांगल्या दर्जाचें मासिक असल्यानें तें अल्पजीवी ठरलें हें साहित्यसृष्टींतील नियमाला धरूनच आहे. पण त्या निमित्तानें निर्माण झालेली तात्या आणि भालेरावांची मैत्री त्यांच्या (म्हणजे तात्यांच्या—भालेरावांच्या नव्हे!) अखेरच्या घटके-पर्यंत टिकली. पूर्वी माझे वडील मुंबईला आल्यावर भालेरावांकडे पाहुणे म्हणून उतरत आणि सुट्टी संपल्यावर ते खामगांवला आल्या-नंतर बापुसाहेबांच्या अनेक गमतीच्या गोष्टी सांगून त्यांची खूप स्तुती करीत. तेव्हांपासून भालेरावांबद्दल माझ्या मनांत अतिशय आदर उत्पन्न झाला आणि त्यांची ओळख व्हावी असें मला वाटूं लागलें. त्या वेळीं मी माझ्या मनांत अमृत नारायण भालेराव या नांवाच्या एका तरुणाचें चित्र रेखाटून ठेविलें होतें. पण प्रत्यक्ष ओळख झाल्यावर मात्र, चालते, बोलते आणि हंसरे भालेराव काल्पनिक चित्रापेक्षां जास्त दिलदार, जास्त रसिक आणि जास्त उदार, असे मला वाटले. आधींच देशस्थ आणि त्यांतून उदार, मग बापुसाहेबांकडे

पाहुण्यांची नेहमीं वर्दळ असल्यास नवल कसलें? कांहीं वेळेला या स्वारीकडे इतके पाहुणे स्वारी करीत, कीं मालक पाहुण्यासारखे आणि पाहुणे मालकासारखे राहिल्याचें दृश्य मी अनेक वेळेला पाहिलें आहे. आमचे तात्या बापुसाहेबांकडे पाहुणे असतांना, निवडक (आणि कांहीं वेळेला निवडलेल्या) साहित्यसेवकांच्या मैफलींचा आनंद मी अनेक वेळेला लुटला आहे. कांहीं लोकांच्या संभाषण-चातुर्याचे अनेक अविस्मरणीय प्रसंग आजहि मला आठवतात. विशेषतः तासन्‌तास चकाट्या पिटून बैठकींतल्या लोकांना बुद्धीच्या, अगाध व्यासंगाच्या आणि सूक्ष्म विनोदाच्या भांडवलावर सारखे हंसत ठेवणारे आजचे प्राध्यापक फाटक हे मला सर्वांपेक्षां सरस वाटत. नागपूरचे डॉ. मोडक, हरीभाऊ मुंजे, माझे चुलते अण्णा कोल्हटकर आणि भालेरावांचे जिगर दोस्त जयकर–धुमटकर बंधुसारख्या 'अत्यंत रसिक मंडळीच्या 'इनर सर्कल'च्या बैठकींत तर काव्य-शास्त्र-विनोदाची कमालच होत असे. अशा वेळीं खाद्यपेयांच्या तासातासानें निघणाऱ्या आवृत्त्यांवरून मंडळी तहान भूक विसरत असत, असें मात्र कुणालाहि म्हणतां आलें नसतें. कांहीं वेळेला पंडितराव नगरकरांसारख्या तरुण कलावंताचें गाणें होई. या दंगलींत भालेराव निष्कपट आनंदानें दंग होऊन जात. महाराष्ट्रांतील कांहीं अत्यंत बुद्धिमान, विनोदी, रसिक आणि प्रेमळ लोकांचीं हीं अपूर्व संमेलनें बापुसाहेबांसारख्या राजा आदमीमुळेंच शक्य झालीं आणि म्हणूनच बापुसाहेबांचें घर म्हणजे महाराष्ट्रांतील कांहीं साहित्यिकांच्या बुद्धीचें आणि स्फूर्तीचें केन्द्र झालें.

क्रिकेट खेळण्याचें आणि पहाण्याचें जबरदस्त व्यसन आमच्या बापुसाहेबांना आहे. उत्कृष्ट आमरसाच्या मेजवानीनंतर हा जवान मर्द ब्राह्मण हातांत बॅट घेऊन भर उन्हांत खेळण्यासाठीं बाहेर पडलेला मी पाहिला आहे. जिमखान्यांतील राजकारणांत निकरानें

भाग घेऊन तें मनापासून लढविण्यांत बापुसाहेब हमेशा तयार असतात. आणि तशीच वेळ आली, तर तत्त्वाच्या बाबतींत ते महात्माजींपर्यंत बेधडक धडक घेण्यास मागेंपुढें पहात नाहींत. टोपणनांवानें क्रिकेटवर लेख लिहून आपल्या सहजसुंदर लेखनशैलीनें बापुसाहेबांनीं फार मोठा तरुण वाचकवर्ग आपलासा करून घेतला आहे. क्रिकेटच्या मुंबईंतील 'हाय कमांडर'लासुद्धां आमच्या या तरुण डॉक्टरनें अनेक वेळेला झणझणीत मात्रा देऊन शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न केल्याचें ऐकिवांत आहे. भालेरावांच्या लेखनाचीच नव्हे तर टोपणनांवाचीहि नक्कल वर्तमानपत्रसृष्टींत झाली आहे, या एकाच गोष्टीवरून त्यांच्या अस्सल लेखनाची योग्यता वाचकांना पटेल. गेल्या वीस वर्षांत मुंबईंत झालेली एकहि मॅच बापुसाहेबांनीं सोडली असेल असें मला वाटत नाहीं.

भालेराव भावनाप्रधान असल्यानें, महात्माजींच्या राजकारणाच्या प्रवाहांत सांपडून ते एकदां जवळ जवळ देशभक्त होण्याच्या पंथाला लागले होते. परंतु त्यांतून स्वतःला सांवरून, त्या पंथांतील खादीच्या कार्यक्रमाची जबाबदारीच त्यांनीं आपल्या अंगावर घेतली असून त्या बाबतींत बापुसाहेबांनीं कधींहि अंगचोरपणा केलेला नाहीं. प्रत्येक पंथांतील चांगला आणि आपल्याला झेपेल असा कार्यक्रम उचलायचा आणि तो प्रामाणिकपणानें पार पाडायचा असाच भालेरावांसारख्या धोपटमार्गी माणसाचा खाक्या आहे.

परंतु भालेरावांची खरी कामगिरी राजकारणाच्या आखाड्यांतील नसून मुंबईच्या साहित्यक्षेत्रांतील आहे. मुंबई आणि उपनगर यांतील साहित्यविषयक प्रत्येक चळवळ बापुसाहेबांशिवाय फारशी हालचाल करूंच शकत नाहीं. अभिनंदनाचे वेळीं हंसायला आणि दुखवट्याचे सभेचे वेळीं चार टिपें गाळायला हा गृहस्थ विजारीच्या खिशांत हात घालून न चुकतां उपस्थित होत असतो. मुंबईंत भरलेल्या महाराष्ट्र-साहित्य संमेलनाचे वेळीं भालेराव, वर्दे आणि

आमोणकर यांनीं अविश्रान्त मेहनत घेतली, शेकडों लोकांना हंसतमुखानें संभाळून घेतलें आणि संमेलन यशस्वी केलें ही गोष्ट आमच्या स्मरणांत अजूनहि ताजी आहे. विशेषतः मला बापुसाहेबांची त्या वेळीं फार कींव येत असे. रात्रंदिवस काम करायचें आणि मामा वरेरकर, आमोणकर, वा. दा. गोखले यांनीं वेळीं अवेळीं केलेला विनोद हंसतमुखानें सहन करायचा ही गोष्ट किती कठीण आहे हें जाणते लोक जाणतातच. ज्या चळवळींत भालेराव नाहींत ती हटकून निर्जीव व सुनी सुनी वाटते आणि जेथें ते असतात तिला 'अमृता'ची अवीट गोडी येत असते असा मुंबईतील साहित्यप्रेमी लोकांचा अनुभव आहे. एखाद्या संस्थेची केस डॉ. भालेरावांच्या हातीं सोंपविली म्हणजे तिला कधींहि दगाफटका होणार नाहीं असा जणुं दंडकच ठरून गेला आहे.

भालेरावांचें चारित्र्य स्फटिकासारखें निष्कलंक असून त्यांचा आटोपशीर संसारहि फार सुखाचा आहे. पाहुण्यांच्या गर्दीतसुद्धां आपल्या मुलांना नक्की शोधून त्यांच्याशीं कांहीं वेळ तरी खेळतांना बापुसाहेब दिसतात. ते वास्तविक गर्भश्रीमंत आहेत. चांदीच्याच काय पण सोन्याच्या बोंडल्यांतूनहि त्यांनीं लहानपणीं दूध घेतलें असेल. मुंबई, पुणें आणि महाबळेश्वर येथें बापूंचीं घरें आहेत. अशा 'घरंदाज' तरुणाच्या हातांत खेळणारा पैसा हातोहात नाहींसा होऊन त्याला वास्तविक पाय फुटायला हरकत नव्हती. परंतु साहित्यबाजी आणि क्रिकेटबाजी यांशिवाय इतर कोणत्याहि 'बाजी'चें त्यांना व्यसन नाहीं. साहित्यक्षेत्रांत वावरूनसुद्धां ते आपली तहान नुसत्या पाण्यावर भागवितात आणि एका धर्मपत्नीशिवाय इतर स्त्रियांना मातेसमान मानतात याबद्दल भालेरावांबद्दल प्रत्येक माणसाला आदर वाटतो. तसेंच डॉक्टर या नात्यानें इतरांच्या उपयोगी पडणाऱ्या बापूंबद्दल माझी तक्रार नाहीं, पण एकदां एका भिकार लेखकाचा दुखावलेला उजवा हात भालेरावांनीं लवकर बरा

केला म्हणून माझ्याप्रमाणेंच अनेक लोक, वाचक या नात्यानें बापूंवर खात्रीनें खपा झाले असतील. मला स्वतःला बापुसाहेबांबद्दल आदर व प्रेम वाटण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत. पण माझ्या नेहमींच्या स्वभावाप्रमाणें त्या मी येथें दिल्या, तर त्यांना मात्र फार संकोचल्यासारखें होईल हें मला माहीत असल्यानें मी त्यांचा उल्लेख मुद्दाम टाळीत आहे. मैत्री करण्यासारखें माझ्यांत कांहीं आहे कीं नाहीं हें मला माहीत नाहीं—पण तात्यांचा मुलगा म्हणून तरी ते माझे चांगले मित्र आहेत. माझ्यांतील दोष जमेस धरूनही, बापु-साहेब आपल्या मृत मित्राच्या प्रेमाचें ऋण आजन्म फेडीत रहातील अशी माझी खात्री आहे.

स्वतः फारसे बडे लेखक नसतांहि, भालेरावांचें साहित्यसृष्टींत—निदान मुंबईच्या साहित्यसृष्टींत तरी—फार महत्त्वाचें स्थान आहे. श्रम, पैसा आणि वेळ खर्च करून त्यांनीं येथील वाङ्मयजीवनांत जीवंतपणा ठेवला आहे. या सर्व उचापतींत बापुसाहेबांचे हजारों रुपये खर्च झाले असतील. जाहिरातबाजीच्या चालू जमान्यांत वाटेल त्या गोम्यासोम्या बोरुबहाद्दराला ख्यातनाम होतां येत असलें, तरी अंगांत खरोखरीच योग्यता असतां भालेरावांसारख्या प्रसिद्धिविन्मुख माणसाची खरी योग्यता कंपुशाहीच्या सध्यांच्या काळांत सामान्य लोकांना कळणार नाहीं. त्यांच्यासारख्या निरलस, त्यागी आणि प्रामाणिक कार्यकर्त्यांची योग्यता एका दृष्टीनें प्रथितयश लेखकाइतकीच आहे असें मला वाटतें. बापुसाहेबांचा मदतीचा हात नसेल तर मुंबईतील वाङ्मयचळवळीचें पाऊल पुढें पडणार नाहीं अशी येथें स्थिति आहे. भालेरावांनीं मनावर घेतलें नसतें तर येथील हेमंत व्याख्यानमाला थंडीनें गारठून गेली असती. फार काय, पण भालेराव नसतील तर येथील साहित्यसेवकांच्या भोजनसमारंभांतील 'पान'हि सुखासुखी हलणार नाहीं अशी माझी खात्री आहे. भालेरावांच्या सार्वजनिक कार्यांतील यशाचें मर्म म्हणजे लोकसंग्रह करण्यास

आवश्यक असा गोड स्वभाव, क्रिकेटमुळें अंगीं बाणलेली खिलाडू वृत्ती आणि पैशाची झीज सोसण्याची तयारी. साहित्यिक म्हणून भालेराव सरस्वतीच्या मंदिराच्या कळसावर फार तर तळपणार नाहींत——पण त्या पवित्र मंदिराचा पाया होण्याचा मान मुंबईत ज्या थोड्या लोकांना आहे, त्यांत भालेरावांचा पहिला नंबर लागेल यांत शंका नाहीं. मंदिराचें शिखर जगाला दिसतें व म्हणूनच त्याचें कौतुक होत असतें. पण मंदिराचा पाया जनतेच्या दृष्टिपथांत नसल्यानें, त्यांत बळी जाणाऱ्या मूक—त्यागी लोकांच्या कर्तबगारीला फारशी वाचा फुटल्याचें ऐकिवांत नाहीं. प्रत्येक कलमकलंदराची शिखराकडे जाण्याची धडपड पाहून, साहित्यमंदिराचा कळस या दगडांच्या वजनामुळें केव्हां तरी कोसळून पडेल कीं काय अशी मला भीति वाटते. बदलत्या कालाबरोबर आज सन्मानानें मंदिराच्या शिखरावर असलेलें वाङ्मय कालान्तरानें कालवश होण्याचा संभव आहे. कांहीं वाङ्मय समाजाच्या मतपरिवर्तनानें टीकेच्या झंझावातांत सांपडून लेखकाच्या डोळ्यांदेखत वाऱ्यावर उडून गेल्यास कुणाला नवल वाटण्याचें कारण नाहीं. परंतु पायाची स्थिति तशी नाहीं. तो मजबूत असला तर जमीनदोस्त झालेल्या मंदिराचा जीर्णोद्धार करणें शक्य असतें——म्हणूनच कळसाप्रमाणें कोणत्याहि संस्थेच्या पायाचें महत्त्व माझ्या दृष्टीनें अधिक आहे. आमचे तरुण डॉ. भालेराव हे मुंबईच्या साहित्यमंदिराचा भक्कम पाया आहेत आणि म्हणूनच त्यांना साहित्यसृष्टींत सन्मानाचें स्थान आहे.

नवयुग, १९४१.

## १० : गोपीनाथ तळवलकर

“पाहिलात का कोल्हटकर तो चटोर मुलगा? या मुलीबरोबर रोज अंधार पडल्यावर भटकायला बाहेर पडत असतो. काय पण दोघं प्रेमांत येतात. तिच्या घरची मंडळी तरी या प्रकाराकडे डोळेझांक कशी करतात कुणास ठाऊक. आजकालच्या मुलांमुलींनीं तर ताळ सोडला आहे अगदीं!”

“तो मुलगा ना?—गोपीनाथ तळवलकर आहे तो. महामूर्ख आहे लेकाचा अगदीं—या नवमतवादाच्या जमान्यांत स्वतःच्या बायकोला राजरोस फिरायला घेऊन जातो म्हणजे काय?”

“म्हंजे ती त्याची बायको कीं काय? मग आधीं कां नाहीं सांगितलंत तसं मला?”

“तुम्ही तरी विचारलं होतं का तसं मला? पण जित्याची खोड आहे ना! या गोपीनाथाला खूपशा मैत्रिणी असल्यानं लोकांचा विनाकारण गैरसमज होतो त्याला तो तरी बिचारा काय करणार?”

लहान मुलांच्या ‘आनंद’ मासिकाचा संपादक आणि माझा मित्र गोपीनाथ तळवलकर याजबद्दल वरील संवाद चाललेला होता. त्याचा जन्म १९०८ सालीं झाला. (स्वभावचित्र लिहायलासुद्धां एकाद्याला जन्माला यावेंच लागतें.) न्यू इंग्लिश स्कूलनंतर मुंबईच्या विल्सन कॉलेजांत प्रीव्हिअसपर्यंत शिक्षण झाल्यावर परिस्थितीमुळें त्याला शिक्षणाला रामराम ठोकावा लागला. पोटासाठीं शिकवण्या, रेव्हेन्यू खात्यांत आंकडेमोड, मामलेदार कचेरींत अर्ज लिहिणें अनेक उचापती करीत असतां, स्त्रियांच्या प्रश्नांशीं काडीचाहि संबंध नसतां, बिचाऱ्या गोपीनाथाला या कालखंडांत कांहीं स्त्रियांच्या काडीमोडीचे अर्जहि खरडावे लागले असतील. गोपीनाथ पाचोरें येथें शिक्षक असतां एका भल्या मोठया पहांटेस त्याच्या खोलींत

आनंद मासिकाचे आपटे एकाएकीं 'निघाले' आणि या पोराची हुषारी पाहून त्यांनीं याला आनंद कार्यालयांत आणून ठेवलें. तेव्हां-पासून हें चिमुकलें प्रकरण आनंद कचेरीच्या दप्तरीं या दिवसापर्यंत दाखल आहे. तळवलकरांच्या या गृहरत्नाला आपट्यांनीं निरनिराळे पैलु पाडून जी कामगिरी केली तिजबद्दल गोपीनाथ अजूनहि कृतज्ञतेनें उद्गार काढीत असतो. १९३२ सालीं या चिरंजीवाचें लग्न होऊन मला एक अमोल सुनबाई लाभली.

ज्या पुण्यांत उत्साही तरुण झोंपेंतसुद्धां चळवळ करतो तेथें गोपी-नाथानें जागेपणीं हातपाय हलवायला सुरवात केली यांत नवल वाट-ण्याचें कारण नाहीं. माधव जूलिअन, गिरीश, 'गुरुवर्य' माडखोल-कर इत्यादि साहित्यसेवकांकडून सुदैवानें त्याला प्रोत्साहन मिळालें. अन्यांचें बोट धरून या बच्चा ई संपादकानें पुण्यांतील साहित्यक्षेत्रांतील विविध चळवळींत कार्य करण्यास आरंभ केला. विशेषतः शारदामंदि-राचा उत्साही चिटणीस या नात्यानें त्याच्या हातून उत्कृष्ट कामगिरी झाली. सभांतून धीटपणें बोलण्याची संवय करून त्यानें लवकरच एक होतकरू तरुण वक्ता म्हणून लौकिक कमावला. चांगल्या साहित्यिकांचा सहवास, उत्कृष्ट ग्रंथांचा सखोल अभ्यास, नांव मिळविण्याची महत्त्वा-कांक्षा आणि त्यासाठीं आवश्यक असणाऱ्या आधुनिक 'पब्लिकशिट्टी'चें तंत्र सफाईनें आत्मसात् करण्याची तयारी आणि उत्साही तारुण्य—असा सर्व योग जमून आल्यावर गोपीनाथाचा पुण्यांत लवकरच चांगला जम बसला यांत नवल नाहीं. वयाच्या चौदाव्या वर्षीं पहिली कविता करण्याचें पाप पचविल्यानंतर, त्यानें हळुहळू एखाद्या निढावलेल्या लेखकाप्रमाणें आपलें लेखन सुरू केलें—आज त्याच्या खात्याला लहानमोठीं अशीं चार पुस्तकें जमा आहेत. आजपर्यंतच्या तपश्चर्येच्या मानानें ही पुंजी जरी तुटपुंजी दिसत असली, तरी 'आशियाचे धर्मदीप' प्रज्वलित करणारा हा तरुण लेखक, साहित्यसृष्टींत कालां-तरानें दिवे लावील याबद्दल मला तरी शंका वाटत नाहीं. आनंद

मासिक त्याच्या संपादकत्वाखालीं किती सुंदर चाललें आहे यावरून गोपीनाथाची संपादक या नात्यानें बहुमोल कामगिरी महाराष्ट्राला माहीत आहेच. बालवाङ्मय लिहिणें, लहान मुलांचें मासिक चालविणें किंवा रेडिओवर लहान मुलांचे यशस्वी कार्यक्रम करणें हा कांहीं पोरखेळ नाहीं हें एकदां लक्षांत आणलें, म्हणजे गोपीनाथाच्या कठीण कामगिरीची कल्पना वाचकांना पटेल. मी अत्र्यांचा अंधभक्त आहे असा आरोप आणखी एकदां पत्करूनहि, त्यांच्यासारखें बालवाङ्मय निर्माण करण्याची पात्रता असणारा तितक्या योग्यतेचा एकहि मराठी लेखक नाहीं असें मला वाटतें. हें विधान करतांना, इतर कोणत्याहि लेखकाचा उपमर्द करण्याचें माझ्या मनांत नाहीं. अत्र्यांचे खालोखाल इतर नामवंत बालवाङ्मय लेखकांत गोपीनाथाचा बराच वर नंबर लागेल. बालसृष्टीशीं चिरंजीव गोपीनाथ हा किती एकजीव होतो हें त्याच्या 'कांहीं गृहरत्नें' या चिमकुल्या पुस्तकावरून सहज लक्षांत येतें. त्यानें आनंद कार्यालयांत लहान मुलांचें वाचनालय व त्यांच्यासाठीं कांहीं खेळ ठेवून जें नंदनवन तयार केलें आहे, त्यावरून या दिशेनें गोपीनाथाच्या हातून बालगोपालांची जी निर्मळ व अभिनंदनीय सेवा होते आहे ती कोणाच्याहि लक्षांत येईल. हा अभिनव उपक्रम महाराष्ट्रांत पहिलाच असावा असें मला वाटतें. वास्तविक असा उपक्रम पुणें म्युनिसिपालिटीनें सुरू करून प्रत्येक पेठेंत 'बाल-वाचनालय' सुरू करावें असेंहि मी म्हणेन. परंतु कीर्ति आणि प्रसिद्धी यांतील सूक्ष्म भेद गोपीनाथ यापुढें लक्षांत ठेवील, तर त्याच्या हातून सर्व क्षेत्रांत याहूनहि सकस कामगिरी होईल. कमलपत्रांतील निर्मल आणि पवित्र दंवबिंदु आणि अळवावरील पाण्यांत जो फरक असतो तोच कीर्ति आणि प्रसिद्धी यांत आहे. तरुण आणि होतकरू लेखकांनीं हें सोनेरी तत्त्व मनांत ठसविलें, तर त्यांच्या हातून उत्कृष्ट अशी बावनकशी साहित्यसेवा घडण्यास अडचण पडणार नाहीं. पण जी गोष्ट भल्याभल्यांना उमगली नाहीं

तेथें तरुणांनाच दोष देण्यांत काय अर्थ? सभेला गैरहजर राहून शिष्टासारखा 'संदेश' पाठविणें, निर्बुद्ध स्तुतिपाठकांना बरोबर बाळगून स्वारीवर निघणें, गाफील लोकांना स्वाक्षरी देणें वगैरे मार्ग कांहीं काल सोयीचे वाटले तरी आपलें ध्येय गांठायला मात्र ते फारसे उपयोगीं पडत नाहींत. स्वाक्षरीमधील सही कायम राहिली, तरी नांव मात्र सहजा सहजीं सहीसलामत टिकून रहात नाहीं हें कटु सत्य तरुणांनीं अवश्य लक्षांत ठेवावें.

आरामखुर्चीवर बसून गप्पा मारण्याइतका गोपीनाथाचा राजकारणाचा अभ्यासहि विस्तृत आणि सखोल आहे. पण ही स्वारी वृत्तीनें सुखासीन असल्यानें, राजकारणाच्या धकाधकींत प्रत्यक्ष भाग घेऊन देहदंड सोसणें हें अर्थातच शक्य नाहीं. पंडित जवाहरलाल यांजबद्दल त्याला कमालीचा आदर आहे. सभेला जाण्यासाठीं म्हणून त्याच्याजवळ खादीचा पोषाख नेहमीं तय्यार असतो. राजकारणाचें कोणतेंहि लफडें अंगावर घेतणार नाहीं, अशा घेतानेंच तो आपले सभेचे कपडे घेतीत असतो. एखाद्या सभेला तरुण आणि सुंदर मुली हजर रहाण्याचा संभव दिसला तर 'अय्या, गोपीनाथ किती साधे आहेत' असें प्रशस्तिपत्र मिळविण्यासाठीं हा 'साधा' गृहस्थ आपले केस आरशांत पाहून व्यवस्थितपणें अव्यवस्थित करायला विसरणार नाहीं.

गोपीनाथ स्वभावतः काव्यमय आणि प्रणयप्रधान असल्यानें जडवादाशीं त्याचें गोत्र फारसें जुळत नाहीं. गेलीं अनेक वर्षें प्रतिकूल परिस्थितीशीं झगडत असूनहि, त्याच्या स्वभावांत म्हणण्यासारखा असा कडवटपणा आलेला नाहीं. स्वतः पदवीधर नसूनहि त्याला न्यूनगंड नाहीं. त्याचा 'मोत्या' आणि परिवारांतील कांहीं भक्त पाहिले म्हणजे गोपीनाथाचें मुक्या प्राण्यांवर किती प्रेम आहे हें दिसून येतें. 'जीवन हें जगण्यासाठीं आहे' या तत्त्वाची जाणीव, त्यावर आधारलेल्या (?) एका बोलपटाची जानपछान होण्यापूर्वीच त्याला झालेली आहे. 'खाना, पीना—मजा करना' हें उमर खयामच्या

वाङ्मयाचें सार त्यानें हस्तगत केलें असल्यानें, जीवनांत खूपसें उच्च तत्त्व समोर ठेवून त्यासाठीं विनाकारण पळीभर रक्त आटवायला याची केव्हांहि तयारी नसते. सूक्ष्मसौंदर्यदृष्टि आणि संगीताचा 'कान' त्याला असल्यानें तो रसिक आहे हें सांगायला नको. न्यू थिएटर्सचें संगीत गुणगुणतांना मी त्याला अनेक वेळां पकडलें आहे.

गोपीनाथाला स्त्रीसहवासाची आसक्ति नसली तरी त्याचें विलक्षण आकर्षण आहे. (तसें तें नसतें कोणाला म्हणा!) सुदैवानें त्याला मैत्रिणीहि खूप आहेत. तो 'तसा' कर्‍हाडा वृत्तीचा नसल्यानें, या नाजुक मामल्यांत जातीभेद किंवा प्रान्ताभिमान बाळगण्याइतका तो खासच चोखंदळ नाहीं. नवीन मैत्रिणींची रोजकीर्द ठेवून लग्नसराई-नंतर वर्षांतून दोनदां खतावणी पूर्ण झाली, कीं मैत्रीच्या व्यापाराचा चोख हिशेब रहाण्यास हरकत नाहीं. मात्र या मैत्रीच्या मुळाशीं त्याचा वाईट हेतु असतो असें मी कधींहि म्हणणार नाहीं—कारण हा व्यवहार आमच्या सुनबाईच्या सक्त देखरेखीखालींच चाललेला असतो. एकादी पुण्याची मुलगी लग्न होऊन नागपूरला गेली म्हणजे, पुण्याच्या खात्यांत तीं नांवें टाकून नागपूरच्या खात्यांत जमा करण्याचें कामहि तिलाच करावें लागत असेल. पण यांत गोपीनाथाचा बराचसा वेळ जात असेल असें मला वाटतें. स्त्री ही स्फूर्तिदेवता व शक्ति आहे तें मलाहि मान्य आहे. पण ती शक्ति 'लागून' लक्ष्मणाप्रमाणें जमीनदोस्त होणारे हुतात्मे नसतीलच असें मात्र म्हणतां येणार नाहीं. परंतु ज्या अर्थीं गोपीनाथ या अपघातांतून आतांपर्यंत बचावला आहे, त्या अर्थीं त्याला यापुढेंसुद्धां फारसा दगाफटका होईल असें मला वाटत नाहीं.

गोपीनाथाला अनेक मित्र असले तरी मास्तर (क्षीरसागर), निरंतर आणि भय्या उंबराणी हे त्याचे विशेष जानी दोस्त आहेत. मास्तर आणि निरंतर हे गोपीनाथाला रोज एकदां तरी भेटल्या-शिवाय रहात नाहींत. त्यांची मैफल भरली म्हणजे निरंतर आणि

भय्या यांच्या विनोदी बोलण्यानें मनुष्य थक्क होतो. अत्रे, न. र. फाटक आणि बेडेकर यांच्या खालोखाल विनोदपूर्ण चकाट्या पिटण्यांत भय्या, निरंतरांचाच नंबर लागेल. महात्मा गांधींप्रमाणें हल्लीं दूध आणि मनुका यावर राहणारे मास्तर, आपल्या तन्दुरुस्तीच्या फिकिरींत हमेश परेशान असल्यानें ते बहुधा अशा बैठकींत अध्यक्षासारखे मुकाट्यानें बसलेले असतात. यांच्या या मैफलीचा निर्मल आनंद मला अनेक वेळां अनुभवायला मिळाला आहे.

गेल्या ऑक्टोबर महिन्यांत अंमळनेरला भरलेल्या ' कान्हदेशा 'च्या ( इति तात्याराव ) पहिल्या संमेलनासाठीं अध्यक्ष म्हणून गोपीनाथ-सारख्या पोराची निवड कां करण्यांत आली याचें अनेकांना आश्चर्य वाटलें असेल. साहित्यनिर्मितीच्या इवल्याशा भांडवलावर इतकें बडें डिव्हिडंड मिळविणारा गोपीनाथाशिवाय दुसरा भाग्यवान तरुण लेखक नसेल. तसें म्हटलें तर तो पट्टीचा असा गाजलेला लेखक नाहीं—बोलून चालून पुण्यांतील ' बी ' टीमचा तो एक खेळाडू आहे. तीराजवळ तीरणारा तो एक हौशी गडी आहे. वक्ता म्हणून त्याची मुजोरी उभ्या महाराष्ट्राला ऐकूं येण्यास अजून अवकाश आहे. तरी पण कांहीं ठराविक नांवांपलीकडे जाऊन अध्यक्ष निवडण्याची महाराष्ट्राला संवय नसल्यानें, अंमळनेरकरांनीं अंमळ उशीरा पाडलेला हा पायंडा अभिनंदनीय आणि महत्त्वाचा आहे यांत शंका नाहीं. यापुढें शेजवलकर, बेडेकर, ( C/o The International Book Service, Poona 4 ) वामन नारायण देशपांडे, पां. वा. गाडगीळ, य. गो. जोशी इत्यादि ज्ञानवृद्ध लेखक वयोवृद्ध होण्यापूर्वी महाराष्ट्रांत निरनिराळ्या ठिकाणीं अध्यक्ष म्हणून सन्मानानें चमकून समाजाला नवीन विचारांचें मार्गदर्शन करतील अशी मला आशा आहे. त्यांतल्यात्यांत शेजवलकर आणि बेडेकर यांच्यासारख्या तेज तरवारी आतांपर्यंत म्यानांतच असाव्यात हें माझ्या दृष्टीनें तरी महाराष्ट्राचें दुर्दैव होय.

## ११ : : दोन वहिणी

“ अरे यार, तुम्ही तर आपल्या लेखिकेलाहि ओळखत नाहीं— संपादक आहांत, दुसरं काय?”

पुण्यांतील लक्ष्मीरोडवरील सुप्रसिद्ध फोटो आर्टिस्ट भट यांच्या स्टुडिओंत मी बसलों होतों. फोटो घेण्याच्या खोलींतून एक तरुण जोडपें बाहेर पडलें. तीं मंडळी समोर येऊनसुद्धां मी त्यांच्याशीं बोललों नाहीं म्हणून भटांनीं वरील उद्गार काढले. ‘संजीवनी’ला इतकी सुंदर लेखिका लाभली होती, हें मला क्षणमात्र खरेंहि वाटलें नाहीं. पण आमची ओळख भटांनीं करून दिल्यावर सुंदर मुलीसुद्धां उत्कृष्ट काव्यें करूं शकतात याची मला खात्री पटली. कवयित्री आणि तिच्या कविता यांत जास्त सुंदर कोण आहे, असा तरळता विचारहि माझ्या मनांत येऊन गेला. जिवंत कवयित्रींत सौंदर्य आणि सुंदर कवितेंत जिवंतपणा नेहमीं पहायला कां मिळत नाहीं, हा प्रश्न मी स्वतःशीं सोडवीत असतां विधात्यानें निर्माण केलेली ती नयनंमनोहर कलाकृति मला मंदस्मितपूर्वक नमस्कार करून आपल्या पतीबरोबर एका क्षणांत स्टुडिओच्या बाहेर सटकली.

तिचा जन्म एका जुन्या खानदानी सरदार घराण्यांत झाला असूनहि, तिच्यांत काडीचीहि ऐट नाहीं. उदार वडिलांच्या कल्पवृक्षाखालीं तिचें बालपण गेलें असल्यानें तिचे सर्व प्रकारचे लाड झाले असल्यास नवल नाहीं—परंतु शेफारलेल्या श्रीमंत मुलांच्या स्वभावांत सामान्यपणें दिसून येणारा उन्मत्तपणा तिच्यांत कधींच आला नाहीं. तिच्या करारी स्वभावाला हट्टाचें आणि काव्यमय स्वभावाला लहरीचें स्वरूप आलें असल्यास तो दोष तिचा खासच नाहीं. वाढत्या शिक्षणानें तिच्या सुसंस्कृत मनावर उत्तम संस्कार होऊन तिच्यांतील बारीकसारीक दोषहि कालान्तरानें नाहींसे झाले. वयाच्या सतराव्या वर्षी तिनें आपल्या घरच्या लोकांना

पहिला--आणि शेवटचा--धक्का दिला. सुंदर सरदारकन्येचा विवाह एखाद्या संस्थानिकाच्या पुत्राशीं व्हावा, ही साधारणपणें सर्वांचीच अपेक्षा असते. आणि त्या अर्थाची भाषा तिच्या कानांवर पंधरा-सोळाव्या वर्षांपासून येऊं लागली होती. पण तिला त्यापूर्वींच प्रणयाची भाषा माहीत झाली होती आणि तिनें आपलें 'स्थळ' आधींच ठरवून ठेवल्यानें, इतरेजनांच्या मनाप्रमाणें स्थलान्तर करण्याची तिच्या मनाची तयारी नव्हती. तिला आपल्या निश्चयापासून परावृत्त करण्याचा प्रत्येकानें प्रयत्न करून पाहिला. परंतु त्याचा कांहींएक उपयोग न होतां या तरुण कवयित्रीनें मनानें वरलेल्या आपल्या उमद्या वल्लभाशीं विवाह केला. आज तिच्या विवाहाला दहा वर्षें होऊन गेलीं असलीं, तरी तिच्या वैवाहिक जीवनांतील प्रथमचा अल्लड आणि प्रणयपूर्ण ताजेपणा अजूनहि कायम आहे यावरून इतर प्रणयी जीवांना बरेंचसें शिकण्यासारखें आहे यांत शंका नाहीं.

तिची आणि माझी ओळख झाल्यावरसुद्धां आमचा स्नेह वाढायला कालावधि जावा लागला. गुप्त पोलिस खात्याप्रमाणें तिनें माझी सर्व माहिती आपल्या विश्वासांतील एका मैत्रिणीकडून काढली आणि माझ्या ओळखींत कांहीं दगाफटका नाहीं अशी स्वतःची खात्री करून घेतल्यानंतरच आमच्या ओळखीचें रूपान्तर स्नेहांत झालें. तिचा आणि माझा ऋणानुबंध आतां अनेक वर्षांचा असूनहि 'सा. न. वि. वि.' अशी सुरवात झालेलें तिचें प्रत्येक पत्र त्रोटक आणि 'ऑफिशिअल' थाटाचें असतें. आमच्या सुशिक्षित आणि सुसंस्कृत समाजाचा स्त्रियांच्या पत्रव्यवहाराकडे पहाण्याचा दृष्टिकोन बघूनच ती या बाबतींत पूर्ण व्यवहारी बनली असावी असा माझा तर्क आहे. कवियित्री असूनहि ती बावळट नाहीं, हा तिचा विशेष होय. साहित्यसृष्टींत ती आज अनेक वर्षें वावरत असूनहि तिला प्रसिद्धीची महत्त्वाकांक्षा नाहीं. तिच्या उत्कृष्ट कविता नेहमीं प्रसिद्ध व्हाव्यात म्हणून मी त्या दोन टोपणनांवांनीं 'संजीवनी'-

मध्यें छापीत असे. यावरून मी सुंदर लेखिकांच्या बाबतींत पक्षपात करतों असें माझे कांहीं मित्र थट्टेनें म्हणत. कवितेंत गुलाब असला तर कवयित्रीच्या कपोलाकडे माझ्यासारख्या रसिक संपादकाची दृष्टि जाईल, हा आरोप कपोलकल्पित होता हें सांगण्यांची जरूर नाहीं. साहित्यसुवर्ण निर्माण करणारी लेखिका सुवर्णांगी असलीच पाहिजे असा माझा कधींच हट्ट नव्हता. करुणरसाची अतिसूक्ष्म छटा असलेल्या तिच्या उत्कृष्ट कवितांचा संग्रह प्रसिद्ध झाल्यावर माझा पक्षपात क्षम्य होता असें सर्वांना कळून येईल.

तिची प्रकृति जात्याच नाजूक असल्यानें ती मधून मधून आजारी पडते. जीवन-मरणाच्या सीमाप्रान्तांत ती चार दोन वेळां जाऊन आलेली आहे. तरी पण त्या स्थितींतहि तिच्या हंसऱ्या चेहऱ्यावरील जबरदस्त आशावाद मावळलेला मी कधींहि पाहिला नाहीं. रुग्णशय्येवर शान्त चित्तानें पडून राहिलेल्या या कवयित्रीचा चेहरा, पांढऱ्या ढगांत असणाऱ्या निस्तेज चंद्रबिंबाप्रमाणें वाटतो. तिच्या काळ्याभोर पापण्यांपलीकडे पडलेले तिचे तेजस्वी डोळे, काळ्या मखमलीच्या इवल्याशा डबींत ठेवलेल्या हिरकण्यांप्रमाणें चमकतात. प्रकृतीच्या अशा हलाखींतसुद्धां ती अनेक वर्षांनीं आस्तेकदम करीत बी. ए.ची परीक्षा पास होऊन मराठींत पहिली आली. तिच्या पतीच्या एका जीवावरच्या दुखण्यांत तिचा मनोनिग्रह आणि काटकपणा यांचा अनुभव सर्वांना आला. आपल्या नाजूक प्रकृतींतहि तिनें त्याची बहात्तर दिवस अहोरात्र सेवा करून मृत्यूला झडप घालण्यास एकदांहि संधि दिली नाहीं. पतीची जीवनज्योत मंद मंद होऊन मालविण्याच्या पंथाला लागली असतां, इनें ती आपल्या 'स्नेहा'नें अखंड तेवत ठेवली. वाटेल त्या प्रसंगांत हिच्या मनाचा खंबीरपणा खचत नाहीं, अशा वेळीं तिची कोणी तोंडदेखली कींव करून सहानुभूति दाखविली तर ती चिडते.

इच्या धाकट्या बहिणीची आणि माझी ओळख हिनेंच करून दिली,

असंख्य कामगारबंधूंना सुखांचा स्वर्ग दाखवून स्वर्गसुखाचा अनुभव देतील अशी मला आशा आहे.

अप्पांना बैठे किंवा मैदानी खेळ खेळण्याची आवड नाहीं आणि वेळहि नाहीं. मजुरांचा अन्याय करणाऱ्यांची विकेट कशी घ्यावयाची हाच त्यांचा क्रिकेटचा खेळ. मालकशाहीच्या कारवायांना खो घालून त्यांच्या बिकट कोंडींतून मजुरांपर्यंत त्यांच्या न्याय्य व सनदशीर हक्कांचें लोण पोंचविणें हाच अप्पांचा खोखो व आट्यापाट्याचा 'मैदानी' खेळ. मालक—मजुरांच्या झगड्यांत, आपलें प्यादें हिकमतीनें पुढें सरकवून प्रतिपक्षावर मात करणें हाच त्यांचा बुद्धि-बळांचा बैठा खेळ. एक धड ना भाराभर चिंध्या, असा अप्पांचा स्वभाव नसल्यानें, जमनादास मेहतांप्रमाणें नव्या नव्या राजकीय पक्षांच्या पत्त्यांचे बंगले बांधणें अप्पांना साधत नाहीं. अशा रीतीचें अप्पांचें बैठें आयुष्य असूनहि, प्रकृतीच्या बाबतींत त्यांची फारशी तक्रार नसते ही समाधानाची गोष्ट होय.

मजुरांचे प्रतिनिधि म्हणून अप्पांची जुन्या व नव्या मुंबई कायदे-कौन्सिलांतील कामगिरी वाखाणण्यासारखी आहे. याशिवाय १९३२ पासून मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशनचे अप्पा लोकनियुक्त सभासद आहेत. याशिवाय अनेक सार्वजनिक संस्थांशीं त्यांचा जिव्हाळ्याचा संबंध आहे. लोकहिताची अप्पांना सतत तळमळ लागलेली पाहून प्रत्येकास अप्पांबद्दल कौतुक व प्रेम वाटतें यांत नवल काय ?

अप्पांनीं आजपर्यंत खूप प्रवास केलेला असला, तरी आपल्या लाडक्या मुलीसाठीं केव्हां तरी पहाव्या लागणाऱ्या 'स्थळा' खेरीज इतर प्रेक्षणीय स्थळें पहाणें त्यांना जमेलसें मला वाटत नाहीं. दिल्लीला अनेक वेळां जाऊनहि, वाटेवर असलेला ताजमहाल या भल्या गृह-स्थानें एकदांसुद्धां पाहिला असेल असें मला आज पैजेवर सांगतां येणार नाहीं. गेलेल्या गांवाहून सरळ मुंबईला परतायचें असा त्यांचा खाक्या आहे. तसेंच म्हटलें, तर अप्पांसारख्या सार्वजनिक 'संस्थे'ला

मध्यें छापीत असे. यावरून मी सुंदर ' लेखिकांच्या बाबतींत पक्षपात करतों असें माझे कांहीं मित्र थट्टेनें म्हणत. कवितेंत गुलाब असला तर कवयित्रीच्या कपोलाकडे माझ्यासारख्या रसिक संपादकाची दृष्टि जाईल, हा आरोप कपोलकल्पित होता हें सांगण्याची जरूर नाहीं. साहित्यसुवर्ण निर्माण करणारी लेखिका सुवर्णांगी असलीच पाहिजे असा माझा कधींच हट्ट नव्हता. करुणरसाची अतिसूक्ष्म छटा असलेल्या तिच्या उत्कृष्ट कवितांचा संग्रह प्रसिद्ध झाल्यावर माझा पक्षपात क्षम्य होता असें सर्वांना कळून येईल.

तिची प्रकृति जात्याच नाजूक असल्यानें ती मधून मधून आजारी पडते. जीवन-मरणाच्या सीमाप्रान्तांत ती चार दोन वेळां जाऊन आलेली आहे. तरी पण त्या स्थितींतहि तिच्या हंसऱ्या चेहऱ्यावरील जबरदस्त आशावाद मावळलेला मी कधींहि पाहिला नाहीं. रुग्णशय्येवर शान्त चित्तानें पडून राहिलेल्या या कवयित्रीचा चेहरा, पांढऱ्या ढगांत असणाऱ्या निस्तेज चंद्रबिंबाप्रमाणें वाटतो. तिच्या काळ्याभोर पापण्यांपलीकडे पडलेले तिचे तेजस्वी डोळे, काळ्या मखमलीच्या इवल्याशा डबींत ठेवलेल्या हिरकण्यांप्रमाणें चमकतात. प्रकृतीच्या अशा हलाखींतसुद्धां ती अनेक वर्षांनीं आस्तेकदम करीत जी. ए.ची परीक्षा पास होऊन मराठींत पहिली आली. तिच्या पतीच्या एका जीवावरच्या दुखण्यांत तिचा मनोनिग्रह आणि काटकपणा यांचा अनुभव सर्वांना आला. आपल्या नाजूक प्रकृतींतहि तिनें त्याची बहात्तर दिवस अहोरात्र सेवा करून मृत्यूला झडप घालण्यास एकदांहि संधि दिली नाहीं. पतीची जीवनज्योत मंद मंद होऊन मालविण्याच्या पंथाला लागली असतां, इनें ती आपल्या ' स्नेहा 'नें अखंड तेवत ठेवली. वाटेल त्या प्रसंगांत हिच्या मनाचा खंबीरपणा खचत नाहीं, अशा वेळीं तिची कोणी तोंडदेखली कींव करून सहानुभूति दाखविली तर ती चिडते.

इच्या धाकट्या बहिणीची आणि माझी ओळख हिनेंच करून दिली,

ती कर्वे युनिव्हर्सिटीची पी. ए. परीक्षा पास झाली आहे. वडील बहीण काव्यानंदांत बेहोष असते तर धाकटी चित्रकलेंत आनंद मानते. धाकटी बहीण गद्यलेखिका असली तरी प्रकृतीनें व प्रवृत्तीनें ती खासच गद्य नाहीं. ती वर्णानें जरा सांवळी असली तरी दिसायला मोहक आहे. वडील बहीण पद्मपुष्पाप्रमाणें असली तर धाकटी कृष्णकमलाप्रमाणें आहे. वडील बहीण गंगेप्रमाणें असली तर धाकटी यमुनेप्रमाणें आहे. धाकटीचें आयुष्य कठोर ध्येयवादावर आधारलेलें असल्यानें तिच्या चेहऱ्यावर करारी स्वभावाचें स्पष्ट प्रतिबिंब पहाणाऱ्याला दिसतें. आपल्या ध्येयाप्रमाणें तिनें एका गरीब पण अत्यंत थोर मनाच्या एका ध्येयवादी तरुणाशीं प्रेमविवाह केला आहे. अलीकडे प्रेमविवाहाच्या मामल्यांत कांहीं तरी 'हें' असतें असा अनेकांचा अनुभव असेल. तेव्हां कांहीं तरी 'अभिनंदनीय' म्हणून कानांवर आलें म्हणजे मला त्या जोडप्याबद्दल विनाकारण सहानुभूति वाटायला लागते; पण असला प्रकार या दोन्ही बहिणींच्या प्रेमविवाहांत झालेला नसून, त्यांचीं लग्नें खरोखरीच सर्व दृष्टींनीं दृष्ट लागण्यासारखींच झालेलीं आहेत. धाकट्या बहिणीचा ओढा समाजवादाकडे असून आयुष्यांत योग्यशी संधि मिळाली तर ती आपल्या तत्त्वाप्रमाणें खासच आपल्या मगदुराप्रमाणें कांहीं तरी कार्य करून दाखवील. स्वतः श्रीमंताची मुलगी असूनहि, आपल्या गरिबीच्या संसारांत ती आनंदानें कष्ट करतांना दिसते. लहानपणीं दासदासी तैनातीला असूनहि वेळ पडली तर ती धुणें—भांडींसुद्धां करायला मागेंपुढें पहात नाहीं.

एकाद्या नाजूक वेलीवर एकादें फूल असावें त्याप्रमाणें या दोन बहिणींना एकेक सुंदर मूल आहे. त्यांच्या बाललीलांत या बहिणींचा रोज किती तरी वेळ जात असतो. त्यांचीं भांडणें तोडण्यांत या प्रेमळ मातांना धन्यता वाटते. या दोन बहिणी पाहिल्या, म्हणजे गंगायमुनेच्या पवित्र संगमाच्या प्रयागक्षेत्राची मला आठवण होते.

ध्रुव, १९४२.

# १२ : कृष्णराव मराठे

अंगानें काटक, कमरेला पंचा, अंगांत गुंड्या असलेला किंवा नसलेला सद्रा, डोक्यावर टोपी, पायांत तुटक्या वहाणा आणि डोळ्यांत कमालीचा मिस्किलपणा—अशा थाटाचा उंचसा म्हातारा पुण्यांतील टिळक रोडवरील भाऊ कॉलेजच्या कोपऱ्यावर गवत विकणाऱ्या माणसाबरोबर सकाळीं आठ वाजण्याच्या सुमाराला भाव ठरवितांना सांपडला, तर त्याच्या पाठीवर कृष्णराव मराठे म्हणून, आपल्या बोटांना फारशी इजा होणार नाहीं अशा बेतानें थाप मारायला हरकत नाहीं. तो तुमचें स्मित-वदनानें स्वागत करील, गवताच्या महागाईबद्दल चार शब्द बोलेल आणि जवळ उभ्या असलेल्या आपल्या गाईचें दावें धरून घराकडे चालूं लागेल. रस्त्यांत कोणी ओळखीचा मनुष्य भेटलाच, तर ही स्वारी हंसतमुखानें त्याच्याकडे पाहील आणि पुन्हां नाकासमोर चालूं लागेल. याच स्वारीला उभा महाराष्ट्र 'अश्लील मराठे' म्हणून ओळखतो.

मराठी वाङ्मयांत लेखनाचा कांहीं पराक्रम न करतांहि, चांगला नांवलौकिक कमावणारे हे गृहस्थ कोणालाहि आवडतील. जुन्या बाळ-बोध घराण्यांत त्यांचा जन्म झाल्यानें त्यांच्या आयुष्याला सहाजिकच जुनी शिस्त लागली. लहानपणापासून त्यांना तालमीचा नाद लाग-ल्यानें वृत्तीप्रमाणें त्यांचें शरीरहि पिळदार बनलें. ते चहा पीत नाहींत, विड्या फुंकीत नाहींत आणि हॉटेलमध्येंहि जात नाहींत. निर्व्यसनी मनुष्य पाहिला म्हणजे मला त्याची कींव करावीशी वाटते, आणि इतकें रुक्ष आयुष्य खरोखरीच आनंदानें जगण्यासारखें असतें कीं नाहीं असा मला प्रश्न पडतो. त्यांच्या मुलांनाहि हीच कडक शिस्त लागली असल्यानें वडिलांप्रमाणें तींहि अगदीं निर्लेप आणि सोंवळीं आहेत असें कृष्णराव मोठ्या अभिमानानें सांगतात. खाल-

पासून वरपर्यंत सर्वांचीच अशी वृत्ति असल्यानें, त्यांच्या घरांत अस्सल गबाळग्रंथी साधेपणाचा मामला असल्यास नवल वाटण्याचें कारण नाहीं. लोखंडी पट्ट्यांचा एक पलंग त्यांच्या 'दिवाणखान्यां'त अहोरात्र झोंपा घेत पडलेला असतो. एखादी खुर्ची एखाद्या कोपऱ्यांत जगाकडे पाठ करून माणसांतून उठल्याप्रमाणें अस्ताव्यस्तपणानें ठाण मांडून बसलेली दिसेल. कृष्णरावांच्या घरीं असलेल्या खुर्च्या बसायला अतिशय गैरसोयीच्या असल्यानें, त्या बहुधा उन्नति–उत्कर्षांच्या भट्टींतून तावून सुलाखून आलेल्या असाव्यात असें वाटतें. एका कोपऱ्यांत डाव्याच पायाच्या दोन वहाणा पाहून, कृष्णरावांना दोन्हीहि डावे पाय आहेत कीं काय हें मीं हळूच चोरून पाहिलें. खुंटीवर अव्यवस्थितपणानें कपडे टांगलेले दिसले तरी, त्यांत जनानी कपड्यांची गल्लद झालेली दिसून आली नाहीं. रंग गेलेल्या भिंतीवर कांहीं बोधवचनें पहाणाऱ्याला सांपडतील. एकंदरीनें अशा 'बालबोध' थाटांत साहित्य-सृष्टींतील हा फुकट फौजदार रोज दुपारीं मराठींतील अश्लील लेखनाचें गाठोडें घेऊन गुन्हेगाराच्या शोधांत गढून गेलेला आढळतो. गृहस्थाश्रमाला शोभणारें आदरातिथ्य कृष्णरावांमध्यें भरपूर असल्यानें, मला कधीं लाडू तर कधीं सरबत मिळतें. निर्मल मन, निर्मल चारित्र्य आणि थोडासा विनोदी स्वभाव असा मजेदार बनाव कृष्णरावांमध्यें झालेला असल्यानें मला त्यांच्याशीं तास अर्धा तास गप्पा मारायला फार आवडतें. दुसऱ्याची गैरसोय करण्यांइतका हा गृहस्थ सनातनी नाहीं किंवा स्वतःची कुचंबणा करून घेण्याइतका सुधारकहि नाहीं. कृष्णरावांचा वाङ्मयांत चालू असलेला उद्योग आणि वर्तमानपत्रांत होणारी त्यांची संभावना पाहून हा गृहस्थ तापट किंवा चक्रम असावा असें एखाद्याला वाटण्याचा संभव आहे. पण खरा प्रकार अगदीं निराळा आहे. स्वारी अगदीं थंड वृत्तीची असून प्रतिस्पर्ध्यांशीं

खेळीमेळीनें दोन हात करायला एका पायावर तयार असते, ही गोष्ट त्यांचा परिचय झाल्यावर प्रत्येकाच्या मनाला पटूं लागते.

माझी व कृष्णरावांची पहिली भेट, मला वाटतें, नागपूर साहित्य संमेलनाचे वेळीं नागपूर मेलमध्यें झाली. त्यांच्या सामानांत अश्लील वाङ्मयाचें आणि त्यावरील ठरावाचें बोचकें होतें ही गोष्ट नंतर मला समजली. १९३१ सालीं समाजस्वास्थ्याचा एक अंक वाचीत असतां त्यांतील मजकुरानें कृष्णरावांचें मनःस्वास्थ्य एकाएकीं बिघडलें आणि अश्लील वाङ्मयाच्या भुतानें त्यांना चांगलेंच पछाडलें. समाजस्वास्थ्या-सारख्या शास्त्रीय विषयाला वाहिलेल्या मासिकांतील मजकूर जरा चमत्कारिक असला, तरी तो अश्लील नसतो असें अनेकांप्रमाणें माझेंहि मत आहे. कर्व्यांनीं तें मासिक उच्च ध्येयानें काढलें असून त्यासाठीं त्यांनीं स्वार्थत्यागहि केला आहे. लैंगिक विषयांवर त्यांत लेख येणें अपरि-हार्य असलें तरी तें मासिक अश्लील चौकटींत खासच बसत नाहीं. तरी पण त्या मासिकाच्या वाचनानें अनिष्ट वाङ्मयाला गाडून टाकण्याचा त्यांनीं विडा उचलला. (या अर्थाशिवाय, विड्याचा आणि कृष्णरावांचा संबंध कधींच आलेला नाहीं !) तेव्हांपासून प्रत्येक साहित्य-संमेलनांत आपला आवडता ठराव मांडून त्यांनीं सर्वांना सळो का पळो करून सोडलें. नागपूरला या ठरावावर मुख्य भाषण करण्याची जबाबदारी कृष्णरावांच्या दुर्दैवानें कमलाबाई किबे यांजवर सोंपविण्यांत आली. त्या प्रसंगीं (हो, प्रसंगच नाहीं तर काय?) आपल्या लौकिकाला साजेल असें अचाट पराक्रमी 'खंजिरी' भाषण करून बाईनीं सर्वांना कसें चकित केलें याचा इतिहास प्रत्येकाला माहीत आहेच. परंतु बाईंच्या भाषणांतील खंजिराचा एक निसटता वार ठरावाला लागून तो पसार होण्याऐवजीं त्या बिचाऱ्याला जीव मुठींत घेऊन संमेलनांतून पळ काढावा लागला. तरी पण कृष्णरावांचा धीर खचला नाहीं. त्यांनीं आपला जखमी ठराव अखेरीला बडोद्याला पास करून घेतलाच; आणि आपण या कटकटींतून कायमचे सुटलों अशा गोड

कल्पनेनें साहित्यिकांनीं समाधानाचा सुस्कारा सोडला. पण अफसोस ! त्यांचा तो आनंद अल्पजीवी ठरण्याचा विधिसंकेत होता. कारण म्हाताऱ्याला याच सुमाराला पावित्र्य–विडंबनाचा ठसका लागून कृष्णराव पुन्हां महाराष्ट्राच्या मागें लागले. सिनेमा आणि ग्रामोफोन रेकॉर्डस् यांकडे त्यांनीं आपला मोर्चा वळविला. एरव्हीं ब्रँडीच्या बाटलीच्या चुकूनहि वाटेस न जाणारे कृष्णराव, त्या नांवाच्या सुंदर बोलपटाच्या मागें लागले आणि त्यांनीं त्यांतील शंभर फुटांचा भाग कां व कसा उडविला हें आतां सर्वांना ठाऊक आहेच. रामसीतेची टिंगल असलेला एक रेकॉर्ड हिंदूंची धर्मभावना दुखविणारा आहे अशी तक्रार कृष्णराव लवकरच सरकारपर्यंत भिडविणार आहेत असें मला कळतें. मीं तो रेकॉर्ड ऐकलेला नसल्यानें कृष्णरावांची तक्रार वाजवी आहे कीं नाहीं हें मला आतांच सांगणें शक्य नाहीं. परंतु कृष्णराव म्हणतात तसा प्रकार खरोखरीच असेल, तर त्या कंपनीनें तो रेकॉर्ड बाजारांतून काढून घेणें शहाणपणाचें ठरेल असें मला वाटतें. विनोदाच्या नांवाखालीं देवादिकांची चेष्टा करायची खुमखुम त्या कंपनीला असेल, तर तिनें इतर धर्मांतील देवांना जरा आपल्या दिव्य विनोदाच्या तडाख्यांत आणून तसें रेकॉर्ड बाजारांत आदळून काय गंमत होते हें पहावें. सीता, सावित्री, द्रौपदी यांसारखीं उज्ज्वल रमणीरत्नें पावित्र्याचीं प्रतीकें म्हणून आमच्यासमोर आज हजारों वर्षें प्रतिष्ठेनें वावरत असतां, त्यांच्याशीं एकाद्या धटिंगणानें विनोदाच्या नांवाखालीं अतिप्रसंग करावा हें कृष्णरावांनाच काय पण कुणालाहि मान्य होणार नाहीं. विनोदनिर्मितीसाठीं इतर हजारों विषय असतांना थोर स्त्री-पुरुष आणि देवदेवता यांच्या वाटेस जाण्याचें वास्तविक कुणालाहि कारण नाहीं. समाज कितीहि बुद्धिजीवी झाला तरी आदराचीं आणि भावनेचीं अशीं कांहीं स्थानें असतात. या सर्व गोष्टी सूर्यप्रकाशाइतक्या स्पष्ट असतांना, त्या आमच्या लक्षांत आणून देण्यासाठीं एखादा कृष्णराव मराठे लागावा हें समाजाचें दुर्दैवच म्हटलें पाहिजे.

कृष्णरावांची व माझी ओळख होण्यापूर्वी उचापती करण्याच्या त्यांच्या स्वभावाबद्दल माझा बराच गैरसमज झालेला होता. साहित्यसृष्टींत प्रसिद्धीच्या क्षेत्रांत वाटेल त्याला सहज रीतीनें चरतां येतें म्हणून हे गृहस्थ सगळ्यांचा डोळा चुकवून या फंदांत पडले असावे असें मला पहिल्यापहिल्यानें वाटे. तसेंच पेणसलींत निघाल्यावर तन्दुरुस्तीसाठीं कांहीं तरी चाळा असावा म्हणून हा उद्योग कृष्णरावांनीं आपल्यामागें लावून घेतला असावा अशी समजूतहि कांहीं लोकांची अजून आहे. मराठींतील झाडून सारें अश्लील वाङ्मय राजरोसपणानें वाचायला मिळावें म्हणूनच या मल्या गृहस्थानें ही खटपट चालविली आहे असेंहि कांहीं चावट लोक म्हणतात. परंतु त्यांचा आणि माझा परिचय वाढल्यानंतर माझा सर्व गैरसमज दूर होऊन कृष्णरावांचा हा भगीरथ प्रयत्न अत्यंत प्रामाणिक-पणाचा आहे अशी माझी खात्री झाली. निंदास्तुतीची पर्वा न करतां एखाद्या मिशनऱ्याला शोभेल अशा वृत्तीनें ते आपलें कार्य करीत आहेत. लोक त्यांची इतकी चेष्टा करतात, कीं त्यांच्याऐवजीं दुसरा एखादा तापट मनुष्य असता तर त्याच्या कार्याचे तीन तेरा केव्हांच झाले असते. परंतु आज इतकीं वर्षें खटपट करूनहि कृष्णरावांना आपल्या कार्यांत यश कां आलें नाहीं हा प्रश्न उरतोच. त्यांनीं लोकमत तयार करण्याचा प्रयत्न करूनहि मराठी वाङ्मयांत अनिष्ट वाङ्मयाचे प्रवाह पूर्वीप्रमाणें जोरानें चालू आहेत. याचें मुख्य आणि महत्त्वाचें कारण म्हणजे कृष्णरावांनीं तरुण पिढीला पूर्णपणें विश्वासांत घेतलें नाहीं हें होय. अनिष्ट वाङ्मय वाचण्याकडे तरुण पिढीचा विशेष नैसर्गिक ओढा कां आहे हें जाणून घेण्याचा सहानुभूतीचा प्रयत्न कृष्णरावांनीं केला नाहीं, असें मला वाटतें. तरुण पिढीकडून कोणतेंहि कार्य करून घ्यावयाचें असेल तर तिला आंजारून गोंजारूनच तें साधून घेतलें पाहिजे. बदलत्या काळाबरोबर जागतिक विचारक्रान्तीचा परिणाम आमच्या तरुण–तरुणींच्या मनावर झाला असल्यास त्यांत नवल नाहीं. या युद्धानें तर आचारविचार आणि

नीति—अनीतीच्या कल्पना यांवरहि फार मोठा परिणाम होणार आहे. तरी पण त्यानें गांगरून न जातां, त्याबद्दल तरुण पिढीचा धिक्कार न करतां, नवविचारांच्या बेफाम पुराचें पाणी नीट गाळून घ्यावें असें सामोपचारानें तरुण पिढीला सांगून तिला विश्वासांत घेणें कृष्णराव आणि तत्सम विचारवंतांना करणें अपरिहार्य होईल. उदाहरणार्थ, संततिनियमनासारखा प्रश्न मी घेतों. अनिष्ट वाङ्मयाचें इतर खाद्य समोर असतां कृष्णरावांनीं हा विषय उष्टावला नसता तरी चालण्यासारखें होतें. त्यामुळें तरुण पिढी थोडीशी बिचकून कृष्णरावांच्या खऱ्या कार्याकडेहि सहानुभूतिशून्य नजरेनें पाहूं लागली. कृष्णरावांनीं तरुणतरुणींची उपेक्षा करून त्यांना आपल्या विचारांच्या पातळीवर आणण्याचा यत्न केला नाहीं असें मला वाटतें. तरुणांच्या अड्ड्यावर जेठा मारून बसण्याऐवजीं त्यांनीं आपला डेरा विश्राम मंडळासारख्या कुचकामी वृद्धांच्या दिवाणखान्यांत ठोकला. आपल्या कार्याची महती वृद्धांना सांगणें हें, गोरक्षणाचा संदेश हिंदु लोकांना पटविण्याइतकें मुत्सद्दीपणाचें आहे असें मला वाटतें. फार काय, पण दिशाभूल झालेल्या अनिष्ट लेखन करणाऱ्या कांहीं तरुण लेखकांना विश्वासांत घेऊन त्यांच्यावर आपल्या कार्याची थोडीशी जबाबदारी कृष्णरावांनीं टाकली असती, तर त्या प्रयोगांत त्यांना थोडें तरी यश आलें असतें असें मला वाटतें. चोराच्या हातीं जामदारखान्याच्या किल्ल्या देणें कांहीं वेळेला तरी शहाणपणाचें ठरतें हें कृष्णराव जाणतातच. तसेंच 'अनिष्ट-लेखन समालोचन समिति' [ अरे बापरे! ] या प्रचंड संस्थेमार्फत नवयुग, झंकार, मौज वगैरे पत्रांवर ठराव पास करून घेणें याचाहि फारसा उपयोग होईलसें मला वाटत नाहीं. अत्रे-फडक्यांनीं कितीहि अनिष्ट लेखन केलें तरी ते तरुण पिढीचे आवडते लेखक आहेत. त्यांना वठणीवर अणावयाचें असेल तर त्यासाठीं त्यांना तरुण पिढीकडूनच तसला आदेश द्यावा लागेल. थोडक्यांत म्हणजे, कृष्णारावांनीं यापुढें तरुण पिढीला मान्य होणार नाहीं अशी एकहि नवी आघाडी

निर्माण करून आपली मर्यादित शक्ति खर्च करूं नये असें मला वाटतें.

दुसरी गोष्ट म्हणजे कृष्णरावांच्या हातून साहित्यसृष्टींत भरीव असें कोणतेंच कार्य झालेलें नाहीं. त्यांच्या खात्याला उत्कृष्ट आणि इष्ट असें वाङ्मय जमा असतें, तर अनिष्ट वाङ्मयावर त्यांना जास्त अधिकारवाणीनें बोलतां आलें असतें. ते उत्तम वक्तेसुद्धां नाहींत असें वाटतें. म्हणजे तरुण पिढीला जवळ करण्याचें एकहि वशीकरण यंत्र त्यांच्यापाशीं नाहीं. कृष्णरावांच्या कार्याबद्दल बापुसाहेब माट्यांना फार जिव्हाळा वाटतो याबद्दल वाद नाहीं. पण अधून-मधून कृष्णरावांच्या हाताला हात लावून 'मम' म्हणून त्या कार्याशीं औट घटकेचा संसार करण्यापेक्षां माट्यांनीं आपलें शक्ति-सर्वस्व त्यासाठीं वेंचण्याचें ठरविलें तर या प्रश्नाकडे चावटपणा म्हणून लोकांचें लक्ष न जातां ते त्याचा गंभीरपणानें विचार करूं लागतील. लेखणी आणि वाणी यांवरील माट्यांचें प्रभुत्व लक्षांत आणतां, इतका लायक दुसरा गृहस्थ या कार्यासाठीं मिळणें अशक्य आहे, असें खुद्द कृष्णरावहि कबूल करतील. कृष्णरावांत मुजोरी असली तर माट्यांत वक्तृत्व आहे. कृष्णरावांना लिहितां येत असलें तर माटे हे प्रथितयश लेखक आहेत. कृष्णराव साधी व्यक्ति आहे तर माट्यांमध्यें ढंगदार व्यक्तित्व आहे; कृष्णरावांचा व तरुण पिढीचा प्रत्यक्ष संबंध येत नसला तर माट्यांच्या हाताखालून प्रतिवर्षी हजारों विद्यार्थी जात असतात. सनातनी सुधारक या नात्यानें माटे हे नव्या जुन्या पिढींतील महत्त्वाचा दुवा आहेत. अस्पृश्यांच्या बाबतींत त्यांनीं फार महत्त्वाचें कार्य केलें असल्यानें तरुण पिढीला त्यांच्याबद्दल आपलेपणा वाटतो. या सर्व गुणांबरोबर माट्यांचे कांहीं दोषहि आपद्धर्म म्हणून कृष्णरावांना पत्करावे लागतील. वादाच्या आखाड्यांत थंडपणानें सदभिरुचीच्या मर्यादेंत माटे खेळीमेळीनें वागतीलच हें सांगणें जरा धाडसाचें होईल. अन्यांवर वेळीं अवेळीं गुर-गुरणारे माटे, असभ्य वैयक्तिक टीका करणाऱ्या एखाद्या धंदेवाईक साता-

हिकाशीं झटपट 'ॲक्सिस' कसा करूं शकतात हा अशक्य चमत्कारहि पहाण्याची पाळी दुर्दैवानें महाराष्ट्रावर आली आहे. स्वतः दुसऱ्यांवर टीका करण्याची त्यांना हौस असली तरी स्वतःच्या बाबतींत मात्र ते फारच हळुवार वृत्तीचे झाले आहेत. माटयांच्या एखाद्या प्रामाणिक टीकाकाराला त्यांच्या लाडक्या पत्रानें जनावराच्या दावणींत बांधलें तरी हा गृहस्थ त्या पत्राला शिष्टाचाराचे नियम शिकवायला तयार नसतो. परंतु न्यायाच्या बाबतींत 'रामशास्त्री' म्हणून माट्यांचा लौकिक फारसा नसल्यानें, त्यांचे वरील अक्षम्य दोषहि कार्याच्या महत्त्वाकडे लक्ष देऊन क्षम्य मानणें अपरिहार्य आहे. माट्यांनीं हें कार्य हातांत घेतलें तर त्याचा व्याप सदाशिव पेठेबाहेर ते खचित वाढवितील अशी मला खात्री आहे. कृष्णरावांनींहि वाटेल त्या विषयावर आपलें टीका करण्याचें तंत्र बदलणें अवश्य आहे. दिवसभर 'तासणारा' कारागीरसुद्धां मंगल प्रसंगीं सनई चौघडा वाजवितो हें कृष्णरावांनीं विसरूं नये. अत्रे–फडके यांजबद्दल योग्य त्या वेळीं चांगले उद्गार कृष्णरावांनीं जाहीर रीतीनें काढले तर त्यांच्या निःपक्षपाती स्वभावा-बद्दल तरुण पिढीची खात्री होईल. सध्यांचें अनिष्ट वाङ्मय अत्रे–फडक्यांना मनापासून आवडतें असें आग्रहानें गृहीत धरणेंहि त्या थोर आणि ख्यातनाम लेखकांना अन्यायाचें होईल.

कृष्णरावांचें कांहींहि चुकत असलें तरी त्यांच्या कार्याकडे व शुद्ध हेतूकडे तरुण पिढीनें चिकित्सक बुद्धीनें पहावें. कानफाट्या म्हणून जरी त्यांचा आज लौकिक असला तरी तरुण पिढीच्या कल्याणासाठींच संस्कृति–संरक्षकाची भूमिका त्यांनीं पत्करली आहे, हें लोकांनीं विसरूं नये. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही, कीं त्यांची खरी योग्यता आम्हांस पटलेली नाहीं. अनिष्ट वाङ्मयाची नशा उतरल्यावर, तिच्या भयंकर प्रतिक्रियेंतून त्यांना तरुण पिढी बचावायची आहे आणि म्हणूनच पुरोगामी लेखकांइतकेच तेहि तरुण पिढीचे मित्र आहेत असें मला वाटतें. त्यांची ओळख करून घ्या आणि त्यांचें कांहीं चुकत असलें

तर तसें त्यांना सांगा. ते तुमच्यावर रागावणार नाहींत. त्यांच्यामागें महाराष्ट्रांतील तरुण पिढी अंशतः तरी आहे असें त्यांना पटलें तर त्यांना फार समाधान होईल. भाऊ कॉलेजच्या कोपऱ्यावर ते तुम्हांला कधीं तरी सकाळचे भेटतील. त्यांच्याबरोबर गाय असली तरी बिचकून जाऊं नका. त्यांच्या घरीं जाऊन बिनआरामाच्या खुर्चीवर बसा आणि त्यांच्याशीं मोकळेपणानें गप्पा मारा. तुमच्या नशिबांत असलें तर तुम्हांला लाडू आणि सरबत मिळेल आणि त्या दृष्टीनें तरी तुमचा वेळ फुकट गेला नाहीं असें तुम्हांला वाटेल.

यशवन्त, १९४२.

## १३ : : अनंत हरी गद्रे

गिरगांवांत रोज सकाळीं नऊ–दहाचे सुमारास अंगांत खादीचा कोट, डोक्यावर काळी टोपी, खांद्यावर वायुलहरीबरोबर फडफडणारें उपरणें, आणि हातांत वर्तमानपत्रांचें एक बंडल घेऊन एक मध्यम वयाचा गृहस्थ पोर्तुगीज चर्चकडून कृष्ण सिनेमाकडे जातांना दिसतो. रस्त्यानें चालतांना तो कुठल्या तरी तन्द्रींत आहेसा वाटतो. कांहीं वेळेला त्याला स्वतःशींच पुटपुटतांना पाहिलें म्हणजे त्याला मर्ढेकरांचा 'संज्ञाप्रवाह' झाला आहे कीं काय अशी शंका येऊन त्याबद्दल सहानुभूति वाटूं लागते. संकटांचे पर्वत डोक्यावर कोसळत असले तरी याचा चेहरा नेहमीं प्रसन्न असून ओठांत [ विडी नसल्यास ] मिस्किल हंसूं खेळत असतें. अशा या मजेदार व्यक्तीचें नांव अनंत हरी गद्रे असें असून हें नांव आज दीड–दोन तपें पत्रसृष्टींत कमीअधिक प्रमाणांत 'गर्जत' आहे. अनंतराव कॉलेजांत हुशार विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध असले, तरी कुणाची तरी दृष्ट लागून त्यांच्या शिक्षणाची गाडी बी. ए. पर्यंत कां गेली नाहीं हें 'हरी' जाणे. पण आपण पदवीधर नाहीं या गोष्टीचा, इतर कांहीं साहित्यिकांप्रमाणें, अनंतरावांना खेद झाल्याचें मला माहीत नाहीं. फार काय, पण आपण केव्हां तरी कुठल्या तरी कॉलेजांत होतों ही गोष्टसुद्धां ते आज विसरले असतील. जीवनाच्या ठराविक चाकोरीनें न जातां आपण देशासाठीं कांहीं तरी करावें अशी त्यांची महत्त्वाकांक्षा कॉलेजमध्यें असावी असें दिसतें. टिळकांनीं कारावासानंतर नागपूर, वऱ्हाड प्रान्तांत जो दौरा काढला त्यांत बातमीदार म्हणून अनंतरावजी सामील झाले होते यावरून टिळकांना माणसांची पारख बेताचीच होती असे उद्गार त्या वेळीं चावट लोकांनीं काढले असतील. तें कांहीं असलें तरी, सार्वजनिक जीवनाची पहिली

तालीम अनंतरावांना त्या दौऱ्यांत मिळाली यांत शंका नाहीं. उत्साहाच्या अतिरेकामुळें त्या वेळीं पत्रपंडितांच्या भोंवऱ्यांत सांपडलेले अनंतराव अजूनहि त्यांत 'गरगरा गरगरा' गिरक्या घेत आहेत. कालान्तरानें अनंतरावांनीं 'मौज' पत्र काढलें आणि खांदेपालट होऊन तें आजहि चालू आहे, यावरून अनंतरावांनीं त्या पत्रासाठीं सुरुवातीला किती खस्ता खाल्ल्या असतील याची कल्पना येते. आयुष्यांत स्वतःपुढें कांहीं तरी ध्येय ठेवण्याइतकी फुरसत या गृहस्थाला कधींच नसल्यानें, कोणतीहि गोष्ट शिस्तींत करण्याची जबाबदारी त्यांनीं स्वतःच्या अंगावर सहाजिकपणें घेतली नाहीं. इतकें असूनहि त्यांच्या 'मौज' पत्राचा तडाखेबंद खप एके काळीं वीस हजारापर्यंत कां आणि कसा गेला याचें खुद्द त्यांनाहि त्या वेळीं आश्चर्य वाटलें असेल. 'मौज' पत्र हातावेगळें झाल्यावरसुद्धां अनंतरावांनीं नवीन पत्रें काढण्याचा सपाटा चालू ठेवला होताच. त्यांचें 'निर्भीड' पत्र मात्र कांहीं वेळ खूपच गाजलें. परंतु या स्वारीनें तें पत्र अशा सफाईनें चालविलें कीं, 'निर्भीड' या शब्दाचा मामुली अर्थ बदलून त्याला निराळाच अर्थ—म्हणजे अनर्थ प्राप्त झाला. एखाद्याचा स्नेह टिकविण्याची आपली इच्छा असली तर त्याला 'तूं निर्भीड आहेस' असें म्हणण्याची सोय नव्हती—इतका त्या शब्दाचा दरारा त्या वेळीं होता. त्यानंतर 'प्रमोद' पत्राचा आणि अनंतरावांचा ऋणानुबंध जमला. परंतु भागानगरच्या सत्याग्रहासाठीं जाण्याचा हुकूम केळुसकर पथावरील 'हायकमांड'कडून अनंतरावांना मिळाल्यामुळें, त्यांनीं प्रमोदमधून आपली आणि वाचकांची सुटका करून घेतली. मात्र अनंतरावांच्या कारकीर्दींत 'प्रमोद' पत्राला लोक 'कमोद' कां म्हणत याचें कारण अजूनहि त्यांना माहीत असेल असें मला वाटत नाहीं. बिचारे अनंतराव! त्यांनीं आजपर्यंत किती पत्रें काढलीं हें त्यांनाहि चटकन् सांगतां येईल कीं नाहीं कोण जाणे. आकाशांतून पृथ्वीवर पडणाऱ्या ताऱ्याप्रमाणें त्यांच्या पत्रानें कांहीं काल स्वतःच्या तेजानें लोकांचें लक्ष

वेधून घ्यावें आणि नंतर पत्थर म्हणून भूतलावर कोसळून कुणाचा तरी कपाळमोक्ष करावा असाच योग आजपर्यंत घडलेला आहे.

नाट्य आणि सिनेमासृष्टींतहि अनंतरावांनीं कांहीं कमी धुमाकूळ घातलेला नाहीं. नाटुकली लिहिण्याचा पहिला मान, मला वाटतें, यांनाच द्यावा लागेल. त्यांनीं नाटकें लिहिलीं आहेत आणि रंगभूमीवर कामेंहि केलीं आहेत. कांहीं वर्षांपूर्वी अनंतरावांच्या अध्यक्षतेखालीं ' नामाचा महिमा ' याने ' संत नामदेव ' या नांवाचा बोलपट ' निघाला ' होता. समाधिसुखाचा गाढ आणि गोड आनंद अनुभवणाऱ्या त्या बिचाऱ्या नामदेवानें यांचा काय गुन्हा केला होता हें देव जाणे, परंतु प्रेक्षकांचा आणि अनंतरावांचा या बोलपटाच्या बाबतींत तीव्र मतभेद झाल्यानें संत नामदेवाची पालखी महाराष्ट्रांत फारशी फिरली नाहीं हें मात्र खरें. त्या बोलपटापेक्षां आमच्या या जाहिरातजनार्दनानें लिहिलेल्या त्याच्या भयंकर जाहिरातींनींच महाराष्ट्रांत कांहीं काल कहर करून सोडला होता असें म्हणतात. या दुर्दैवी संतावर अनंतरावांनीं हिंदी भाषेची सक्ती केली नाहीं म्हणून त्यांच्या तडाख्यांतून उत्तर हिंदुस्थान बचावला——काळ आला होता, पण वेळ आली नव्हती हेंच खरें.

अनंतरावांसारखा खटपटी मनुष्य इतकीं वर्षें पत्रसृष्टींत असल्यावर राजकारणांत त्यांचें पदार्पण होणें अपरिहार्य होतें. टिळकांच्या राजकारणावर त्यांची श्रद्धा पहिल्यापासून असली तरी कॉंग्रेस, महासभा, मजुरांची चळवळ इत्यादि क्षेत्रांत त्यांची वळवळ सुरू आहेच. तिरंगी, लाल आणि भगवा अशा रंगीबेरंगी राजकारणांतून गेल्यावर अनंतरावांची स्वारी आज भगव्या झेंड्याखालीं स्थिर झाल्यासारखी दिसते. सामाजिक चळवळींतहि अनंतराव मागें नाहींत. झुणकाभाकर, खारच्या अस्पृश्य मुलांमुलींचा आश्रम यांसारख्या पवित्र कार्यांत अनंतरावजी आहेतच. झुणकाभाकरीच्या अनेक सहभोजनांचे वेळीं या गृहस्थानें आपल्या अनंत हस्तांनीं त्या खमंग पदार्थांची चालविलेली खैरात

पाहून मला जनतेच्या आरोग्याची काळजी वाटूं लागे. झुणका-भाकरीनें 'घायाळ' झालेल्या हजारों लोकांची वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेली यादी (Casualty list) वाचून माझ्या पोटांत धस्स होई. खारच्या आश्रमासाठीं तर अनंतरावांनीं गिरगांवांत भिक्षासुद्धां मागितली असें म्हणतात. झुणकाभाकरीच्या कांहीं प्रसंगीं त्यांच्या शेंकडों रुपयांची चटणी होण्यास वेळ लागत नसे. अनंतराव म्हणजे धमाल, अनंतराव म्हणजे तुफान गर्दी, अनंतराव म्हणजे पब्लिक-शिट्टी, अनंतराव म्हणजे घरचें खाऊन सहभोजनाच्या भाकरी बड-विणारी प्रेमळ, दिलदार आणि बेवारशी सार्वजनिक 'संस्था'. त्यांचें स्वतःचें आयुष्य आज कित्येक वर्षें पडक्या धर्मशाळेप्रमाणें झालेलें आहे. वाटेल त्या गण्यागंप्यानें येऊन आपल्या 'कार्या'चें बोचकें त्यांच्या धर्मशाळेच्या पडवींत टाकून द्यावें—त्याचें जिवापलीकडे जतन करण्यास हा भोळा जीव सदासर्वदा तयार. त्यांच्या मनानें एकदां घेतलें म्हणजे वाटेल त्या गोम्यासोम्याला हस्तें परहस्तें मदत करायला लागणारी पायपीट करण्यास हा ब्राह्मण हमेश खुशी असतो. त्यांच्या उदार स्वभावामुळें ते स्वतः प्रत्येक वेळेला चांगलेच शेकून निघतात. पण त्याची त्यांना फिकीर नसते. त्यांनीं आजपर्यंत अनेक लोकांना मदत केली असली तरी संकटाचे प्रसंगीं सोराब मोदीसारखे फार थोडे मित्र त्यांच्या पाठीशीं उभे असतात, हें पाहून त्यांना फार वाईट वाटतें. परंतु अनंतरावांचा स्वभाव बिनहिशेबी आणि अस्थानीं औदार्य दाखविणारा असल्यानें, कुबेराशिवाय या कर्णाला मदत करणें सामान्य माणसाला शक्यच नसतें. मात्र ज्या लोकांनीं अनंतरावांना आजपर्यंत मदत केली त्यांच्याबद्दल अनंतराव कृतज्ञतेचे उद्गार काढतात हें मी स्वानुभवानें सांगतों.

काव्य, नाट्य, सिनेमा, पत्रसृष्टी अशा अनेक प्रान्तांत अनंतरावांचा संचार असला तरी पत्रपंडित म्हणूनच महाराष्ट्राच्या इतिहासांत ते जमा होतील. 'आद्य मौजकार' म्हणून त्यांना जो अभिमान वाटतो

तसा इतर कोणत्याहि गोष्टींत चाहत नाहीं. पत्रपांडित्यांत अच्युतराव कोल्हटकर हे अनंतरावांचे गुरु होत. आपल्या गुरूचें बरेंचसें वाङ्मय पुनर्मुद्रित करून अनंतरावांनीं आपल्या गुरूची आणि मराठी भाषेची फार मोठी सेवा केली आहे. आपल्या गुरूची पुण्यतिथि अनंतराव मोठ्या भक्तीनें दर वर्षी साजरी करून त्या पराक्रमी पत्रपंडिताचें स्मरण तरुण पिढीला करून देत असतात. अच्युतरावांच्या आठवणी ओल्या डोळ्यांनीं सांगतांना अनंतराव कसे भावनावश होतात हें पहाण्यासारखें आहे. 'मौज' पत्रांत अनिष्ट लेखन प्रसिद्ध करून अनंतरावांनीं वाचकांची सदभिरुची बिघडविली, असा आरोप त्यांच्यावर करतां येण्यासारखा असला तरी, वाचकांची एकंदर वृत्ति लक्षांत घेतां, निर्लेप आणि साधा मजकूर त्यांनीं आपल्या पत्रांत दिला असता तर त्यांच्या पत्राची 'संजीवनी' होण्यास वेळ लागला नसता. 'टिळक बाळंतीण झाले' अशा मथळ्याची संवय अच्युतरावांनीं वाचकांना लावली होती. (बाकी वरील मथळ्याऐवजीं 'बाळ बाळंतीण झाले') असा मथळा अच्युतरावांनीं कां दिला नाहीं याचें मला अजूनहि आश्चर्य वाटतें.) वृत्तपत्रांचा आजपर्यंतचा इतिहास डोळ्याखालून घातला तर टिळक, चिपळूणकरांपासून सर्व बडे लोक अनिष्ट लेखनाचें पाप कमीअधिक प्रमाणांत करीत असल्याचें दिसून येतें. गेल्या दहापांच वर्षांत तर खाजगी वैयक्तिक टीकेला इतका पूर आलेला आहे, कीं त्यांत वाचकांची सदभिरुची पार वाहून गेली आहे. थोर लोकांबद्दल 'तसें' कांहीं प्रसिद्ध झालें नाहीं तर साप्ताहिकें चालणेंहि आज मुष्किलीचें झालें आहे. एखादा थोर गृहस्थ चारित्र्यानें धड आहे अशा 'क्षुल्लक' कारणावरून वाचकांचा त्याच्याबद्दलचा आदर ओसरेल कीं काय अशी भीति वाटण्याची आज वेळ आली आहे. एखाद्या विद्वान् ब्राह्मणाच्या शालजोडीकडे आज वाचकांचें लक्ष जात नसून, त्याच्याजवळ एखादें 'अंगवस्त्र' आहे कीं नाहीं याचा तलास ते मोठ्या उत्कंठेनें करतांना

दिसतात. घराबाहेर पडून अटकेपार पराक्रमाचे झेंडे फडकविण्याची ज्यांची पात्रता, ते लेखकहि आज अनिष्ट लेखनाच्या मोहाला बळी पडले आहेत. कलाकुसरीचें नाजुक भरतकाम करणारे थोर कलावंत आज मांजरपाट खाकोटीला मारून आठवडे बाजाराकडे पळतांना पाहिलें म्हणजे मनाला खेद होतो. पत्रसृष्टींतील लेखकांनीं महाराष्ट्राला आग लावलेली पाहून माश्यांच्या जीवाचा शनवारवाडा झाला आणि कोल्हापूरच्या ‘ नारायणाला ’ नवा अवतार घेण्याची वेळ आली. पण झंकारच्या रूपानें पत्रसृष्टींतील सुरू झालेलें फडक्यांचें ‘ अप्पास्थान ’ पाहूनसुद्धां वाचकांच्या दृष्टिपथांत आशास्थान येण्याचें चिन्ह दिसेना. वाचकांच्या सदभिरुचीचा अशा तऱ्हेनें ख्यातनाम लेखकांकडून ‘ टिळक तलाव ’ होत असतांना, एकट्या अनंतरावांनाच खड्यासारखे निवडून दोष देण्यांत अर्थ काय? साहित्यसृष्टींत शासनशक्ति असलेली एकहि संस्था जोंपर्यंत नाहीं तोंपर्यंत परिस्थितींत बदल होणें शक्य नाहीं. साहित्य परिषद ही लीग ऑफ नेशन्सपेक्षांहि दुबळी आहे. वाचकांनींच अनिष्ट वाङ्मय विकत घेतलें नाहीं तर मात्र सर्व जमाना पालटून सर्व लेखक इष्ट आणि अभिजात वाङ्मय लिहिण्यास तयार होतील.

आपल्या उदार, प्रेमळ आणि निष्कपट स्वभावामुळें मुंबईतील दक्षिणी कार्यकर्त्यांत अनंतराव फार प्रिय आहेत. रात्रीं दोनपासून सकाळीं आठ नऊ वाजेपर्यंत अनंतराव आपल्या झोपल्या संसारांत टिकून असतात. नरीमन यांना महात्मा गांधींनीं पंतप्रधान केलें नाहीं म्हणून अनंतरावांनीं सात दिवसांचा उपास केला होता. उपासामुळें त्यांचें टीचभर पोट खपाटीला गेलें, तरी महात्माजींकडून त्यांना सहानुभूतीचा बोटभर संदेशहि आला नाहीं, म्हणून अनंतरावजी कदाचित् बहोत परेशान झाले असतील. पण या निमित्तानें तरी अनंतराव स्वतःच्या घरीं एक आठवडा अहोरात्र टिकले हें पाहून त्यांच्या पत्नीनें गांधींना दुवा दिला असेल. अनंतरावांचें असें दर-

वेशी जीवन असल्यानें आपल्या लाडक्या मुलांबरोबर सकाळचा चहा घेण्याची सुवर्णसंधी हा निष्कांचन पिता सहसा दवडीत नाहीं. त्या समारंभाच्या अनेक गमती मला एका मित्रानें सांगितल्या आहेत. व्यवसायांत असलेले बालगोपाल भेटले म्हणजे, ओढाताण असूनहि जवळ असतील ते सर्व पैसे अनंतराव चहापाण्यांत खर्च करतात. अशा वेळीं ते गप्पांच्या रंगांत आल्यावर त्यांच्या तोंडून जुन्या आठवणी ऐकतांना मला फार मजा वाटते. अनंतरावांत दोष नाहींत असें नाहीं; पण त्यांच्यासारखा दिलदार गडी मात्र सहसा भेटणें शक्य नाहीं. गृहस्थ बुद्धिमान असूनहि त्याच्या जीवनाची बैठक भावनेवर असल्यानें त्यांच्या हाताला यश नाहीं. त्यांना बिकट परिस्थितींतून जाण्याचे आणि मानहानि सहन करण्याचे प्रसंग आले असतील. तरी पण 'अरे मजा करा' हें त्यांचें ब्रीदवाक्य डोळ्यांसमोर ठेवून ते आपलें आयुष्य आनंदानें व्यतीत करीत असतात. मला या भाग्यवान् अभागी, प्रेमळ अनंतरावांबद्दल अतिशय आदर आणि आपलेपणा वाटतो.

यशवन्त, १९४२.

# १४ : : अप्पा जोशी

'न्यूवा ऽऽऽकाळ ... लोकमान्ये ... टाऽऽऽईऽम्—'

'खण्...खण्...खण्...पीछे गाडी आव!'

'कलोऽऽऽय्......' 'कांदे ब...ट्टाटी...'

'अप्पा, मला पेन्शील हवीय् ...' अप्पांची मुलगी.

'मुसुंब्रीं ठेवूं का शेठ—जुना बार हाय......'

शेजारच्या खोलींतला रेडिओ सुरू होतो.

पलिकडल्या मोरींतून कोकणी गड्यांच्या तडाख्यांत सांपडलेल्या धुण्याचे दाण्दाण् असे आवाज ऐकूं येतात.

'अरे जोशी, जातों मी आतां. येईन संध्याकाळीं परत—' टेबलावर असलेली जंजिऱ्याहून आयात झालेली पांढरी सुपारी अडकित्त्यानें कातरीत बॅरिस्टर कीर्तिकर बोलतात.

'पण जरा थांबा ना मामाजी, मी पण येतों. आज 'निवशी' असल्यानं मी तुमच्याचकडे जेवीन म्हणतों.' जेवणाचें आमंत्रण लावीत मी कीर्तिकरांना थांबवितों.

चाळींतलीं दोन उघडीं नागडीं मुलें टेबलाजवळ येऊन गडबड करूं लागतात.

'अप्पा, प्रुफं झालीं का?' छापखान्यांतला माणूस मध्येंच आपलें घोडें दामटतो.

'ए सायबा, बाजूनें चल कीं—' खिडकींतून रस्त्यावरील व्हिक्टोरियावाल्याचा आवाज येतो.

'अरे रामा, दाढीसाठीं गरम पाणी घेऊन ये बरं.' खुद्द अप्पा जोशी.

'संध्याकाऽळ—ईविनिंग यूऽऽऽज' रस्त्यावरील नेहेमींचे आवाज ऐकूं येतात,

'चमेली.....गंडेरी ऽऽ'.....'कुलफी.–मला ऽऊई–' रात्रीचे आठ वाजून गेल्यानंतरच्या रोज ऐकूं येणाऱ्या आरोळ्या.

या अशा गोंगाटाच्या वातावरणांत सकाळ संध्याकाळीं अप्पांच्या दोन तीन खोल्यांत दहा वीस लोकांची ये जा सुरू असते. टाइपरायटरचा खडखडाट ऐकूं येत असतो. कोर्टाचा जामानिमा उतरून अप्पा आपल्या साध्या वेषांत हंसतमुखानें सर्वांशीं बोलून कामाला शान्तपणानें सुरवात करतात. काळे, वैद्य, पाटील, कीर्तिकर, बखले, फडके, देसाई, प्रधान, ही सकाळची मंडळी पुन्हां दिसूं लागतात. कामाला पुन्हां जोरानें सुरवात होते. नऊ वाजतां जरा सामसूम झाल्यावर, अप्पा चार घांस पोटांत ढकलतात आणि पुन्हां आपल्या खुर्चीवर बसून कामाला सुरुवात करतात. कालाचा अखंड प्रवाह चालू आहे हें भिंतीवरील घड्याळ दर अर्ध्या तासानें या काममग्न गृहस्थांस बजावण्यास विसरत नाहीं. पण अप्पांचें तिकडे लक्ष नसतें. दिवसाचें काम संपवून ते बारा–एक वाजतां शान्त चित्तानें झोंपीं जातात. आयुष्याचा एक दिवस जातो.

गिरगांवांतून धोबी तलावाकडे दोन मजल्याच्या ट्रॅमनें किंवा बसनें आपण गेलों, तर कांदेवाडी नाक्यावर असलेल्या सोमण बिल्डिंगच्या पहिल्या मजल्यावर रस्त्याकडे पाठ करून, प्रारंभीं दिलेल्या गडबडीच्या वातावरणांत कामांत गढलेला एक गृहस्थ आपणांस दिसेल. त्याच्याभोंवतीं केव्हांहि दहा पांच गांजलेल्या लोकांचा गराडा पडलेला असून, त्यांची कैफियत खुर्चीवरील गृहस्थ शान्त चित्तानें ऐकत असल्याचें दृश्य आपल्याला दिसेल. सकाळीं दहा वाजेपर्यंत आणि संध्याकाळीं सहा साडेसहानंतर ही स्वारी आपल्या खुर्चीवर खिळलेली असते. दिवस, आठवडा, महिना आणि वर्ष हाच ठराविक कार्यक्रम अखंड चालू असलेला आपणांस दिसेल. रेल्वे, पोस्ट, तार, कस्टम, बँक, मिंट, म्युनिसिपॅलिटी, पोर्टट्रस्ट, छापखाना आणि इतर अनेक मजूरसंघांचीं कामें अप्पांच्या मदतीनें येथें अहोरात्र

चालू असतात. जगाकडे पाठ केलेला, पण त्यांतील हजारों नाडलेल्या दुर्दैवी लोकांचें जीवन सुसह्य करण्यासाठीं आयुष्यांतील प्रत्येक क्षण सत्कारणीं खर्च करणारा हा महात्मा म्हणजेच अप्पा किंवा S. C. Joshi, M. A., LL. B., Advocate (o. s.) M. L. C. 'अप्पा' म्हटलें कीं हजारों कामगारांच्या हृदयांत भावनोर्मी उसळत असतील आणि त्यांच्या नेत्रांतून कृतज्ञतेचे अश्रु ओघळत असतील. अनेक वर्षांपूर्वी माझ्या खडतर जीवनांतील अप्पा हे आश्रयस्थान होते. मी बेकार असतांना, माझे मित्र बॅरिस्टर कीर्तिकर यांच्या सांगण्यावरून अप्पांनीं मला त्यांच्या स्टाफ युनिअन-मध्यें काम करण्याची संधी दिली. मजुरांपेक्षां माझ्या स्वतःच्याच पोटाचा प्रश्न सोडविण्यासाठीं मी मजुरांच्या चळवळींत कांहीं काल काम केलें हें मला प्रामाणिकपणानें येथें सांगितलें पाहिजे. परंतु अप्पांच्या प्रेमळ व्यक्तित्वामुळें माझें मन तेथें रमलें. मी स्वभावतःच भावनावश असल्यानें, रेल्वे नोकरांवर प्रत्यहीं होणाऱ्या अन्यायामुळें माझें काम विशेष आपुलकीनें होऊं लागलें. माझ्यावर सोंपविलेल्या 'युनिअन हेरल्ड' नांवाच्या त्यांच्या मासिकासाठीं मी माझें शक्ति-सर्वस्व खर्च करून तें लोकप्रिय करण्याचा प्रयत्न केला. माझी ती सेवा कामगारांनीं गोड करून घेतली आणि मला काम करण्यास उत्साह दिला हे त्यांचे उपकार मी कधींहि विसरणार नाहीं.

कर्तव्यपालनांत वाटेल तीं संकटें आलीं, तरी अप्पा डगमगत नाहींत. मागें एकदां एका बड्या अधिकाऱ्याला युनिअनच्या वतीनें अप्पा जंजिऱ्याहून मुद्दाम भेटायला गेले होते. त्या वेळीं त्यांचें एक अपत्य मृत्युशय्येवर पडलें असून, त्या कोमल अर्भकाचा काळ केव्हां घांस घेईल याचा नेम नव्हता. आपलें काम उरकून अप्पा परत जंजिऱ्याला गेल्यावर सुमारें एका तासाच्या आंतच आपल्या लाडक्या लेकाचा अंत पहाण्याचें त्यांच्या नशिबांत होतें. तसेंच परवां त्यांचा कर्तासवरता वडील भाऊ अकालीं कालवश झाला, तरी तुकारामाच्या

वृत्तीनें कामगारांच्या या कनवाळू कैवाऱ्यानें सेवावृत्तीचें आपलें व्रत क्षणभरहि सोडलें नाहीं. आत्यंतिक तपश्चर्येशिवाय मनाची अशी तयारी होणें शक्य नाहीं. मी अप्पांना थट्टेनें महात्मा म्हणतों याचें कारण हेंच.

अप्पांकडे काम करीपर्यंत रेल्वे नोकरांच्या हलाखीची मला कल्पना नव्हती. वरच्या वर्गानें प्रवास करून डाइनिंग कारच्या खाद्यपेयांवर पोटभर ताव मारणाऱ्या माझ्यासारख्या खुशालचेंडु प्रवाशाला, रात्रभर काम करणाऱ्या अर्धपोटी रेल्वे नोकरांच्या दुःखद परिस्थितीची जाणीव कशी असणार ? परंतु सोमण बिल्डिंगमध्यें काम करायला आल्यापासून, तेथें दिसणाऱ्या लाचार आणि हताश चेहऱ्यांवरून, मला एकंदर भीषण वातावरणाची पहिल्यानें तोंडओळख झाली. अत्यंत अपुरें वेतन, झेपण्यापलिकडे काम, अधिकाऱ्यांची अरेरावी, रोज सहन करावी लागणारी मानहानी, काळा-गोरा असा निर्लज्ज पक्षपात आणि सेवानिवृत्त होण्याचे वेळीं वयाइतकाच जेमतेम पगार. अशा कष्टमय वातावरणांत लाखों निरपराध जीव प्रतिक्षणीं कसे भरडले जातात याची मामुली माणसाला कल्पनाहि नसेल. मी सबंध जी. आय्. पी. लाइनवर कामासाठीं हिंडलों असतां, याच करुणकाव्याचे स्वर मला ऐकूं येत, तेंच दैन्य प्रत्येक ठिकाणीं दृष्टीला पडे आणि सोमण बिल्डिंगमध्यें बसून हा सर्व अन्याय दूर करण्यासाठीं अप्पा इतकें काम आनंदानें कां करतात याचें कारण मला समजून येई. सत्यसृष्टीपेक्षांहि कल्पनासृष्टींत मानवी बुद्धीला अगम्य वाटणारे असे चमत्कार कसे घडतात हें एकाद्याला समजून घेण्याची इच्छा झाली, तर सोमण बिल्डिंगमध्यें जाऊन त्यानें ' युनिअन हेरल्ड ' मासिकाचे जुने अंक नजरेखालून घालावेत अशी माझी विनंति आहे. दुष्ट माणसाच्या दगडासारख्या काळजालासुद्धां त्या वाचनानें घरे पडतील अशी माझी खात्री आहे.

आपल्या हाताखालीं काम करणाऱ्या माणसाला बरोबरीनें वागविण्याचें बऱ्याच थोर शिष्टांच्या जीवावर येतें, याचा अनुभव

अनेकांना असेल, पण हिंदी मजूरचळवळीचे जनक जोशीबुवा आणि सध्यां स्थानबद्ध असलेले मद्रासचे एके काळचे मजूरमंत्री व्ही. व्ही. गिरी यांच्याप्रमाणेंच अप्पांमध्येंहि सहकाऱ्यांशीं खेळीमेळीनें वागण्याची माणुसकी आहे. मद्रास, नागपूर, झरिया, सिमला इत्यादि ठिकाणीं झालेल्या महत्त्वाच्या सभांसाठीं, अप्पांनीं मला बरोबर नेऊन चळवळीचीं सूत्रें प्रत्यक्ष कशीं हालतात याचा अभ्यास करण्याची संधी दिली. अशा तऱ्हेचें मनाचें औदार्य क्वचित सांपडतें, हें मला माहीत आहे म्हणूनच जोशीबुवा, गिरी आणि अप्पा यांच्याशिवाय मला इतर मजूर पुढाऱ्यांबद्दल तितकेंसें 'हें' वाटत नाहीं ही गोष्ट खरी. उपरोक्त पुढाऱ्यांबद्दल माझ्याप्रमाणेंच लाखों लोकांना आपलेपणा आणि आदर वाटत असेल याची मला खात्री आहे.

अप्पा हे मवाळ पुढारी आहेत असा आरोप त्यांचे प्रतिपक्षी त्यांच्यावर नेहमीं करीत असत. हा आरोप खरा आहे—आणि नाहींहि. अप्पांच्या स्टाफ युनिअनच्या सभासदांकडे पाहिलें, तर त्यांपैकीं बहुतेक सर्व साधारणपणें शिकलेले आणि मध्यम वर्गाच्या पांढरपेशा वृत्तीचे होते असेंच टीकाकारांना दिसलें असतें. मी अप्पांकडे काम करीत असतां, जी. आय्. पी. लाइनवर दोन मजूरसंघ असत. स्टाफ युनिअन अप्पांच्या मार्गदर्शनाखालीं संथपणानें काम करीत होतें, तर दुसरें युनिअन पुढारीपणाबद्दल भाऊबंदकी करण्यांत तयार असलेल्या भाईंच्या ताब्यांत असे. कोणत्याहि चळवळीला डावी-उजवी बाजू (Left wing and right wing) असते ही गोष्ट कोणालाहि अमान्य करतां येणार नाहीं. डाव्या गटवाल्यांचा ओढा सहाजिकच लढाऊ मार्गाकडे होता. आपले सभासद वाढविण्यासाठीं त्यांनीं खूप प्रयत्न केले आणि त्यांच्या प्रयत्नानें स्टाफ युनिअनचे सभासद खूपसे घटलेहि. दुसऱ्या युनिअनमध्यें अशिक्षित अतएव भावनावश सभासद असल्यानें, त्यांच्यांत लढाऊ वृत्ति निर्माण करणें फारसें कठीण नव्हतें. परंतु भावनावश मन म्हणजे खरी लढाऊ वृत्ति

नव्हे हें अप्पांप्रमाणें कट्टर पुढारी ओळखून नव्हते—किंवा त्यांनीं जाणूनबुजून त्या महत्त्वाच्या फरकाकडे डोळेझांक केली असावी. स्टाफ युनिअनच्या सभासदांना 'लाल दवा' मानवणार नाहीं हें अप्पांनीं त्यांची नाडी पाहून ओळखलें असल्यानें त्यांनीं त्यांना पचणार नाहीं असें लढाऊ कुपथ्य करण्यास सांगितलें नाहीं, हा त्यांचा खासच दोष नव्हे—उलट, पुढारी म्हणून निंदा-स्तुतीची पर्वा न करतां त्यांनीं आपलें कर्तव्य चोख रीतीनें बजावलें असेंच मी म्हणेन. डाव्या गटवाल्यांची चळवळ नेहमींच वाममार्गानें चालू असते असें अप्पा कधींहि मानीत नाहींत; फार काय, पण कोणत्याहि पुरोगामी चळवळीला डाव्या गटाचें फार साह्य असतें असेंच त्यांचें मत आहे. परंतु कमताकद दुव्यावरूनच ज्याप्रमाणें सांखळीची ताकद अजमावण्यांत येते, त्याचप्रमाणें मजुरांच्या चळवळीचें बळ, तिच्या डाव्या-उजव्या गटवाल्यांच्या संघशक्तीवर आधारलेलें असतें, असा अप्पांचा दांडगा विश्वास आहे. या विश्वासाला टीकाकारांनीं मवाळवृत्ती असें नांव दिलें तर त्यांत अप्पांचा दोष नव्हे. आपल्या गटाच्या सभासदांची ताकद न ओळखतां जो पुढारी लोकांची विनाकारण दिशाभूल करतो, तो एका दृष्टीनें पुढारी होण्यास नालायक असतो असें मला वाटतें. पण पुढारीपणाचा मक्ता आपल्या एकट्याकडेच असावा अशी अप्पांची केव्हांहि महत्त्वाकांक्षा नसल्यानें, त्यांनीं टीकेला न जुमानतां आपलें कर्तव्य प्रामाणिकपणानें बजावलें. लढाऊ राजकारणापूर्वीं, कामगारांत शंभर टक्के संघटना झाली पाहिजे असा अप्पांचा योग्य कटाक्ष होता. अशा संघटनेशिवाय पेटविलेल्या कोणत्याहि संपाच्या वणव्यांत कामगारच होरपळून निघतील असा अप्पांचा विश्वास असल्यामुळें, अनेक वर्षांपूर्वीं जी. आय्. पी. वर झालेल्या अयशस्वी संपास त्यांची मान्यता नव्हती. त्या संपानंतर सुरू झालेल्या शिक्षासत्रांत हजारों कामगारांचें अपरिमित नुकसान

कसें झालें ही गोष्ट आज जरी इतिहासजमा झालेली असली, तरी अप्पांचें धोरणच पूर्णपणें योग्य होतें ही गोष्ट सिद्ध झाली. व्याख्यानबाजीनें भावनावश कामगारांत असंतोषाची ठिणगी टाकून संपाचा वणवा पेटविणें शक्य असलें, तरी तसें करणें इष्ट नसतें हें जबाबदार पुढाऱ्यांनीं विसरून चालणार नाहीं. तसें म्हटलें तर अप्पांना लढाऊ राजकारणाचें किंवा तुरुंगवासाचें वावडें असेल असें मला वाटत नाहीं. परंतु अविचारानें हुतात्मा होण्यास ते तयार होणार नाहींत ही गोष्टसुद्धां तितकीच खरी आहे. अप्पांनीं आजपर्यंत केलेली भरीव कामगिरी लक्षांत आणली आणि १९३० सालीं जिनीव्हा येथें भरलेल्या राष्ट्रसंघांतील आन्तरराष्ट्रीय मजूर परिषदेंत हिंदी मजुरांचा प्रतिनिधी म्हणून झालेलें त्यांचें भाषण वाचलें म्हणजे अप्पांवर भ्याडपणाचा आरोप कोणीहि करणार नाहीं अशी माझी खात्री आहे.

कोणत्याहि संपांत पुढाऱ्यांपेक्षां कामगारांचें नुकसान होत असतें, म्हणून कामगार चळवळ मजुरांमधूनच निर्माण झालेल्या त्यागी पुढाऱ्यांच्या हातीं कालान्तरानें जाणें अपरिहार्य आहे असें अप्पांचें स्पष्ट मत आहे. धंदेवाईक, उपरे आणि पोषाखी लोकांच्या अंगावरील पुढारीपणाचीं लक्तरें जरी अंगावेगळीं झालीं, तरी जोशीबुवा, गिरी, अप्पा, शामराव परुळेकर, गोदावरी गोखले इत्यादि लोकांना चळवळींत मानाचें स्थान केव्हांहि मिळेल अशी माझी खात्री आहे. माझा हा सर्व अनुभव फार वर्षांपूर्वीचा असल्यानें आज रेल्वेकामगारांची काय स्थिति आहे हें मला माहीत नाहीं. सध्यां जी. आय्. पी. लाइनवर एकच युनिअन असल्याचें ऐकतों. कॉमरेड काळे, पाटील इत्यादि मंडळी अप्पांचेबरोबर व त्यांचे पुढारीपणाखालीं त्या चळवळींत असल्यानें, कामगारांच्या एकंदर परिस्थितींत सुधारणा झाली असेल अशी मला आशा आहे. उपरोक्त उमद्या मताचे खरेखुरे कामगार केव्हां तरी लायक पुढारी होऊन आपल्या

असंख्य कामगारबंधूंना सुखाचा स्वर्ग दाखवून स्वर्गसुखाचा अनुभव देतील अशी मला आशा आहे.

अप्पांना बैठे किंवा मैदानी खेळ खेळण्याची आवड नाहीं आणि वेळहि नाहीं. मजुरांचा अन्याय करणाऱ्यांची विकेट कशी घ्यावयाची हाच त्यांचा क्रिकेटचा खेळ. मालकशाहीच्या कारवायांना खो घालून त्यांच्या बिकट कोंडींतून मजुरांपर्यंत त्यांच्या न्याय्य व सनदशीर हक्कांचें लोण पोंचविणें हाच अप्पांचा खोखो व आट्यापाट्याचा 'मैदानी' खेळ. मालक—मजुरांच्या झगड्यांत, आपलें प्यादें हिकमतीनें पुढें सरकवून प्रतिपक्षावर मात करणें हाच त्यांचा बुद्धिबळांचा बैठा खेळ. एक घड ना भाराभर चिंध्या, असा अप्पांचा स्वभाव नसल्यानें, जमनादास मेहतांप्रमाणें नव्या नव्या राजकीय पक्षांच्या पत्त्यांचे बंगले बांधणें अप्पांना साधत नाहीं. अशा रीतीचें अप्पांचें बैठें आयुष्य असूनहि, प्रकृतीच्या बाबतींत त्यांची फारशी तक्रार नसते ही समाधानाची गोष्ट होय.

मजुरांचे प्रतिनिधि म्हणून अप्पांची जुन्या व नव्या मुंबई कायदे-कौन्सिलांतील कामगिरी वाखाणण्यासारखी आहे. याशिवाय १९३२ पासून मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशनचे अप्पा लोकनियुक्त सभासद आहेत. याशिवाय अनेक सार्वजनिक संस्थांशीं त्यांचा जिव्हाळ्याचा संबंध आहे. लोकहिताची अप्पांना सतत तळमळ लागलेली पाहून प्रत्येकास अप्पांबद्दल कौतुक व प्रेम वाटतें यांत नवल काय ?

अप्पांनीं आजपर्यंत खूप प्रवास केलेला असला, तरी आपल्या लाडक्या मुलीसाठीं केव्हां तरी पहाव्या लागणाऱ्या 'स्थळा' खेरीज इतर प्रेक्षणीय स्थळें पहाणें त्यांना जमेलसें मला वाटत नाहीं. दिल्लीला अनेक वेळां जाऊनहि, वाटेवर असलेला ताजमहाल या भल्या गृहस्थानें एकदांसुद्धां पाहिला असेल असें मला आज पैजेवर सांगतां येणार नाहीं. गेलेल्या गांवाहून सरळ मुंबईला परतायचें असा त्यांचा खाक्या आहे. तसेंच म्हटलें, तर अप्पांसारख्या सार्वजनिक 'संस्थे'ला

म्हणण्यासारखें असें खाजगी जीवनहि नाहीं. तरी पण पती आणि पिता या नात्यानें ते आपलें कर्तव्य धडपणें पार पाडतात. गिरगांवांतील बायकांमुलांनीं एकादें युनिअन स्थापन करून, घरच्या कर्त्या माणसानें आपल्या संसारांत कमींत कमी आठ तास काम केलें पाहिजे अशी चळवळ सुरू केली, तरी प्रेमाच्या राजवटींत अप्पांच्या हातून अंगचोरपणा होऊन ते मोठे 'गुन्हेगार' ठरतील यांत शंका नाहीं. तरी पण, वेळांत वेळ काढून ते आपल्या मुलांना कधीं बाजारांत तर कधीं बॅरिस्टर कीर्तिकरांकडे नेतांना दिसतातच. अशी पर्वणी अर्थातच केव्हां तरी येते हें सांगायला नकोच.

अप्पा जरी अजातशत्रु असले, तरी कीर्तिकरांशिवाय त्यांना जिव्हाळ्याचा दुसरा मित्र असेल असें मला वाटत नाहीं. अप्पा मुंबईत असले, तर या दोघांची भेट झाल्याशिवाय एकहि दिवस सुना जात नाहीं. एकाच्या घरीं कोणी आजारी असलें तर दुसरा रात्रंदिवस आजाऱ्याची सेवा करण्यास तयार असतो. दोघेहि मनानें प्रेमळ, निष्कपट, चारित्र्यानें निर्मळ, दानतीनें धड, परोपकाराला तत्पर आणि वागण्यांत सौजन्यपूर्ण असल्यानें त्यांचें एकमेकांचें पटतें. अप्पा आणि कीर्तिकर यांना आजच्या कृत्रिम आणि व्यवहारी जगांत जीवाला जीव देणारा एकेकच मित्र असला, तरी ते दोघेहि माझे मित्र असल्यानें मला एकाऐवजीं दोन मित्र लाभल्यानें मी त्यांच्यापेक्षां दुप्पट भाग्यवान आहे असें मला वाटतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६२०७३

REFBK-0006273